दैनिक
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द
# राष्ट्र सह्याद्री
संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २६४ I मंगळवार ७ जुलै २०२६
I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com

## कुंडलिनी आणि ब्रह्म शक्ति...



'सहजयोग'
भाग १०१

परमेश्वराची इच्छा किंवा त्याची इच्छा-शक्ति ही आपल्या डाव्या इडा-नाडीतनं वाहत असते. त्या इच्छा शक्तिचाच थोडासा भाग कुंडलिनीही आहे. म्हणजे परमेश्वरानी आपली इच्छाच आपल्यामध्ये या त्रिकोणाकार अस्थिमध्ये ठेवली आहे. ही कुंडलिनी शक्ति, जसं एखाद्या बी, बीजामध्ये अंकुर-शक्ति आपण जर पाहिलं असेल, तशी आपल्या त्या त्रिकोणाकार अस्थिमध्ये ठेवण्यात आली आहे. आता ही जी इच्छा-शक्ति आहे, ती जेव्हा आपण वापरु लागलो, जी आपल्या इडा-नाडीतनं वाहते, तेव्हा इच्छेला पुर्ण करण्यासाठी काहीतरी क्रिया करावी लागते. नुसती इच्छाच राहिली, तर त्याचं काही दृश्य आपल्याला दिसू शकणार नाही. ह्या इच्छेला क्रियेमध्ये घालावं लागतं आणि त्यासाठी त्या इच्छेतनच क्रिया-शक्ति निघालेली आहे आणि ती क्रिया-शक्ति आपल्या उजव्या बाजूस आलेली आहे. ती आपल्या शरीरामध्ये पिंगला नाडीतनं वाहत असते. तसं ह्या दोन्ही शक्त्या ज्या बिंदू वर मिळतात तिथेच गणेश स्थापना आहे. इच्छा-शक्ति ही भावनामय आहे, भावनात्मक आहे. माणसाच्या भावना दिसत नाहीत, अदृश्य होतात. त्या भावनेला जेव्हा साकार रुप येतं तेव्हाच ते आपल्याला दिसतं, पण ते साकाररुप सुद्धा क्रिया-शक्ति मुळे होतं. तेव्हा जी दुसरी क्रिया-शक्ति आपल्या डावीकडून उजवीकडे येते, ह्या क्रिया-शक्तिला आम्ही सहजयोगामध्ये महासरस्वतीची शक्ति म्हणतो. पहिलीला महाकालीची शक्ति आणि दुसरी महासरस्वतीची शक्ति म्हणतो. महासरस्वतीची शक्ति ही आपल्या उजव्या पिंगलातनं वाहत असते, हीच ब्रम्हशक्ति आहे. जेव्हा कार्यान्वित होते, ब्रम्हातली क्रियाशक्ति जेव्हा कार्यान्वित होते, तिलाच आपण ब्रम्हशक्ति म्हणतो आणि त्याचे देवता हे ब्रम्हदेव आहेत.

२३ सप्टेंबर १९७९,मुंबई. अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# महाराष्ट्रात हायअलर्ट

## नगर जिल्हा 'येलो अलर्ट'वर

- मुख्यमंत्र्यांच्या सतर्कतेच्या सूचना
- मुळा धरणात नव्या पाण्याची आवक, भीमा-गोदावरीकाठच्या गावांना इशारा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर / मुंबई :** राज्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक ठिकाणी भूस्खलन, वाहतूक विस्कळीत होणे आणि पूरस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी परिस्थितीचा आढावा घेत प्रशासनाला सतर्क राहण्याचे आदेश दिले असून, नागरिकांनी अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नये, असे आवाहन केले आहे. दरम्यान, हवामान विभागाने ८ जुलैपर्यंत राज्यात मुसळधार पावसाचा इशारा कायम ठेवला असून, अहिल्यानगर जिल्ह्यासाठी 'येलो अलर्ट' जारी करण्यात आला आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यात नगर शहरासह बहुतांश भागात गेल्या दोन दिवसांपासून रिमझिम ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू आहे. या पावसामुळे वातावरणात गारवा निर्माण झाला असून, शेतकऱ्यांच्या पेरणीच्या आशा पुन्हा पल्लवीत झाल्या आहेत. नगर शहरात दिवसभर संततधार सुरू असल्याने नागरिकांना छत्र्या आणि रेनकोटचा आधार घ्यावा लागला. खड्डेमय रस्त्यांमध्ये पाणी साचल्याने वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागली.

पुणे जिल्ह्यातील जोरदार पावसामुळे भीमा नदीत २७ हजार ८४७ क्युसेक्स, तर नाशिक जिल्ह्यातील पावसामुळे गोदावरी नदीत ८०० क्युसेक्स पाण्याचा प्रवाह सुरू झाला आहे. त्यामुळे भीमा व गोदावरी नदीकाठच्या गावांना जिल्हा प्रशासनाने सतर्कतेचा इशारा दिला आहे.

जिल्ह्यातील प्रमुख धरणांमध्येही पाण्याची आवक वाढू लागली आहे. सर्वात मोठ्या मुळा धरणात दुपारी १७ हजार ७३७ क्युसेक्सने नवीन पाण्याची आवक सुरू झाली असून, भंडारदरा धरणात ३३.५१ टक्के, निळवंडे धरणात १६.७५ टक्के तर मुळा धरणात ८.८४ टक्के उपयुक्त पाणीसाठा उपलब्ध आहे.


दरम्यान, खरीप हंगामातील पेरण्या अद्याप अपेक्षेप्रमाणे झालेल्या नसल्या तरी दोन दिवसांच्या पावसामुळे पेरण्यांना गती मिळण्याची चिन्हे आहेत. जिल्ह्यात आतापर्यंत ६ लाख ७४ हजार ४६१ हेक्टरपैकी १ लाख ५६ हजार ५४० हेक्टर (२३.२१ टक्के) क्षेत्रावर पेरणी झाली असून, कापूस लागवड ५४ टक्क्यांवर पोहोचली आहे.

### वर्क फ्रॉम होम सुरू करा

**अत्यावश्यक कामाशिवाय घराबाहेर पडू नका. खासगी कंपन्यांनी परिस्थितीनुसार वर्क फ्रॉम होम सुविधा द्यावी. प्रशासनाच्या सूचनांकडे दुर्लक्ष करणाऱ्या कंपन्यांवर कायदेशीर कारवाई केली जाईल. सर्व जिल्हाधिकारी व आपत्कालीन यंत्रणांना २४ तास सज्ज राहण्याचे आदेश देण्यात आले. एनडीआरएफ व एसडीआरएफ पथके संवेदनशील भागांत तैनात करण्यात आली असून मुंबई-पुणे मार्गावरील भूस्खलनग्रस्त भागात युद्धपातळीवर मदतकार्य सुरू आहे.**

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**





### अहिल्यानगर जिल्ह्यातील २४ तासांतील पावसाची नोंद (मिमी.)

| तालुका | पाऊस |
|---|---|
| अकोले | २६७ |
| पारनेर | २६२ |
| श्रीगोंदे | २४० |
| नगर | १२५ |
| संगमनेर | ९० |
| कर्जत | ९३ |
| कोपरगाव | ६१ |
| जामखेड | ५९ |
| राहाता | ३२ |
| श्रीरामपूर | ११ |
| नेवासा | १० |
| राहुरी | ०७ |
| पाथर्डी | ०७ |
| शेवगाव | ०५ |

जिल्हा सरासरी १०४ मिमी.

## कोर्टाच्या आदेशाशिवाय गोशाळेतून १२ म्हशींची विक्री

- केवळ २० हजारांत १२ म्हशींचा सौदा
- गोशाळा चालकाचा धक्कादायक कारनामा
- गोरक्षकासह पाच जणांविरुद्ध गुन्हा
- ५.८० लाखांचा मुद्देमाल जप्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** न्यायालयाच्या ताब्यात असलेल्या १२ म्हशी न्यायालयाचा आदेश न घेता, पोलिसांना अंधारात ठेवून तब्बल २० हजार रुपये घेऊन परस्पर मालकांच्या ताब्यात दिल्याचा धक्कादायक प्रकार अहिल्यानगर तालुक्यातील वाळकी येथे उघडकीस आला आहे. या प्रकरणी लक्ष्मीमाता गोशाळेचा चालक चांगदेव गोरख भालसिंग याच्यासह पाच जणांविरुद्ध अहिल्यानगर तालुका पोलिसांनी भारतीय न्याय संहिता आणि प्राण्यांचा छळ प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी कारवाई करत दोन बोलेरो पिकअपसह १२ म्हशी असा ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

### न्यायालयीन ताब्यातील जनावरांची परस्पर सुटका

**न्यायालयीन आदेशाशिवाय ताब्यातील जनावरे सोडविण्याचा प्रकार अत्यंत गंभीर मानला जात असून, गोशाळा व्यवस्थापनाच्या जबाबदारीवरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या घटनेमुळे न्यायालयीन ताब्यातील जनावरांच्या सुरक्षेबाबत आणि गोशाळांच्या कामकाजातील पारदर्शकतेबाबत नव्याने चर्चा सुरू झाली आहे.**



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सातारा जिल्ह्यातील कराड येथील नितेश बबन वैरागर आणि त्याच्या भागीदाराने १२ म्हशी नेवासा तालुक्यातील घोडेगाव येथे नेत असताना दौंड पोलिसांनी अमानुष पद्धतीने वाहतूक होत असल्याने कारवाई **(पान ४ वर)**

### धरणे, तलाव आणि नद्यांवर जाण्यास बंदी

**मुंबई आणि ठाण्यात मुसळधार पावसासह ताशी ७० ते ९० किमी वेगाने वारे वाहण्याचा इशारा देण्यात आला आहे. दुर्घटना आणि जीवितहानी टाळण्यासाठी जिल्ह्यातील सर्व गडकिल्ले, धबधबे, धरणे, तलाव आणि नद्यांवर नागरिकांना जाण्यास पुढील आदेशापर्यंत बंदी घालण्यात आली आहे. गेल्या ३ दिवसांतील अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आपत्ती व्यवस्थापन कायद्यांतर्गत आदेश जारी केले आहेत.**

### राज्यात ९ जणांचा बळी

**मुंबईसह ठाणे, पालघर त्याचबरोबर कोकणात मुसळधार पाऊस कोसळत आहे. या पावसामुळं काही भागात जनजीवन विस्कळीत झालं आहे. कारण अनक ठिकाणी रस्त्यांवर घरांमध्ये पाणी शिरलं आहे. दरम्यान, या मुसळधार पावसामुळं काही भागात दुर्घटना देखील घडल्या आहेत. मुसळधार पावसामुळे झालेल्या दुर्घटनेत आत्तापर्यंत राज्यात ९ जणांचा बळी गेला आहे. तर ४ जण जखमी झाले आहेत. भिंत पडून ८ जणांचा बळी तर झाड पडून एकाचा मृत्यू झाल्याची घटना घडली आहे.**

### पहिल्याच पावसात मिसिंग लिंकचा स्लॅब कोसळला

**:मुंबई - पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाची अवस्था ही पहिल्याच दमदार पावसात उघड झाली. काही महिन्यांपूर्वी उद्घाटन झालेल्या मिसिंग लिंकवर खड्ड्यांचं साम्राज्य पाहायला मिळालं. खड्ड्यांचे फोटो समोर आले होते. दरम्यान, सोमवारी पहाटे मिसिंग लिंकच्या बोगद्याजवळ दरड कोसळून संरक्षक भिंतीचा स्लॅब पुलावर कोसळला. यामुळे वाहतुकीवर मोठा परिणाम झाला. प्रवाशांनाही नाहक त्रास सहन करावा लागला.**

# अविश्वास ठरावापूर्वीच कर्जतच्या नगराध्यक्षा रोहिणी घुले यांचा राजीनामा

## नव्याने नगराध्यक्ष नियुक्तीचा मार्ग मोकळा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** अविश्वास ठरावापूर्वीच कर्जतच्या नगराध्यक्षा रोहिणी सचिन घुले यांनी आपला राजीनामा सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी डॉ पंकज आशिया यांच्याकडे सुपूर्द केला. या राजीनामा पत्रात त्यांनी पदाधिकाऱ्यांमधील राजकीय अस्थिरता न दाखवत आपल्या कौटुंबिक आणि वैयक्तिक कारणास्तव राजीनामा देत असल्याचे नमूद केले आहे. मंगळवारी त्यांच्याच अविश्वास ठरावावर कर्जतच्या नगरपंचायत कार्यालयात विशेष सभा बोलावली होती. तत्पूर्वीच राजीनामा दिल्याने बैठकीची केवळ औपचारिकता पाळली जाईल. पुढील सहा महिन्यांसाठी कर्जतच्या नगराध्यक्षा कोण होणार ? याकडे आता कर्जतकरांचे लक्ष लागले आहे.

मागील दोन महिन्यांपासून कर्जत नगरपंचायतीच्या राजकारणात सत्तेच्या खुर्चीपायी पदाधिकाऱ्यांमधील धुसफूस उफाळली होती. यात तत्कालीन गटनेते संतोष मेहेत्रे यांना बहुमताने गटनेत्या पदावरून दूर करण्यात आले. त्यांनतर कर्जतच्या नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्यावर अविश्वास ठराव दाखल करण्यात आला होता. मात्र सदरचा वाद न्यायालयापर्यंत गेल्याने दोन महिने कर्जत नगरपंचायतीच्या पदाधिकारी बदलास विलंब लागला. १ जुलै रोजी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने संतोष मेहेत्रे व रोहिणी घुले यांच्या याचिका फेटाळून लावत कर्जतच्या सत्तासंघर्षास पूर्णविराम लावला. आणि नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्या रखडलेल्या अविश्वास ठरावावर १० दिवसाच्या आत निर्णय घेण्याचे आदेश जिल्हाधिकारी यांना दिला. त्या अनुषंगाने मंगळवार, दि ७ रोजी कर्जत **(पान ४ वर)**



### रोहित पवारांचा गट दोनदा फुटला

**पहिल्या फुटीत उषा राऊत यांचा बळी तर दुसऱ्या फुटीत रोहिणी घुलेंचा... कर्जत नगरपंचायतीमध्ये आमदार रोहित पवार यांनी १७ पैकी तत्कालीन राष्ट्रवादी काँग्रेसचे १२ आणि काँग्रेस ३ असे १५ नगरसेवक आपल्या विचारांचे निवडून आणले होते. या दोन्ही पक्षाचा त्यांनी एकत्रित १५ नगरसेवकांची गटनोंदणी केली होती.**

**मात्र यातील ११ नगरसेवकांनी ६ एप्रिल २०२५ रोजी उषा राऊत यांच्यावर अविश्वास दाखवत बंडखोरी केली. आणि विधान परिषदेचे सभापती राम शिंदेसोबत जाण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर २२ एप्रिल रोजी उषा राऊत यांनी आपल्या नगराध्यक्षा पदाचा राजीनामा अविश्वास ठरावापूर्वीच दिला होता. राऊत यांच्यासोबत १५ पैकी ४ नगरसेवक राहिले होते. तदनंतर रोहिणी घुले ह्या भाजपाकडून २ मे २०२५ ला नगराध्यक्षापदी विराजमान झाल्या. यावेळी उर्वरीत काळासाठी दोन नगराध्यक्षा असतील असा फॉर्म्युला ठरला. मात्र कार्यकाळ पूर्ण होऊन देखील घुले राजीनामा देत नसल्याने पुन्हा गट फुटला. यावेळी राऊत आणि आमदार पवार यांच्या सोबत असणारे ४ नगरसेवकांनी राम शिंदे गटाबरोबर युती केली. आणि रोहिणी घुले यांच्यावर अविश्वास दाखल केला. अविश्वास ठरावापूर्वीच सोमवारी घुलेंनी राजीनामा दिला. यावेळी घुलेंसोबत ४ नगरसेवक तटस्थ राहिले.**

## महत्त्वाचे..

### विजेचा धक्का लागून तीन वर्षांच्या चिमुकलीचा मृत्यू

**अहिल्यानगर :** अवघ्या तीन वर्षांच्या प्रीती गांगुर्डेच्या निरागस आयुष्याचा शेवट एका निष्काळजी व्यवस्थेमुळे झाला. खेळण्याच्या, बागडण्याच्या आणि आईच्या कुशीत हसण्याच्या वयातच विजेच्या खांबाच्या स्पर्शाने तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. आज सोमवारी (६ जुलै) दुपारी अहिल्यानगर शहरातील स्टेशन रोड परिसरात घडलेल्या या हृदयद्रावक घटनेने संपूर्ण शहर सुन्न झाले असून परिसरात शोककळा पसरली आहे. घटनेनंतर भाजप नगरसेवक दत्ताभाऊ गाडळकर, नगरसेविका गीतांजली काळे आणि संकेत गव्हाळे यांनी घटनास्थळी धाव घेत महावितरणच्या कारभारावर संताप व्यक्त केला.

### झापुक I zupuk

**भक्तांनी मोठ्या**
**भक्तिभावाने**
**दान दिले**
**रक्षकांनी**
**खुशाल रामालाच**
**लुटले**
**आता खरी**
**आहे रामाची**
**परीक्षा**
**बघू आता राम**
**काय देतात**
**लुटारूंना शिक्षा**

**- कवी नवनाथ कुताळ**
**मो. ९४२२२३१८२५**

### महाबळेश्वरात शतकातील विक्रमी पाऊस!

## २४ तासांत तब्बल ५१३ मि.मी. पावसाची नोंद


**सातारा :** महाबळेश्वरमध्ये गेल्या २४ तासांत शतकातील विक्रमी अशा तब्बल ५१३ मि.मी. (२० इंच) पावसाची नोंद झाली आहे. झोडपून काढणाऱ्या या पावसाने तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले आहे. अनेक भागांत जमीन, रस्ते खचले आहेत. पुणे ते महाबळेश्वरसह अनेक रस्त्यांवर पाणी साचल्याने, तसेच दरडी कोसळल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली आहे. रस्ते बंद, झाडे उन्मळून पडणे, जमीन खचणे, वीजपुरवठ्याअभावी अंधार यामुळे जनजीवन पूर्णतः कोलमडले आहे.महाबळेश्वर परिसरात १ जूनपासून आजवर एकूण १७१७.४० मि.मी. (६७ इंच) पाऊस झाला आहे. गेल्या आठवड्यापासून पावसाचे जोरदार आगमन झाल्यावर यात मोठी भर पडलेली आहे.

# रोडे अर्बन निधीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश

## कोट्यवधींच्या ठेवींचा संशयित घोटाळा, चेअरमन, संचालक,व्यवस्थापकावर कारवाईचे निर्देश

दादा सोनवणे । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील रोडे अर्बन निधी लिमिटेडच्या कथित ठेवीदार फसवणूक प्रकरणात मोठी न्यायालयीन घडामोड घडली आहे. ठेवीदाराची फसवणूक, विश्वासघात आणि मोठी आर्थिक रक्कम परत न दिल्याच्या आरोपांची दखल घेत न्यायालयाने संबंधित संस्था, चेअरमन, संचालक, व्यवस्थापक आणि शाखा व्यवस्थापक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत. या आदेशामुळे संपूर्ण तालुक्यात खळबळ उडाली असून, निधी संस्थेच्या व्यवहारांवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




श्रीगोंदा तालुका फसवणुकीचे केंद्र बनतेय कि काय असा प्रश्न उपस्थित होऊ लागला आहे तालुक्यात मागील वर्षी सीस पे मध्ये हजारो कोट्यावधी रुपयांची फसवणूक झाली त्यातून सावरण्याच्या आगोदर पुन्हा समर्थ क्रॉप मध्ये कोट्यावधी रुपयांना तालुक्याची लुट झाली त्यानंतर विश्वासाने ठेवलेल्या ठेवीवर म्हणजे काष्टी येथील साईसेवा पतसंस्था व मल्टिस्टेस्ट मध्ये ठेवीदारांचे पैशे जवळपास बुडाले आहेत त्यानंतर आता रोडे अर्बन निधी लिमिटेड मध्ये सर्व सामान्य नागरिकांनी मोठ्या प्रमाणात फसवणूक झाल्याचा धक्कादायक प्रकार समोर यांप्रकरणी तक्रारदार हनुमंत कोंडीबा दांगट रा काष्टी यांनी न्यायालयात दाखल केलेल्या तक्रारीत म्हटले आहे कि रोडे अर्बन निधी लिमिटेड या संस्थेने जादा व्याजाचे आमिष दाखवून लाखो रुपयांच्या मुदत ठेवी स्वीकारल्या. मात्र मुदत संपल्यानंतर ठेवीची रक्कम आणि व्याज परत करण्यास टाळाटाळ करण्यात आली. वारंवार पाठपुरावा करूनही पैसे न मिळाल्याने अखेर न्यायालयाचे दार ठोठावावे लागल्याचे तक्रारीत नमूद आहे. तक्रारीनुसार, संबंधित पदाधिकाऱ्यांनी ठेवीदारांना उडवाउडवीची **(पान ४ वर)**

### तालुक्याचे लक्ष तपासाकडे

**न्यायालयाच्या आदेशानंतर आता श्रीगोंदा पोलिसांकडून नेमकी कोणती कलमे लावली जातात, किती जणांवर गुन्हा दाखल होतो आणि फसवणुकीची रक्कम किती आहे, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे. या प्रकरणातील तपासातून आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र रक्कम कोट्यवधींच्या घरात असण्याची शक्यता नाकारत येत नाही.**



# नियमांचा गुंता नव्हे, पारदर्शकतेचा मार्ग हवा!

विशेष संपादकीय
करण नवले (संपादक)

दिल्ली उच्च न्यायालयाने ओबीसी आरक्षणाच्या नियमांबाबत दिल्ली सरकारवर केलेले ताशेरे हे केवळ एका भरती प्रक्रियेपुरते मर्यादित नाहीत. हा निर्णय देशभरातील सर्व राज्य सरकारे, भरती संस्था आणि प्रशासकीय यंत्रणांसाठी एक महत्त्वाचा इशारा आहे. आरक्षणाचा उद्देश सामाजिक न्याय साधणे हा आहे; मात्र त्याची अंमलबजावणीच जर गोंधळाची, विसंगत आणि अस्पष्ट असेल, तर न्याय मिळण्याऐवजी अन्यायाची शक्यता वाढते. त्यामुळे न्यायालयाने उपस्थित केलेले प्रश्न अत्यंत मूलभूत आणि दूरगामी परिणाम करणारे आहेत. भारतीय राज्यघटनेने सामाजिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास घटकांना समान संधी मिळावी म्हणून आरक्षणाची तरतूद केली आहे. ही तरतूद कोणत्याही सरकारची कृपा नसून, संविधानाने दिलेला अधिकार आहे. त्यामुळे आरक्षणाची अंमलबजावणी करताना सरकारवर अधिक जबाबदारी येते. नियम स्पष्ट असावेत, प्रक्रिया सुलभ असावी आणि पात्र उमेदवारांना कोणत्याही प्रशासकीय अडथळ्यांमुळे वंचित राहावे लागू नये, ही किमान अपेक्षा आहे.

दिल्लीतील प्रकरणात न्यायालयाने एक महत्त्वाचे निरीक्षण नोंदवले. सरकारने वेळोवेळी अनेक अधिसूचना, परिपत्रके आणि पत्रे जारी केली. प्रत्येक दस्तऐवज वेगवेगळ्या भाषेत, वेगवेगळ्या संदर्भात आणि अनेकदा एकमेकांशी सुसंगत नसल्याने संपूर्ण व्यवस्थाच गोंधळात पडली. परिणामी, उमेदवाराने नेमका कोणता नियम लागू आहे, कोणते प्रमाणपत्र ग्राह्य आहे आणि कोणत्या अटींची पूर्तता करावी लागेल, हे समजणेच कठीण झाले. न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटले की, उमेदवाराने इंटरनेटवर विविध अधिसूचना शोधून त्यातून स्वतःच नियमांचा अर्थ लावावा, अशी अपेक्षा करणे अन्यायकारक आहे. आजच्या काळात सरकारी भरती प्रक्रिया अधिकाधिक डिजिटल होत आहेत. अर्ज ऑनलाइन भरले जातात, प्रमाणपत्रे अपलोड केली जातात आणि संपूर्ण निवड प्रक्रिया संगणकीकृत असते. मात्र, नियमच अस्पष्ट असतील तर डिजिटल व्यवस्थेचाही काही उपयोग राहत नाही. उलट तांत्रिक कारणांमुळे अनेक पात्र उमेदवार बाद होतात. त्यामुळे पारदर्शकता ही केवळ ऑनलाइन प्रक्रिया सुरू करण्याने येत नाही; ती स्पष्ट नियम, एकसंध मार्गदर्शक सूचना आणि सर्वांना समानपणे समजतील अशा भाषेमुळे येते.

या प्रकरणात याचिकाकर्त्याची जात केंद्रीय ओबीसी यादीत असल्याचे न्यायालयाने मान्य केले. मात्र, भरतीच्या जाहिरातीत दिल्ली सरकारने जारी केलेले ओबीसी प्रमाणपत्र आवश्यक असल्याची स्पष्ट अट होती. उमेदवाराने त्या अटीला आव्हान न देता अर्ज केला असल्याने नंतर ती अट चुकीची असल्याचा दावा करता येणार नाही, असे न्यायालयाने नमूद केले. कायद्याच्या दृष्टीने हा निष्कर्ष योग्य असला तरी, अशा अटींची स्पष्ट माहिती प्रत्येक उमेदवारापर्यंत पोहोचविण्याची जबाबदारी सरकारचीच आहे, हेही तितकेच खरे आहे. या निमित्ताने देशातील इतर राज्यांतील भरती प्रक्रियांकडेही पाहण्याची गरज आहे. अनेकदा जाहिरातींमध्ये ''शासनाच्या वेळोवेळी जारी केलेल्या नियमांनुसार'' असा एकच उल्लेख करून जबाबदारी झटकली जाते. प्रत्यक्षात कोणता शासन निर्णय लागू आहे, कोणती अधिसूचना रद्द झाली आहे, कोणत्या प्रमाणपत्राचा नमुना ग्राह्य आहे किंवा अंतिम मुदतीपर्यंत कोणते बदल झाले आहेत, याची स्पष्ट माहिती उमेदवारांना मिळत नाही. परिणामी, न्यायालयात खटले वाढतात, भरती प्रक्रिया वर्षानुवर्षे रखडतात आणि हजारो जागा रिक्त राहतात.

महाराष्ट्रासह अनेक राज्यांमध्येही आरक्षण, जातवैधता, नॉन-क्रीमी लेयर, ईडब्ल्यूएस, आर्थिक निकष, निवासी अटी आणि प्रमाणपत्रांच्या वैधतेबाबत वेळोवेळी वाद निर्माण होत असतात. यातील मोठा भाग नियमांच्या चुकीच्या किंवा अपुऱ्या मांडणीमुळे निर्माण होतो. अनेकदा शासन निर्णय आणि भरती जाहिराती यांच्यात विसंगती दिसून येते. यामुळे उमेदवार आर्थिक, मानसिक आणि शैक्षणिकदृष्ट्या मोठ्या संकटाला सामोरे जातात. सरकारने प्रत्येक भरती जाहिरातीसोबत ''संपूर्ण पात्रता मार्गदर्शक पुस्तिका'' प्रकाशित करणे आवश्यक आहे. त्यात पात्रतेचे निकष, आवश्यक प्रमाणपत्रे, त्यांचे नमुने, जारी करणारी प्राधिकरणे, अंतिम दिनांक, लागू असलेले शासन निर्णय आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न यांचा समावेश असावा. याशिवाय, नियमांमध्ये बदल झाल्यास त्याची माहिती सर्व अर्जदारांना अधिकृत संदेशाद्वारे देण्याची सक्ती असावी. ही व्यवस्था उभी राहिल्यास न्यायालयीन वाद मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकतात.

आरक्षण ही सामाजिक न्यायाची प्रक्रिया आहे; ती प्रशासकीय सापळा बनता कामा नये. नियम जितके गुंतागुंतीचे असतील तितकी भ्रष्टाचार, मध्यस्थी आणि न्यायालयीन संघर्षाची शक्यता वाढते. उलट स्पष्ट नियम, सुलभ प्रक्रिया आणि उत्तरदायी प्रशासन यामुळेच आरक्षणाचा खरा लाभ पात्र घटकांपर्यंत पोहोचू शकतो. दिल्ली उच्च न्यायालयाचा हा निर्णय एका उमेदवाराची याचिका फेटाळणारा असला, तरी त्यामागील संदेश अधिक व्यापक आहे. शासनाने नागरिकांकडून नियमांचे पालन अपेक्षित ठेवायचे असेल, तर त्या नियमांची भाषा, रचना आणि अंमलबजावणीही तितकीच स्पष्ट असली पाहिजे. कायद्याची गुंतागुंत ही प्रशासनाच्या अपयशाची खूण असते; तर स्पष्टता ही सुशासनाची ओळख असते. सामाजिक न्यायाचा पाया मजबूत करायचा असेल, तर आरक्षणाच्या धोरणांमध्ये गोंधळ नव्हे, तर पारदर्शकता आणि उत्तरदायित्व हाच पुढील काळाचा

## मालुंजे ग्रामस्थांचा तालुका पोलीस ठाण्यासमोर भरपावसात ठिय्या

### घुगे गोळीबारातील हल्लेखोरांवर कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**संगमनेर** : संगमनेर तालुक्यातील मालुंजे येथील माजी उपसरपंच तथा भाजप तालुका सरचिटणीस संदीप घुगे यांच्यावरती झालेल्या गोळीबार प्रकरणातील आरोपींना अद्याप अटक करण्यात आलेली नसल्याच्या निषेधार्थ मालुंजे गावातील शेकडो ज्येष्ठ नागरिक महिला तरुण ग्रामस्थांनी तालुका पोलीस ठाण्यासमोर भरपावसामध्ये ठिय्या आंदोलन सुरू केले. जोपर्यंत आम्हाला न्याय मिळत नाही तोपर्यंत आम्ही येथून हटणार नाही असा पवित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतला त्यामुळे काही वेळ पोलीस ठाण्या समोर तमाम पूर्ण वातावरण निर्माण झाले होते.

विशाल हौशीराम खेमनर व त्याच्या साथीदारांबाबत वेळोवेळी तालुका पोलीस निरीक्षक प्रवीण साळुंखे यांना माहिती देऊनही कोणतीही कारवाई केली नाही. त्यामुळेच ही गंभीर घटना घडली आहे. ही घटना घडून सहा दिवस उलटून गेले तरी पोलीस हल्लेखोरांना पकडू शकले नाही. हल्लेखोरांना पकडण्यासाठी पोलिसांकडून कुठलीही प्रयत्न झाले नाही.म्हणून आम्हाला ठिय्याआंदोलन करावे लागले जर या हल्लेखोरांना पोलिसांनी तातडीने अटक केली नाही, तर रस्त्यावर उतरून यापेक्षाही तीव्रस्वरूपाचे आंदोलन केले जाईल जाईल त्यानंतर निर्माण होणार्या सर्व परिस्थितीची जबाबदारी संगमनेर तालुका पोलीस प्रशासनाची राहील,'' असा इशारा भाजपचे सरचिटणीस आणि मालुंजे माजी उपसरपंच संदीप घुगे यांनी पोलीस प्रशासनाला दिला आहे.

संगमनेर तालुक्यातील मालुंजेचे माजी सरपंच आणि भाजप तालुका सरचिटणीस संदीप घुगे यांच्यावरती १ जुलै २०२६ रोजी विशाल हौशीराम खेमनर (अंभोरे), प्रवीण ठकाजी पुणेकर, व सुदर्शन शिवाजी श्रीराम (डिग्रस) यांच्यासह अन्य तीन अशा सहा जणांनी संदीप घुगे यांच्यावरती गोळीबार करून तलवारीने त्यांच्या घराच्या खिडक्या तोडत त्यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. याप्रकरणी स्वतः संदीप घुगे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी वरील सहा जणांच्या विरोधात विविध कलमानव्ये गुन्हा दाखल केला आहे घटनेनंतर, लगेचच सर्वच हल्लेखोर घटनास्थळावरून फरार झाले त्या दिवसापासून आजतगायत तालुका पोलीस त्यांना पकडू शकले नाही त्यामुळे डिग्रस ग्रामस्थांनी तालुका पोलिसांविषयी तीव्र संताप व्यक्त करत हल्लेखोरांना लवकरात लवकर अटक करा आम्हाला न्याय मिळाल्या शिवाय आम्ही येथून हटणार नाही असा पवित्रा सर्व आंदोलनकर्त्यांनी घेतला. हल्लेखोरांना तात्काळ अटक करा'', ''न्याय द्या, आम्हाला न्याय द्या'' अशा घोषणांनी तालुका पोलीस ठाण्याचा परिसर दणाणून गेला होता हल्लेखोरांना तातडीने अटक करून त्यांच्यावर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महिला आणि तरुण आंदोलनकर्त्यांनी केली आहे.

## पुणतांबेकरांना पेरणीयोग्य पावसाची अपेक्षा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**पुणतांबा** :' जून महिना संपून जूलै महिन्याचा पहिला आठवडा पूर्ण झाला तरी पुणतांबा परिसरात अजूनही पेरणीयोग्य पाऊस न पडल्यामुळे परिसरातील शेतकरी वर्गाची चिंता वाढली महाराष्ट्रातील सर्व भागात पावसाने थैमान घातले आहे मात्र परिसरात अजूनही पावसाचा जोर वाढलेला नाही जूनअखेर पुणतांबा गावात सरासरी सव्वा ते दीड इंच पावसाची नोंद झालेली आहे. दिवसभर अत्यंत ढगाळ वातावरण असते मात्र बुरबुर पाऊस सुरु असतो पावसाअभावी परिसरात पाणीटंचाई तसेच जनावरांच्या चाऱ्याची टंचाई जाणवत आहेवाडया वसत्यावर अनेक ठिकाणी विहीरीच्या पाण्याने तळ गाठला आहे. शेतकरी वर्गाने पाऊस वेळेवर होईल या आशेने जमिनीच्या मशागती अगोदरच पूर्ण केल्या आहे खरीप हंगामासाठी आवश्यक बीबीयाणे ख ते आगोदरच खरेदी केली आहेत. मात्र पाऊस सातत्याने हुलकावणी देत असल्यामुळे शेतकरी वर्ग अस्वस्थ झालेला आहे. नाशिक जिल्ह्यात हवामान खात्याने आज रेड ॲलर्ट जाहिर केलेला आहे अहिल्या नगर जिल्हयात पावसाचा अंदाज सांगितला आहे. त्यामुळे शेतकरी वर्गाच्या अपेक्षा उंचावल्या आहेत.

## ग्रामपंचायतीचे प्रलंबित बिले तात्काळ अदा करा; कंत्राटदारांचे आ. ओगले यांना साकडे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील कार्यकाळ संपलेल्या ग्रामपंचायतींमधील विकासकामांची कोट्यवधी रुपयांची बिले अद्याप प्रलंबित असल्याने शासकीय कंत्राटदार मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. सध्या या ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक राजवट असून, तांत्रिक कारणांमुळे हक्काचे पैसे रोखल्याने कंत्राटदारांचे दैनंदिन व्यवहार पूर्णपणे ठप्प झाले आहेत.

या गंभीर प्रश्नावर बेलापूर, सराला, वडाळा महादेव यांसह विविध गावांतील कंत्राटदारांच्या शिष्टमंडळाने आमदार हेमंत ओगले यांची भेट घेऊन त्यांना मागण्यांचे निवेदन दिले.आमदार ओगले यांनी या विषयाचे गांभीर्य ओळखून, जिल्हा प्रशासन व वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे तात्काळ पाठपुरावा करून प्रलंबित बिलांचा प्रश्न विनाविलंब मार्गी लावण्याचे सकारात्मक आश्वासन कंत्राटदारांना दिले.

## त्रिमूर्ती फार्मसी कॉलेजला उत्कृष्ट शैक्षणिक मानांकन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**नेवासा** : नेवासा फाटा येथील त्रिमूर्ती ग्रामीण फार्मसी कॉलेजने (खडके) शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ एमएसीबीटीई द्वितीय संस्था अवेक्षण अहवालात उत्कृष्ट कामगिरीची नोंद करत उत्कृष्ट मानांकन पटकावले आहे.

हा देदीप्यमान विजय संस्थेचे संस्थापक शिक्षण महर्षी साहेबराव घाडगेपाटील यांच्या दूरदर्शी संकल्पनेचा परिपाक आहे. त्यांचाच विचारांचा वारसा पुढे चालवत, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. सुमतीताई घाडगे पाटील व उपाध्यक्षा ॲड.स्नेहलताई घाडगे पाटील यांच्या खंबीर नेतृत्वाखाली संस्थेने यशाचे हे शिखर सर केले आहे.

या प्रवासात संस्थेच्या सहसचिव डॉ. श्रुती आमले पाटील यांचे अविरत प्रोत्साहन मोलाचे ठरले.हे मानांकन मिळवण्यात प्रशासकीय समन्वयक डॉ.अनुराधा गोरे यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्रा.अभिजीत रोडे,प्रा.अर्चना शेरे,प्रा.कृष्णा डमाळे,प्रा.सागर सोलाट यांच्यासह डिप्लोमा फार्मसीच्या सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी घेतलेली अपार मेहनत अत्यंत महत्त्वाची ठरली.

या यशाबद्दल सर्व स्तरातून महाविद्यालयाचे कौतुक होत आहे. एमएसबीटीई च्या या उत्कृष्ट मानांकनामुळे चालू शैक्षणिक वर्षाच्या डी. फार्मसी प्रवेश प्रक्रियेसाठी दर्जेदार शिक्षणाचा ध्यास घेणाऱ्या विद्यार्थ्यांची आणि पालकांची या महाविद्यालयाला पहिली पसंती मिळत आहे.




## ज्ञानमंदिर जपण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करावेत : भारतराव गीते

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**अश्वी** : शिक्षण हे समाजाच्या प्रगतीचे प्रभावी साधन असून ग्रामीण भागातील ज्ञानमंदिरे व त्यामध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे संवर्धन करण्यासाठी सर्वांनी एकत्रित प्रयत्न करणे ही काळाची गरज आहे, असे प्रतिपादन भाजपचे अहमदनगर जिल्हा सरचिटणीस भारतराव गीते यांनी केले.

दिव्य ज्योत फाउंडेशन, संभाजीनगर यांच्या वतीने जिल्हा परिषद केंद्रशाळा, वस्तीशाळा आणि प्रवरा माध्यमिक विद्यालयातील सुमारे ४०० विद्यार्थ्यांना मोफत उच्च दर्जाच्या शाई पेनचे वाटप करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते.




गीते म्हणाले, ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळांमध्ये दर्जेदार शिक्षण मिळत असतानाही पालकांचा कल खासगी शाळांकडे वाढत आहे. त्यामुळे अनेक ग्रामीण शाळा पटसंख्येअभावी बंद होण्याच्या मार्गावर आहेत. अशा परिस्थितीत पिंपरी लौकी येथील ग्रामस्थ व दाते ज्ञानमंदिर टिकवण्यासाठी पुढाकार घेत आहेत, ही अभिमानाची बाब आहे.

दिव्य ज्योत फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश मुंडे यांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. भविष्यात विद्यार्थ्यांना डिजिटल शिक्षणाची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही समाजाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन गीते यांनी केले.कार्यक्रमास प्रवरा माध्यमिक विद्यालयाचे अध्यक्ष भाऊसाहेब मुंडे, माजी प्राचार्य अशोकराव गीते, किशोर सांगळे, निलेश मुंडे, मुख्याध्यापक राजेंद्र बोंद्रे, राजेंद्र खेमनर, शिक्षक पर्वत सर तसेच विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## यशवंत सेना व जयमल्हार संस्थेचा राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा उत्साहात




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी** : यशवंत सेना महाराष्ट्र राज्य आणि जयमल्हार शैक्षणिक व सामाजिक संस्थेच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार वितरण सोहळा अहिल्यानगर येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात मोठ्या उत्साहात पार पडला. राज्यभरातील शिक्षण, सामाजिक, पत्रकारिता, कला, क्रीडा व विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या ६५ गुणवंतांचा यावेळी सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ देऊन गौरव करण्यात आला. सामाजिक, शैक्षणिक आणि पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे राहुरी खुर्द (ता. राहुरी) येथील युवा पत्रकार प्रमोद अंबादास डफळ यांना ''लोकमाता अहिल्यादेवी होळकर आदर्श पत्रकारिता पुरस्कार – २०२६'' प्रदान करून सन्मानित करण्यात आले. त्यांच्या कार्याची दखल घेत राज्यस्तरावरील हा प्रतिष्ठेचा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने राहुरी तालुक्यासाठी हा अभिमानाचा क्षण ठरला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अरणगाव येथील महाविद्यालयाचे प्राचार्य बबनराव भोंगे हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा आमदार संग्राम जगताप उपस्थित होते. तसेच पत्रकार प्रमोद वारी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते लोकमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून सोहळ्याचे उद्घाटन करण्यात आले. जयमल्हार शैक्षणिक व सामाजिक संस्थेचे अध्यक्ष कांतिलाल जाडकर यांनी संस्थेच्या कार्याचा आढावा घेत पुरस्कार उपक्रमामागील उद्देश स्पष्ट केला. सन १९९६ पासून संस्था विविध सामाजिक, शैक्षणिक व जनहिताचे उपक्रम सातत्याने राबवत असून राज्यभरातील गुणवंतांचा गौरव करण्याची परंपरा जपली असल्याचे त्यांनी सांगितले.

यावर्षीच्या पुरस्कारांसाठी राज्यभरातून मोठ्या प्रमाणावर प्रस्ताव प्राप्त झाले होते. निवड समितीने विविध क्षेत्रांतील उल्लेखनीय कार्याची दखल घेत ६५ गुणवंतांची निवड केली. अहिल्यानगर, पुणे, मुंबई, ठाणे, नाशिक, धुळे, जळगाव, बीड, जालना, छत्रपती संभाजीनगर, सोलापूर, अमरावती आदी जिल्ह्यांतील पुरस्कारार्थींना यावेळी सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाच्या शेवटी अजय जाडकर यांनी आभार मानले.

## राहुरी स्टेशन-तांदूळवाडी रस्ता रुंदीकरणाची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**राहुरी** : तालुक्यातील तांदूळवाडी परिसरात शुक्रवारी सायंकाळी स्कूलबस पलटी होऊन झालेल्या अपघातात १५ ते २० विद्यार्थिनी जखमी झाल्या होत्या. बसचे स्टेअरिंग निकामी झाल्याने बस १०-१५ फूट खोल खड्ड्यात कोसळली. जखमींवर स्थानिक रुग्णालयांत उपचार सुरू आहेत. या पार्श्वभूमीवर, बाजार समितीचे सभापती अरुण तनपुरे आणि



माजी नगराध्यक्षा उषाताई तनपुरे यांनी कोंडवड व शिलेगाव परिसरातील जखमी विद्यार्थिनींच्या घरी जाऊन त्यांची विचारपूस केली व पालकांना धीर दिला. गंभीर जखमींच्या उपचारासाठी सर्वतोपरी मदतीचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी संतप्त पालकांनी राहुरी स्टेशन ते तांदूळवाडी या अरुंद व धोकादायक रस्त्यामुळे अपघात होत असल्याचे सांगत रस्ता रुंदीकरणाची तीव्र मागणी केली. अरुण तनपुरे यांनी या प्रश्नावर संबंधित विभागाकडे तातडीने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले. भेटीप्रसंगी अनेक ग्रामस्थ उपस्थित होते.

## श्रीरामपूरात बंदी असलेली खते-औषधांची सर्रास विक्री

### विधानपरिषदेत आ. खोत यांचा सरकारवर निशाणा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**माळवाडगाव** : श्रीरामपूर तालुक्यात बंदी असलेली खते व कृषी औषधे सर्रास विकली जात असल्याचा मुद्दा विधानपरिषदेच्या पावसाळी अधिवेशनात शेतकरी संघटनेचे आमदार सदाभाऊ खोत यांनी लक्षवेधीद्वारे उपस्थित करत सरकार व कृषी विभागावर जोरदार टीका केली.

आ. खोत म्हणाले की, बंदी असलेल्या कृषी औषधांच्या विक्रीबाबत श्रीरामपूर कृषी विभागाने वेळेत कारवाई केली नाही. त्यामुळे शेतकरी चळवळीचे कार्यकर्ते ॲड. अजित काळे यांना न्यायालयात दाद मागावी लागली. न्यायालयाच्या आदेशानंतरच कृषी विभागाने संबंधित प्रकरणाची दखल घेत कारवाई केली, असे त्यांनी सांगितले.

खालच्या स्तरावरील कृषी अधिकाऱ्यांपासून ते कृषी अधीक्षक आणि कृषी आयुक्तालयापर्यंत संपूर्ण यंत्रणा अस्तित्वात असतानाही बंदी असलेली उत्पादने बाजारात कशी विकली जातात, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. बंदी असलेल्या खते, औषधे व बियाण्यांच्या विक्रीत साखळी पद्धतीने गैरप्रकार होत असल्याचाही आरोप त्यांनी केला.

यावर्षी शेतकरी आधीच नैसर्गिक संकटांचा सामना करत असताना शासनाने बंदी असलेली खते, औषधे आणि बियाण्यांच्या विक्रीवर तातडीने प्रभावी निर्बंध घालून कठोर कारवाई करावी, अशी मागणी आ. खोत यांनी सभागृहात केली.

## गुहा-शिबलापूर रस्त्याची दुरावस्था ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**झरेकाठी** : राहूरी तालुक्यातील गुहा ते शिबलापूर या २२ किलोमीटर अंतराच्या रस्त्याची अत्यंत दुरवस्था झाली असून, जागोजागी पडलेल्या खड्ड्यांमुळे प्रवाशांना जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. हा नागरिकांनी ''खड्डे वाचवा आणि बक्षीस मिळवा'' अशी उपरोधिक मोहीम राबवून निषेध केला.या पार्श्वभूमीवर, 'डॉ. सुजयदादा राधाकृष्ण विखे पाटील प्रणित जनसेवा युवा मंच'चे सर्व सदस्य, बलराज डुकरे, सरपंच सतीशराव जोशी आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी एकत्र



रस्ता संगमनेर आणि राहुरी अशा दोन तालुक्यांच्या सीमेवर असल्याने, दोन्ही बाजूंचे सार्वजनिक बांधकाम विभाग एकमेकांकडे बोट दाखवत आहेत. या प्रशासकीय उदासीनतेविरोधात संतप्त येत तीव्र संताप व्यक्त केला आहे. येत्या काही दिवसांत रस्त्याचे काम सुरू न झाल्यास तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.

## माहिती अधिकारांतर्गत माहिती देण्यास टाळाटाळ; अधिकाऱ्यांवर कारवाईची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**सोनई** : माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविलेली माहिती वेळेत न दिल्याचा आरोप करत मुळा पाटबंधारे विभागातील संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मोहन दादा शेगर यांनी जिल्हाधिकारी, अहिल्यानगर यांच्याकडे लेखी तक्रारीद्वारे केली आहे. माहिती न मिळाल्यास आमरण उपोषण करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

शेगर यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ३० सप्टेंबर २०२५ रोजी मुळा उजवा व डावा कालव्यावरील २०२४-२५ या आर्थिक वर्षातील कार्यारंभ आदेशांसह विविध कागदपत्रांची माहिती माहिती अधिकार कायद्यांतर्गत मागविण्यात आली होती.

मात्र, राहुरी-घोडेगाव-नेवासा विभागाचे उपविभागीय अभियंता यांनी माहिती देण्यास टाळाटाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

३० ऑक्टोबर २०२५ रोजी प्रथम अपील दाखल करूनही प्रत्येक सुनावणीला उपस्थित राहूनही माहिती देण्यात आली नसल्याचे तक्रारीत नमूद आहे. तसेच संबंधित अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचाही आरोप करण्यात आला आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात कालवा दुरुस्ती व इतर कामांमध्ये शासन निधीचा गैरवापर, निकृष्ट दर्जाची कामे तसेच काही कामे न करताच बोगस बिले काढून कोट्यवधी रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचा संशयही तक्रारीत व्यक्त करण्यात आला आहे. माहिती अधिकार कायद्यानुसार ३० दिवसांच्या आत माहिती देणे बंधनकारक असताना त्याचे पालन झाले नसल्याचा दावा करत संबंधित उपविभागीय अधिकारी, अपिलीय अधिकारी व कार्यकारी अभियंत्यावर कारवाई करण्याची मागणी शेगर यांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांबाबत संबंधित विभागाची अधिकृत भूमिका अद्याप समोर आलेली नाही.

## प्रो कबड्डी स्टार शिवम पटारे यांना स्व.मधू पाटील पुरस्कार जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**
**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील प्रो कब्बडी स्टार शिवम अनिल पटारे यांना स्व.मधु पाटील पुरस्कार नूकताच जाहीर झाला असून, हा पुरस्कार दि.१५ जुलै २०२६ रोजी २६ व्या कबड्डी दिनाचे औचित्य साधत स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर नाट्यगृह, मारूती मंदिर रत्नागिरी येथे आयोजीत कार्यक्रमात प्रदान करण्यात येणार आहे.

जिद्द व चिकाटीच्या जोरावर टाकळीभानचे भूमीपूत्र शिवम अनिल पटारे यांनी कबड्डी खेळात नैपुण्य मिळविले. प्रो कबड्डी लीग मध्ये आपल्या चमकदार खेळीने त्यांनी अनेक सिजन गाजविले व कबड्डी प्रेमींच्या मनात आपला ठसा उमटविला. अशा या खेळाडूच्या चमकदार कामगिरीची दखल घेत त्यांना हा पुरस्कार जाहीर केला आहे.

महाराष्ट्र कबड्डी असोसिएशनच्या वतीने १५ जुलै हा दिवस कबड्डीमहर्षी स्व.शंकरराव(बुवा)साळवी यांचा जन्मदिवस ''कबड्डीदिन'' म्हणून




प्रतिवर्षी साजरा करण्यात येतो. त्या निमित्ताने गतवर्षी झालेल्या वरिष्ठ गट राज्य/राष्ट्रीय अजिंक्यपद कबड्डी स्पर्धेत विशेष कामगिरी करणार्या पुरूष गट राज्य संघातील उत्कृष्ट खेळाडूंचा स्व.मधु पाटील पुरस्काराने व महिला खेळाडूंचा स्व.अरूणा साटम पुरस्काराने प्रत्येकी रूपये दहा हजार देवून सन्मान केला जातो. बुधवार दि. १५ जुलै २०२६ रोजी रत्नागिरी जिल्हा असोसिएशनच्या यजमानपदाखाली हा पुरस्कार शिवम अनिल पटारे यांना प्रदान करण्यात येणार आहे. शिवम पटारे यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल कबड्डी प्रेमी, सर्वच क्षेत्रातील मान्यवर तसेच टाकळीभान ग्रामस्थांनी अभिनदन केले आहे.,

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय –कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## जिल्हा नियोजन समितीवर शिवसेनेचे विठ्ठल घोरपडे



**संगमनेर** : शिवसेनेचे जिल्हा संघटक विठ्ठल विठ्ठल रावसाहेब घोरपडे यांची जिल्हा नियोजन समितीवर विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. शिवसेनेचे जिल्हा संघटक म्हणून कार्यरत असलेले विठ्ठल घोरपडे यांनी घोरपडे यांनी उपमुख्यमंत्री व शिव सेना पक्षाचे मुख्य नेते एकनाथ शिंदे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व आमदार अमोल खताळ यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटन बांधणी बरोबरच विविध जन हिताच्या प्रश्नां वर सातत्याने काम केले आहे. त्यांनी विशेषतः निळवंडे पाटपाणी योजने च्या लढ्यामध्ये गेली १५ वर्षांपासून लढा दिला आहे तळेगाव निमोण सारख्या दुष्काळग्रस्त भागाला पाणी मिळावे, आणि या भागातील पाणी टंचाई दूर व्हावी तसेच ग्रामीण भागा तील विकासकामांना गती मिळावी यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. त्यांच्या या कार्याची दखल घेत जिल्हा नियोजन समिती च्या सदस्यपदी त्यांची निवड केली आहे. त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरातून त्यांचे अभिनंदन होत आहे.

## नवयुवक कुंभार समाज विकास संस्थेच्या जिल्हा युवक अध्यक्षपदी सचिन जगदाळे

**पुणतांबा** : नवयुवक कुंभार समाज विकास संस्थेच्या जिल्हा युवक अध्यक्षपदी पुणतांबा येथील सचिन निवृत्ती जगदाळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे त्यांच्या नियुक्तीचे पत्र संस्थेचे राज्य अध्यक्ष निलेश राऊत यांनी नुकतेच दिले. जगदाळे यांच्या निवडीबद्दल त्यांचे माजी सरपंच डॉ धनंजय धनवटे, बाळासाहेब चव्हाण, दत्तात्रेय झोजे, सदानंद नवले, नितीन भगत, अंबादास इंगळे, अमोल डोके, विजय जगदाळे, अशोक राऊत, संजय टोर्फे आदी ग्रामस्थांनी अभिनंदन केले आहे. कुंभार समाजाच्या प्रश्नासाठी आपण सदैव प्रयत्न करू असा विश्वास जगदाळे यांनी यावेळी व्यक्त केला.

## नेवासा शहरात फॉग मशीन व बीसी पावडर फवारणीची मागणी



**नेवासा** : शहरातील वाढती अस्वच्छता, साचलेला कचरा आणि डासांच्या प्रादुर्भावामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून शहरात तातडीने फॉग मशीनद्वारे फवारणी तसेच बीसी पावडरची फवारणी करावी, अशी मागणी नगरसेवक व आरोग्य-स्वच्छता समितीचे सभापती स्वप्नील मापारी यांनी नगरपंचायतीकडे निवेदनाद्वारे केली आहे. मुख्याधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात त्यांनी म्हटले आहे की, अनेक प्रभागांमध्ये सात ते दहा दिवस कचरा गाड्या फिरकल्या नसल्याने जागोजागी कचऱ्याचे ढीग साचले आहेत. कुजलेल्या कचऱ्यामुळे दुर्गंधी पसरली असून अळ्या व डासांची संख्या वाढली आहे. बुधवारी नेवासा शहरातून श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखीचे प्रस्थान होणार असून हजारो वारकरी शहरात येणार आहेत. तसेच आषाढी व कामिका एकादशीनिमित्तही मोठी गर्दी अपेक्षित आहे. त्यामुळे दिंडी मार्गासह संपूर्ण शहरात युद्धपातळीवर स्वच्छता मोहीम राबवून फॉग मशीन व बीसी पावडरची फवारणी तातडीने करावी, अशी मागणी मापारी यांनी केली. हे निवेदन नगरपंचायतीचे प्रशासकीय अधिकारी सागर झावरे यांना देण्यात आले.

## राज्यस्तरीय जलतरण स्पर्धेसाठी विखे पाटील सैनिक स्कूलच्या २१ जलतरणपटूंची निवड

**लोणी** : लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या लोणी येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सैनिक स्कूल, लोणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय जलतरण चाचणी स्पर्धेत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत राज्यस्तरीय स्पर्धेसाठी तब्बल २१ खेळाडूंनी गुणवत्तेच्या जोरावर निवड मिळवली. या स्पर्धेत अहिल्यानगर जिल्ह्यातील २५ शाळांमधील सुमारे ३०० जलतरणपटूंनी सहभाग घेतला. विविध वयोगटांतील स्पर्धांमध्ये चुरशीच्या लढती रंगल्या असून सहभागी खेळाडूंनी उत्कृष्ट जलतरण कौशल्याचे प्रदर्शन केले. स्पर्धेचे उद्घाटन सैनिक स्कूलचे कर्नल सुभाष घोडागेरी यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. यावेळी प्राचार्य राजेश माघाडे, जिल्हा सचिव बाबर तसेच अखिल शेख, सर्वेश देशमुख, प्रणित ठोकळे, माणिक गायकवाड, योगिता तनपुरे, सुचित्रा तांबे, अजित चेचरे व संदीप ईघे यांच्या मार्गदर्शनाखाली स्पर्धेचे नियोजन यशस्वीरित्या पार पडले. राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झालेले खेळाडू असे अंश काळे, ओंकार क्षीरसागर, ध्रुव विश्वास, बिशाल भारती, सक्षम सुकाळे, ओम हातणकर, राजवर्धन पाटील, साईराज अदनाक, अर्णव पळशीकर, श्रेय गांधी, वेदांत रेपे, हर्ष गडगे, मिथिलेश रायकवाड, दर्शन अवचर, अर्नेश औटी, शौर्य गायकवाड, अथर्व शिंदे, मलोई सिंघानिया, गौरव चव्हाण, स्वराज नागडे, संस्कार भूमकर, मलय सिंघानिया, गौरव चव्हाण. या सर्व खेळाडूंनी फ्रीस्टाईल, ब्रेस्टस्ट्रोक, बॅकस्ट्रोक आणि इंडिव्हिज्युअल मेडले या विविध प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करून राज्यस्तरीय स्पर्धेतील स्थान निश्चित केले.

# पंढरपूर आषाढी वारी : दिंड्यांसाठी १०८ रुग्णवाहिका सेवा सज्ज




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : आषाढी वारीनिमित्त अहिल्यानगर जिल्ह्यातून पंढरपूरकडे प्रस्थान करणाऱ्या सर्व दिंड्यांसाठी महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवेअंतर्गत सुमित कंपनीमार्फत १०८ आपत्कालीन रुग्णवाहिका सेवा सुनियोजित पद्धतीने उपलब्ध करून देण्यात आली आहे.

अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक वारकऱ्यांना पायी प्रवासादरम्यान कोणत्याही प्रकारची आरोग्यविषयक अडचण उद्भवल्यास तात्काळ वैद्यकीय मदत मिळावी, यासाठी अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणांनी सुसज्ज अशा १०८ रुग्णवाहिका तैनात करण्यात आल्या आहेत.

जिल्हा व्यवस्था पक कांचन बिडवे (आहेर )यांनी सांगितले की, अहिल्यानगरमधून तळेगाव, कर्जत या मार्गावरून पंढरपूरकडे जाणाऱ्या दिंड्यांसाठी विशेष नियोजन करण्यात आले असून आवश्यक त्या ठिकाणी १०८ रुग्णवाहिका सज्ज ठेवण्यात आल्या आहेत. भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी प्रशिक्षित वैद्यकीय कर्मचारी व आवश्यक औषधसामग्रीसह ही सेवा उपलब्ध राहणार आहे. यासोबतच, महाराष्ट्र शासन आणि सुमित कंपनी यांच्या समन्वयातून अहिल्यानगर जिल्ह्यात १०८ रुग्णवाहिका सेवा सुरळीतपणे सुरू असून, मा. डॉ. संजय घोगरे यांनी स्वतः या व्यवस्थेवर लक्ष ठेवून संपूर्ण यंत्रणा सज्ज ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत. अहिल्यानगरमध्ये वारकऱ्यांना १०८ रुग्णवाहिकेद्वारे सेवा देण्यात येत आहे.

अहिल्यानगर ते तळेगाव ते कर्जत मार्गावरील पंढरपूरकडे जाणाऱ्या वारकऱ्यांसाठी स्वतंत्र १०८ रुग्णवाहिका राखीव ठेवण्यात आली आहे. महाराष्ट्र शासन व सुमित कंपनीच्या माध्यमातून १०८ रुग्णवाहिका सेवा सुरळीत सुरू आहे.

मा. डॉ. संजय घोगरे यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण यंत्रणा कार्यरत असून वारकऱ्यांच्या आरोग्य सुरक्षेसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे.

## सी. डी. जैन महाविद्यालयात बिझनेस मॅनेजमेंट व सीए अभ्यासक्रम सुरु

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : ग्रामीण भागातील शेतकरी, कष्टकरी व कामगार वर्गातील विद्यार्थ्यांना दर्जेदार आणि उच्च दर्जाचे व्यावसायिक शिक्षण एकाच छताखाली उपलब्ध व्हावे, या उदात्त हेतूने रयत शिक्षण संस्थेच्या चंद्ररूप डाकले (सी. डी.) जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून एम.बी.ए, एम.सी.ए, आणि बी.बी.ए,सी.ए, हे नवीन व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्यात आले आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील एखाद्या पारंपारिक महाविद्यालयाला असा व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू करण्याची ही प्रथमच संधी मिळाली आहे, अशी माहिती रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरच्या प्रमुख व मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने यांनी पत्रकार परिषदेत दिली. रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शरदचंद्रजी पवार, मॅनेजिंग कौन्सिल सदस्या खा. सुप्रियाताई सुळे, दिलीपराव वळसे पाटील, उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार, सरोजताई पाटील, संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी, सचिव विकास देशमुख, विद्या परिषद सदस्य प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य अजितकुमार पाटील तसेच 'सारथी'चे संचालक पासलकर यांच्या सहकार्याने व मार्गदर्शनातून हे अभ्यासक्रम सुरू होत आहेत. यासाठी रयत शैक्षणिक संकुल श्रीरामपूरच्या प्रमुख मीनाताई जगधने यांनी अहोरात्र प्रयत्न व विशेष मार्गदर्शन केले आहे.

या अभ्यासक्रमांना एआयसीटीई नवी दिल्ली, महाराष्ट्र शासन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांची मंजुरी मिळाली आहे. हे सर्व अभ्यासक्रम विनाअनुदानित तत्त्वावर सुरू होत असून, महाराष्ट्र शासनाच्या सीईटी सेलद्वारे प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे गुणवत्ता यादीनुसार प्रवेश होतील. सध्या याची केंद्रीय प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. रयत शिक्षण संस्थेने अनेक नामांकित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कंपन्यांशी सामंजस्य करार केले असून, कॅम्पस ड्राईव्हच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना १००% रोजगाराची संधी उपलब्ध असेल. प्रत्येक वर्गात 'इंटरऍक्टिव्ह डिजिटल पॅनल'द्वारे डिजिटल अध्यापन केले जाईल, सुसज्ज व अत्याधुनिक संगणक प्रयोगशाळा आणि इंटरनेट ब्राउझिंग सेंटर, 'रयत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रा'मार्फत विविध स्पर्धा परीक्षांचे मोफत व तज्ज्ञ मार्गदर्शन, समृद्ध संगणकीकृत ग्रंथालय, बुक बँक योजना, उद्योजकता विकास केंद्र आणि विद्यार्थी-विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र ६० क्षमतेचे सुसज्ज वसतिगृह उपलब्ध आहे. प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी व पालकांनी अधिक माहितीसाठी प्रा. रोहिदास लांडे, डॉ. नितीन साळवे आणि प्रा. अमीर शेख यांच्याशी त्वरित संपर्क साधावा, असे आवाहन महाविद्यालयातर्फे करण्यात आले आहे.

# नेवासा फाटा परिसरातील रस्त्यांची दयनीय अवस्था; आंदोलनाचा इशारा



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**हंडिनिमगांव** : नेवासा फाटा परिसरातील नेवासा रस्त्यापासून संभाजीनगर ते हंडीनिमगाव मार्ग तसेच नेवासा फाटा ते कल्पवृक्ष रोड या महत्त्वाच्या दळणवळणाच्या रस्त्यांची अवस्था अत्यंत खराब झाल्याने नागरिक, वाहनचालक आणि पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

अनेक ठिकाणी मोठमोठे खड्डे, उखडलेला रस्ता आणि पावसाळ्यात साचणारे पाणी यामुळे या मार्गांवरून प्रवास करणे धोकादायक बनल्याची तक्रार स्थानिक नागरिक करत आहेत. या मार्गावर सेंट जोसेफ स्कूल आणि रोज लँड स्कूल असल्याने दररोज शेकडो विद्यार्थी, पालक, शाळेच्या बस, दुचाकी, चारचाकी तसेच जड वाहने या रस्त्याने प्रवास करतात. खराब रस्त्यामुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, अपघाताची भीती नागरिक व्यक्त करत आहेत.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने खड्डे चुकवताना वाहनचालकांना मोठी कसरत करावी लागते. विशेषतः पावसाळ्यात खड्ड्यांमध्ये पाणी साचल्यामुळे त्यांची खोली लक्षात येत नसल्याने अपघाताचा धोका वाढत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. नागरिकांनी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक प्रशासनाने तातडीने रस्त्याची दुरुस्ती करून दर्जेदार काम करावे, अशी मागणी केली आहे. तसेच या प्रश्नाकडे त्वरित लक्ष न दिल्यास लोकशाही मार्गाने शांततापूर्ण आंदोलन करण्याचा इशाराही स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

नागरिकांची प्रमुख मागणी अशी आहे की, दोन्ही रस्त्यांची तातडीने पाहणी करून कायमस्वरूपी दुरुस्ती करण्यात यावी, खड्डे बुजविण्यात यावेत, पावसाच्या पाण्याचा निचरा करण्याची व्यवस्था करावी आणि शाळांच्या परिसरात वाहतूक सुरक्षेसाठी आवश्यक उपाययोजना करण्यात याव्यात. या संदर्भात संबंधित विभागाकडून अद्याप अधिकृत प्रतिक्रिया मिळालेली नाही. नागरिकांना अपेक्षा आहे की प्रशासनाने त्वरित कार्यवाही करून विद्यार्थी, पालक आणि सर्वसामान्य वाहनचालकांना सुरक्षित व सुकर प्रवासाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. तसेच या रस्त्याकडे आ. विठ्ठलराव लंघे यांनीही लक्ष घालावे अशी मागणी प्रवाशांकडून व शाळकरी विद्यार्थ्यांनकडून होत आहे.

## पंक्चरच्या दुकानात भरला सुजय विखेंचा जनता दरबार



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोल्हार** : भाजपा प्रदेश उपाध्यक्ष डॉ.सुजय विखे पाटील यांनी सोमवारी सकाळी लोणी खुर्द व लोणी परिसरात सुरू असलेल्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करत नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. कोल्हार-नांदूर शिंगोटे महामार्गाच्या कामाची ग्रामस्थांसमवेत पाहणी करून कामाचा दर्जा, वाहतुकीची सुविधा आणि पावसाळ्यात नागरिकांना होणाऱ्या अडचणींचा आढावा घेतला. यावेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक त्या सूचना देत कामात कोणतीही हलगर्जीपणा होऊ नये, असे निर्देश त्यांनी दिले. लोणी खुर्द येथे सुरू असलेल्या महामार्गाचे व गटर बांधकामाचीही त्यांनी ग्रामस्थांसोबत पाहणी केली. नागरिकांनी मांडलेल्या विविध समस्या व सूचनांची दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यावेळी भर पावसातही डॉ. सुजय विखे पाटील यांनी लोणी येथील एका पंक्चर दुकानातच जनता दरबार भरविला. मतदारसंघासह जिल्ह्याच्या विविध भागांतून आलेल्या नागरिकांनी निवेदनांच्या माध्यमातून आपल्या समस्या मांडल्या. प्रत्येकाचे म्हणणे शांतपणे ऐकून संबंधित विभागांशी संपर्क साधत प्रश्न मार्गी लावण्यासाठी त्यांनी तात्काळ सूचना दिल्या. त्यानंतर कोल्हार येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या कामाचीही ग्रामस्थांच्या उपस्थितीत पाहणी करण्यात आली. तसेच कामातील त्रुटी निदर्शनास आणून देत संबंधित अधिकारी व ठेकेदारांना गुणवत्तापूर्ण आणि वेळेत काम पूर्ण करण्याच्या स्पष्ट सूचना डॉ.सुजय विखे पाटील यांनी दिल्या. भर पावसातही प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन विकासकामांचा आढावा घेणे, नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश देणे आणि कामांच्या गुणवत्तेबाबत ठाम भूमिका घेणे, यामुळे उपस्थित ग्रामस्थांनी डॉ. सुजय विखे पाटील यांच्या कार्यपद्धतीचे स्वागत केले.

## समनापूर बाळूमामा भक्तमंडळातील तरुणांचा शिवसेनेत प्रवेश

### आ. खताळ यांच्या नेतृत्वावर विश्वास




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर** : तालुक्यातील समनापूर येथील बाळूमामा भक्त मंडळातील २५ ते ३० तरुणांनी आमदार अमोल खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. या प्रवेशामुळे समनापूर परिसरात शिवसेनेचे संघटन अधिक मजबूत झाले असून, तालुक्यात आमदार अमोल खताळ यांच्या नेतृत्वाला दिवसेंदिवस वाढता प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र दिसून येत आहे. मतदारसंघात सुरू असलेल्या विविध विकासकामांवर विश्वास व्यक्त करत या तरुणांनी शिवसेनेत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी सोपान चांडे, विशाल चांडे, सुनील चांडे, साई चांडे, भाऊसाहेब चांडे, आकाश चांडे, ओंकार पोलगर, शुभम चांडे, सार्थक शेरमाळे, संदीप वैद्य, सचिन चांडे, अमोल गेठे, जुम्मा शेख, मोठ्याबापू शेरमाळे, मीरा शेख, पांडू देवकाते, प्रणय शेरमाळे, रावसाहेब शेरमाळे, संजय उदमले, सुनील पोकळे, शंकर शेरमाळे, किरण पाकळे, महादू शेरमाळे यांच्यासह २५ ते ३० तरुणांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला.

यावेळी शिव सेनेचे ज्येष्ठ नेते म्हतु शेरमाळे, युवासेना उपजिल्हा प्रमुख सौरभ देशमुख, शिवसेना उपजिल्हा प्रमुख रमेश काळे, उपतालुकाप्रमुख रणजीत जाधव, मच्छिंद्र शेरमाळे, युवासेना सचिव एकनाथ शेरमाळे, समन्वयक सुनील चांडे, शाखाप्रमुख अब्बू इनामदार, संदीप शेरमाळे, मनोज भास्कर, राजेश शेरमाळे, संपत गेठे, रावसाहेब शेरमाळे, अमोल शेरमाळे, राजेंद्र गायकवाड, राहुल पोकळे यांच्यासह शिवसैनिक, पदाधिकारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रवेशानंतर आमदार खताळ यांनी नव्याने पक्षात दाखल झालेल्या तरुणांचे स्वागत करत शिवसेनेच्या माध्यमातून सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी तसेच गावाच्या विकासासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही दिली. तसेच विकास कामांच्या माध्यमातून जनतेचा विश्वास संपादन करण्याचे काम पुढेही सुरू राहील, असे त्यांनी सांगितले.

### बाळूमामांच्या नावाने कमान

समनापूर येथील बाळूमामा भक्त मंडळाच्या तरुणांनी गावात बाळू मामांच्या नावाने भव्य स्वागत कमान उभारण्याची मागणी आमदार अमोल खताळ यांच्याकडे केली. त्यांच्या या मागणीची दखल घेत आ. खताळ यांनी सकारात्मक प्रतिसाद देत, बाळूमामा हे लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून त्यांच्या नावाने समनापूर येथे कमान उभारण्यासाठी शासनदरबारी आवश्यक तो पाठ पुरावा करून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील. गावाच्या धार्मिक आणि सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या या मागणीची निश्चितच पूर्तता करण्या साठी आपण कटिबद्ध आहोत,

**- अमोल खताळ, आमदार संगमनेर विधानसभा**

# पुणे-नाशिक महामार्गावरील मुळा नदीच्या पुलावर खड्डेच खड्डे

## प्रशासनाच्या दुर्लक्षाने वाहनधारकांचा जीव धोक्यात



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**घारगाव** : पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्गावरील मुळा नदीच्या पुलाची पावसाळ्याच्या सुरुवातीलाच प्रचंड दुरवस्था झाली असून, पुलावर ठिकठिकाणी मोठे खड्डे पडले आहेत. सध्या सुरू असलेल्या पावसामुळे या खड्ड्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर पाणी साचत आहे. पाणी साचल्याने वाहनचालकांना खड्ड्यांच्या खोलीचा अंदाज येत नाही, ज्यामुळे या ठिकाणी अपघातांची मालिका सुरू होण्याची भीती निर्माण झाली आहे.

या गंभीर समस्येकडे हिवरगाव टोल नाका प्रशासनाने पूर्णपणे दुर्लक्ष केले असल्याचा आरोप नागरिक करत आहेत. वाहनचालकांची कसरत आणि टायर फुटून मोठ्या अपघाताची भीती हा महामार्ग अत्यंत वर्दळीचा असून, या पुलावरून दिवसाकाठी हजारो लहान-मोठी वाहने धावत असतात. महामार्गावरील वाहनांचा वेग जास्त असतो. पुलावरील खड्डे चुकवण्याच्या नादात अनेकदा वाहनचालकांना अचानक ब्रेक दाबावा लागत आहे, त्यामुळे पाठीमागून येणाऱ्या वाहनांची धडक होऊन अपघात घडत आहेत.

विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हे खड्डे अत्यंत जीवघेणे ठरत आहेत. खड्ड्यांमुळे वाहनांचे टायर फुटून एखादा भीषण अपघात होण्याची दाट शक्यता निर्माण झाली आहे. तसेच, वेग मंदावत असल्याने पुलावर रोज मोठी वाहतूक कोंडी होत आहे. दरवर्षी पावसाळ्यात या पुलाची अशीच स्थिती होते.

या गंभीर परिस्थितीबाबत जागरूक नागरिकांनी हिवरगाव टोल नाक्याच्या टोल फ्री क्रमांकावर अनेकदा तक्रारी केल्या आहेत, मात्र टोल प्रशासनाने या तक्रारींची साधी दखलही घेतलेली नाही. टोल वसूल करणाऱ्या प्रशासनाच्या या ढिसाळ आणि बेजबाबदार कारभारामुळे स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

### तातडीने दुरुस्तीची मागणी

एखादा मोठा अपघात घडल्यानंतर आणि निष्पाप नागरिकांचा बळी गेल्यानंतरच संबंधित राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि टोल प्रशासनाला जाग येणार का? असा संतप्त सवाल आता उपस्थित केला जात आहे. राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने या प्रकरणात तात्काळ हस्तक्षेप करून हिवरगाव टोल प्रशासनाला पुलाचे डांबरीकरण व दुरुस्ती करण्याचे आदेश द्यावेत, अशी तीव्र मागणी वाहनधारक आणि नागरिकांकडून केली जात आहे.


### जाहीर सूचना

**मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना सन २०२६-२७**

**उपविभाग श्रीरामपूर, जिल्हा: अहिल्यानगर**

अहिल्यानगर जिल्ह्यातील २२० श्रीरामपूर व २२३ राहुरी विधानसभा क्षेत्रात मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजना २०२६-२७ अंतर्गत जिल्हास्तरीय समितीने मंजूर केलेल्या प्रति तारिका दराच्या (L1 Rate) आधारे पात्र कंत्राटदारांचे नामनिर्देशन (Empanelment) करावयाचे आहे. इच्छुक व पात्रताधारक कंत्राटदारांकडून विहित नमुन्यातील मतदारसंघ निहाय स्वतंत्र आवेदन पत्रे बंद पाकिटात मागविण्यात येत आहेत.

महत्त्वाचे तपशील:

सविस्तर जाहिरात, अटी, शर्ती व सहपत्रे पाहण्यासाठी https://ahmednagar.gov.in या संकेतस्थलादर व उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर येथे उपलब्ध असतील.

आवेदन पत्र सादर करण्याचा कालावधीः दिनांक ०६/०७/२०२६ ते दिनांक १३/०७/२०२६ (शासकीय सुट्ट्यांचे दिवस वगळून).

वेळ व ठिकाणः दिनांक १३/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर बाच्या कार्यालयात समक्ष सादर करावेत.

**स्वाक्षरित**
**सदस्य सचिव, विधानसभा क्षेत्रस्तरीय समिती**
**तथा उपविभागीय अधिकारी, श्रीरामपूर**

## पान १ वरुन

### अविश्वास ठरावापूर्वीच कर्जतच्या नगराध्यक्षा रोहिणी घुले यांचा राजीनामा

नगरपंचायत कार्यालयात पीठासीन अधिकारी तथा कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सर्व नगरसेवक–नगरसेविकांची विशेष सभा बोलावण्यात आली होती. मात्र अविश्वास ठरावास सामोरे जाण्यापूर्वीच नगराध्यक्षा रोहिणी घुले यांनी आपला राजीनामा सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्याकडे सुपूर्द केला. आपल्या नगराध्यक्षा पदाच्या कार्यकाळात केलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी मुख्याधिकाऱ्यासह कार्यालयीन कर्मचारी आणि सर्व नगरसेवकांचे आभार मानत ऋण व्यक्त केले.

रोहिणी घुले यांच्या राजीनाम्यानंतर मंगळवारी नगराध्यक्षा अविश्वास ठरावावर केवळ विशेष सभेची औपचारिकता आता शिल्लक राहिली असून विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आता सहा महिन्यांसाठी कोणाच्या गळ्यात कर्जतच्या नगराध्यक्षा पदाची माळ घालतात याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. नगराध्यक्षा पदानंतर उपनगराध्यक्ष पदाची निवडणूक देखील लागणार आहे. त्यामुळे आगामी काळात दोन्ही पदावर कोणत्या नगरसेवकांची वर्णी लागणार ? १३ नगरसेवकांमध्ये राम शिंदे कसा सुवर्णमध्य काढतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### रोडे अर्बन निधीच्या पदाधिकाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्याचे न्यायालयाचे आदेश

उत्तरे दिली, काही काळानंतर कार्यालय बंद ठेवण्यात आले, तर मोबाईल फोनही बंद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे ठेवीदारांची आर्थिक फसवणूक झाल्याचा दावा करण्यात आला आहे.त्यानंतर तक्रारदार यांनी याबाबत श्रीगोंदा पोलिसांकडे धाव घेतली मात्र तत्कालीन पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी कोणत्याही प्रकरची दखल घेतली नाही त्यानंतर तक्रादार न्यायालयात धाव घेतली न्यायालयाने उपलब्ध कागदपत्रे आणि तक्रारीची दखल घेत श्रीगोंदा पोलिसांना चेरमन संतोष विठ्ठलराव रोडे यांच्यासह संचालक अभिजित प्रकाश देशमुख, विठ्ठल बळवंत रोडे, आदिती अभिजित देशमुख, प्रवीण विठ्ठल रोडे, अमोल झुंबर रसाळ याच्यासह संबंधितांविरुद्ध कायद्यानुसार गुन्हा नोंदवून तपास करण्याचे आदेश दिले आहेत. या कारवाईनंतर आणखी अनेक ठेवीदार पुढे येण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

### कोर्टाच्या आदेशाशिवाय गोशाळेतून १२ म्हशींची विक्री

केली होती. त्यानंतर न्यायालयाचा अंतिम आदेश होईपर्यंत या म्हशींच्या देखभालीची जबाबदारी वाळकी येथील लक्ष्मीमाता गोशाळेला देण्यात आली होती. दरम्यान, ५ जुलै रोजी रात्री डायल–११२ वर कर्तव्य बजावत असलेल्या पोलीस कॉन्स्टेबल विजय दशरथ साठे यांना गोशाळेतून म्हशी परस्पर बाहेर काढून दोन पिकअप वाहनांतून नेल्या जात असल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने जळवाडी शिवारात नाकाबंदी करून दोन्ही बोलेरो पिकअप अडविले. वाहनांची तपासणी केली असता १२ म्हशी अत्यंत निर्दयीपणे, दाटीवाटीने बांधून वाहतूक केली जात असल्याचे आढळले. चौकशीत समोर आलेल्या माहितीनुसार, गोशाळा चालक चांगदेव भालसिंग याने न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण होण्यापूर्वीच म्हशी परत देण्यासाठी २० हजार रुपयांची रक्कम स्वीकारली. त्यानंतर भाड्याने पिकअप वाहने बोलावून रात्रीच्या अंधारात म्हशी मालकांच्या ताब्यात देण्याचा प्रयत्न करण्यात आला. या संपूर्ण प्रकारात गोशाळा चालकाने न्यायालयाचा विश्वास आणि पोलिसांची दिशाभूल केल्याचे तपासात निष्पन्न झाले. या प्रकरणी चांगदेव गोरख भालसिंग, नितेश बबन वैरागर, शरद जगन्नाथ आल्हाट, अमोल दशरथ कासार आणि शरद गुलाब साठे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दोन बोलेरो पिकअप आणि १२ म्हशींसह ५ लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल लाड करीत आहेत.

# शिक्षणमहर्षी घाडगेपाटील यांच्या स्मरणार्थ १,००० कुटुंबांना संसारोपयोगी वस्तूंचे वाटप

**बालाजी देडगाव :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानचे संस्थापक तथा शिक्षणमहर्षी स्वर्गीय साहेबराव घाडगेपाटील (आबा) यांच्या प्रथम पुण्यस्मरणानिमित्त नेवासे तालुक्यातील तेलकुडगाव येथील त्रिमूर्ती शैक्षणिक संकुलात विविध सामाजिक उपक्रम आणि कीर्तन सेवेचे आयोजन करण्यात आले. भावपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सोहळ्यात सामाजिक बांधिलकी जपत परिसरातील सुमारे १,००० गरजू कुटुंबांना संसारोपयोगी वस्तूंचे वाटप करण्यात आले.

त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानच्या अध्यक्षा ॲड. सुमतीताई साहेबराव घाडगेपाटील यांच्या मार्गदर्शनाखाली घाडगेपाटील परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीबद्दल राष्ट्रीय कबड्डीपटू वैष्णवी काळे हिला २१ हजार, तर आंतरराष्ट्रीय खेळाडू वेदांत वाघमारे याला १ लाख रोख रक्कम व सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. हा सन्मान ॲड. सुमतीताई घाडगेपाटील, उपाध्यक्षा स्नेहल चव्हाणपाटील, सहसचिव




डॉ. श्रुती आमलेपाटील, विश्वस्त चेतन चव्हाणपाटील आणि डॉ. गौरव आमलेपाटील यांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाला आमदार विठ्ठलराव लंघे, सुनिताताई गडाख, माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे, प्रभाकरजी शिंदे, अंकुशराव काळे, अर्जुन कर्डिले, ॲड. देसाईआबा देशमुख, पितांबर चव्हाण, डॉ. राजेंद्र आमले, शिवाजीराव पवार, ज्ञानेश्वर महाराज तांबे, हभप सुनिल गिरी महाराज, हभप श्रीधर घाडगे महाराज, पत्रकार सुधीर चव्हाण यांच्यासह राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व धार्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी समाधान महाराज शर्मा यांच्या कीर्तन सेवेने उपस्थितांना अध्यात्माचा संदेश दिला. कार्यक्रमाच्या अखेरीस 'पसायदान'ने सोहळ्याची सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी त्रिमूर्तीच्या तेलकुडगाव, नेवासाफाटा, शेवगाव व ढोर जळगाव येथील विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. सूत्रसंचालन अशोकराव गाढे व लक्ष्मण दळे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार विश्वस्त चेतन चव्हाण यांनी मानले.

## वारीदरम्यान इंद्रायणी नदीचे पाणी प्यायला बंदी, कलेक्टरांचा आदेश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आळंदी:** आळंदीतील संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डुडी यांनी महत्त्वाचे आदेश जारी केले आहेत. वारी कालावधीत इंद्रायणी नदीचे पाणी पिण्यास आणि स्वयंपाकासाठी वापरण्यास बंदी घालण्यात आली आहे.दिनांक ०८ जुलै रोजी होणाऱ्या पालखी सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने वारकरी आळंदीत दाखल होणार आहेत. या पार्श्वभूमीवर खबरदारीचा उपाय म्हणून इंद्रायणी नदीचे पाणी पिण्यास किंवा स्वयंपाकासाठी वापरण्यास मनाई करण्यात आली आहे. तसेच नदीपात्रात कपडे धुणे किंवा नदीचे पाणी दूषित होईल असे कोणतेही कृत्य करू नये, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे.नागरिकांनी आणि वारकऱ्यांनी सार्वजनिक नळावरील पिण्याच्या पाण्याचाच वापर करावा, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांवर मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ अंतर्गत कारवाई करण्यात येणार असल्याचा इशाराही जिल्हा प्रशासनाने दिला आहे.तसेच राज्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे पुणे जिल्ह्यात अनेक ठिकाणी पूरसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. तसेच उद्यापासून जगद्गुरू संत तुकाराम महाराज आणि संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या पालखी सोहळ्याला प्रारंभ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याच्या पालकमंत्री श्रीमती सुनेत्रावहिनी अजितदादा पवार यांनी दूरध्वनीद्वारे प्रशासनाचा आढावा घेतला. यावेळी त्यांनी पुण्याचे जिल्हाधिकारी, पुणे व पिंपरी–चिंचवड महापालिकांचे आयुक्त, पोलीस प्रशासन तसेच संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संवाद साधून पावसाच्या परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्याच्या, आवश्यक ती तत्काळ उपाययोजना करण्याच्या आणि नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना दिल्या.

## संतोष शेळके यांची 'पाणंद रस्ते योजना' समितीवर निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**घारगाव :** अकोले मतदारसंघाचे आमदार डॉ. किरण लहामटे यांचे पठार भागातील खंदे समर्थक आणि बोटा गावचे माजी उपसरपंच संतोष ज्ञानेश्वर शेळके यांची 'मुख्यमंत्री बळीराजा शेत / पाणंद रस्ते योजना' विधानसभा क्षेत्रस्तरीय समितीत 'प्रगतशील शेतकरी' सदस्य म्हणून निवड झाली आहे. अहिल्यानगर जिल्हाधिकाऱ्यांच्या रोजगार हमी योजना शाखेने याचे सुधारित आदेश जारी केले आहेत. ग्रामीण भागातील शेत व पाणंद रस्त्यांचे बळकटीकरण यंत्रसामुग्रीच्या साहाय्याने जलद गतीने करण्यासाठी ही योजना राबवली जात आहे. या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पुनर्रचित केलेल्या या समितीच्या अध्यक्षपदी स्वतः आमदार डॉ. किरण लहामटे असून, त्यांच्या शिफारसीवरून तालुक्यातील ५ प्रगतशील शेतकऱ्यांना यात स्थान मिळाले आहे. यामध्ये पठार भागातून संतोष शेळके यांची निवड झाल्याने संपूर्ण भागात आनंदाचे वातावरण आहे. शेळके यांच्यासह जालिंदर बोडके, भगवंता खोकले, नंदु गंभीरे आणि विश्वंभर आरोटे यांचीही सदस्य म्हणून नियुक्ती झाली आहे. रस्त्यांचे प्रश्न सुटणार; समर्थकांना आशा पठार भागातील शेतीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पाणंद रस्त्यांची दुरवस्था आणि अतिक्रमणांमुळे शेतकऱ्यांना मोठा त्रास सहन करावा लागतो. मात्र, आता संतोष शेळके यांच्या पुढाकारातून आणि आमदार डॉ. लहामटे यांच्या मार्गदर्शनाखाली पठार भागातील पाणंद रस्त्यांचे रखडलेले प्रश्न प्राधान्याने सुटतील, अशी अपेक्षा त्यांच्या समर्थकांनी व पठार भागातील ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. या समितीत संगमनेरचे उपविभागीय अधिकारी सदस्य सचिव असून तहसीलदार, गटविकास अधिकारी, तालुका कृषी अधिकारी यांसह विविध शासकीय अधिकारी सदस्य म्हणून कार्यरत आहेत. संतोष शेळके यांच्या या निवडीबद्दल पठार भागातील राजकीय व सामाजिक क्षेत्रातून त्यांचे जोरदार अभिनंदन होत आहे.

## निधन वार्ता

### विजयसिंग परदेशी



**टाकळीभान:** येथील जुने किराणा व्यापारी विजयसिंग धनुसिंग परदेशी (वय ६९) वर्ष यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी,दोन भाऊ, भाऊजाई,सुना,नातवंडे असा मोठा परिवार आहे. गावातील प्रसिद्ध किराणा व्यापारी नानासाहेब व राजेंद्र परदेशी यांचे ते ज्येष्ठ बंधू होत.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालकपदी सुवर्णा जाधव

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**गंगापुर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून या निवडणुकीत शेतकरी विकास पॅनलच्या महिला राखीव इतर मागासवर्गीय प्रतिनिधी पदाच्या उमेदवार नगरसेविका सुवर्णा संजय जाधव यांनी बहुमताने विजय मिळवत यश संपादन केले आहे. इतर मागासवर्गीय सदस्य मतदारसंघात झालेल्या अटीतटीच्या दुरंगी लढतीत सुवर्णा जाधव यांनी ५४० मते मिळवत प्रतिस्पर्धी उमेदवार ॲड. देवयानीडोणगावकर यांचा पराभव केला. डोणगावकर यांना ४६७ मते मिळाली.या विजयामुळे शेतकरी विकास पॅनलच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निकाल जाहीर होताच जाधव यांच्या समर्थकांनी ढोल–ताशांच्या गजरात आणि गुलालाची उधळण करुन जल्लोष साजरा करण्यात आला सुवर्णा जाधव यांच्या विजयाबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

> बँकेच्या निवडणुकीत मला मतदारांनी भरघोस मतांनी विजयी केल्याबद्दल सर्व मतदार, कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नेत्यांचे मी मनःपूर्वक आभार मानते.हा विजय माझा नसून सर्वसामान्य सभासद, शेतकरी आणि सहका क्षेत्रावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येक मतदाराचा आहे.
>
> **––सुवर्णा जाधव – नवनिर्वाचित संचालक जिल्हा मध्यवर्ती बँक छत्रपती संभाजीनगर,**

## अर्जुन राऊत यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान ;** पत्रकार अर्जुन राऊत यांची निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळाच्या जिल्हा संघटकपदी निवड झाल्याबद्दल राजेंद्र कोकणे मित्र मंडळ व महादेव यात्रा कमिटी यांच्या वतीने त्यांचा हार पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी राऊत यांचे अभिनंदन करून त्यांच्या भावी सामाजिक, पर्यावरण संवर्धन व जनजागृतीच्या कार्यासाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. त्यांच्या माध्यमातून पर्यावरण संरक्षण व सामाजिक कार्याला अधिक बळ मिळेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. सत्कार प्रसंगी श्रीधर गाडे,प्रा. कार्लस साठे, गजानन कोकणे, ॲड. रत्नाकर रणनवरे, भैया पठाण, आप्पासाहेब




वाघुले, जितेंद्र छल्लारे, रावसाहेब आहेर,बापूसाहेब शिंदे, सुरेश पवार, काकासाहेब डिके, मधुकर गायकवाड, गोवर्धन पटारे, रावसाहेब गायकवाड,नवनाथ पवार, सोमनाथ पवार, ज्ञानेश्वर वखरे, राजेंद्र रणनवरे आदी सह गावातील पदाधिकारी, महादेव यात्रा कमिटीचे सदस्य, पत्रकार व ग्रामस्थ उपस्थित होते.

## मातंग समाज स्मशानभूमीत विविध विकास कामे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** तालुक्यातील वांबोरी येथील मातंग समाजाच्या स्मशानभूमीच्या विकासासाठी वांबोरी ग्रामपंचायतीमार्फत मागील काही वर्षांत विविध विकासकामे करण्यात आली आहेत.यामध्ये अंत्यविधीसाठी शेड, अंतर्गत काँक्रीट रस्ते, सोलर लाईट, स्ट्रीट लाईट, संरक्षक भिंत वृक्षारोपण तसेच पाण्याचे कनेक्शन आदी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सुविधांमुळे अंत्यविधीसाठी येणाऱ्या नागरिकांची मोठी सोय झाली असून स्मशानभूमीचा परिसर अधिक सुस्थितीत, सुरक्षित आणि स्वच्छ झाला आहे. या सर्व विकासकामांमध्ये ज्येष्ठ नेते ॲड. सुभाष रावजी पाटील यांचे मोलाचे योगदान लाभल्याचे वांबोरी ग्रामपंचायतीचे सरपंच किरण ससाणे यांनी सांगितले. त्यांच्या सहकार्यामुळे ही विकासकामे पूर्णत्वास गेल्याचे नमूद करत मातंग समाजाच्या वतीने ॲड. सुभाषजी पाटील यांचे आभार मानून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली आहे.




## तेली समाजाच्या वतीने पालखीचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोनई –** अमरावती येथील विभागीय अध्यक्ष संजय विभुते व विभागीय भारतीय जनता पार्टी महिला जिल्हाध्यक्ष अनिता तिखायाले यांच्या मार्गदर्शनाखाली श्री संत गोपिका माता दिंडी २०२६ यांचे संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आषाढी वारी पालखी सोहळ्याचे आगमन कोपरगाव येथे झाले त्यानिमित्ताने संत जगनाडे महाराज सांस्कृतिक भवन येथे पालखी सोहळ्याचे ट्रस्टच्या वतीने तेली समाज बांधवांनी स्वागत करून भोजनाची राहण्याची चहा नाश्ता अन्नदान याची सुविधा करून विधिवत पूजा करून पालखी



सोहळ्याचे कोपरगाव येथून आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपूरकडे रवाना झाली यावेळी क्षिरसागर काका धनराज सोमवंशी संत जगनाडे महाराज बहुउद्देशीय सेवाभावी ट्रस्टचे अध्यक्ष रमेश गवळी विश्वस्त राजेन्द्र वालझाडे, राजेन्द्र राऊत, प्रमोद कवाडे, राजेन्द्र सोनवणे मोठ्या प्रमाणावर भाविक उपस्थित होते.

## गंगापूर आगारात चार 'राजमाता' बसचे लोकार्पण

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** राज्य परिवहन महामंडळाच्या गंगापूर आगारात नव्याने प्राप्त झालेल्या चार 'राजमाता' बसचे लोकार्पण एसटी महामंडळाच्या छत्रपती संभाजीनगर विभागाचे विभागीय भंडाराधिकारी राजहंस यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी गंगापूर आगाराचे आगार प्रमुख विजय बोरसे, कोल्हे,स्थानक प्रमुख सुभाष भापकर,वाहतूक निरीक्षक उज्वला जारवाल आगार लेखाकार अतुल बनसोड तसेच चालक, वाहक आणि यांत्रिककर्मचारी उपस्थित होते.

नवीन चारही 'राजमाता' बसेस गंगापूर – संभाजीनगर मार्गावर शटल सेवा स्वरूपात चालविण्यात येणार असून, त्यामुळे प्रवाशांना अधिक सुलभ, जलद आणि आरामदायी प्रवासाची सुविधा उपलब्ध होणार आहे.या नवीन बससेवेचा जास्तीत जास्त प्रवाशांनी लाभ घेण्याचे आवाहन गंगापूर आगाराचे आगार प्रमुख विजय बोरसे यांनी प्रवाशांना केले आहे.



**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME SHAIKHNOOR SHAIKH SAHEBLAL SHAIKH (LEAVING CERTIFICATE) (BEFORE NAME) TO THE NEW NAME AS SHAIKHNOOR SAHEBLAL SHAIKH ( AADHAR No. 7637 9676 6075) FROM VIDE AFFADAVIT BEFORE NOTARY PUBLIC KOPARGAON PLACE – KOPARGAON DATE – 06/07/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME ARATI SURESH PUJARI (EDUCATIONAL DOCUMENTS) (BEFORE NAME) TO THE NEW NAME AS ARTI SURESH PUJARI ( AADHAR No. 8573 0771 2975) FROM VIDE AFFADAVIT BEFORE NOTARY PUBLIC BELAPUR PLACE – BELAPUR DATE – 06/07/2026

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME JARINA IQBAL JIWANI (NAME ASPER OLD PASSPORT NO.J7113574) TO NEW NAME AS JARINA IQBAL JIVANI VIDE AADHAR NO.8907 4698 5794

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAMES KAWSER AND KAWSAR SHAHEEN SALIM SHAIKH (MOTHERS NAME AS PER SCHOOL RECORD OF OWES SALIM SHAIKH AND AS PER OLD PASSPORT NO.R1324465) TO NEW NAME AS KAWSERSHAHEEN SALIM SHAIKH VIDE AADHAR NO.4212 2034 6928

# सर्व शालेय वाहनांची तपासणी करून अहवाल सादर करा : डॉ. अमित पवार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** राहुरी तालुक्यातील तांदुळवाडी येथे ३ जुलै २०२६ रोजी शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या बसचा स्टिअरिंग रॉड तुटून झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर राहुरी तालुक्यातील सर्व शालेय वाहनांची आणि वाहन चालकांची विशेष तपासणी करण्याचे आदेश तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी डॉ. अमित पवार यांनी दिले आहेत. या मोहिमे अंतर्गत सर्व शासकीय, निमशासकीय व खासगी शाळांमधील विद्यार्थी वाहतूक करणाऱ्या बस, व्हॅन, ऑटो रिक्षा आदी वाहनांची तसेच चालकांची संयुक्त तपासणी करून सात दिवसांच्या आत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. तहसीलदार कार्यालयाकडून शिक्षणाधिकारी (प्राथमिक) व शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद अहिल्यानगर यांना पाठविण्यात आलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे की, तांदुळवाडी येथे झालेल्या अपघातात सुदैवाने जीवितहानी झाली नसली, तरी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा अत्यंत गंभीर प्रश्न पुढे आला आहे. शालेय वाहनांच्या तांत्रिक दोषांमुळे विद्यार्थ्यांच्या जीविताला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी तालुक्यातील सर्व शालेय वाहन व्यवस्थेची काटेकोर तपासणी करणे आवश्यक आहे. या आदेशानुसार प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष तपासणी मोहीम राबविण्यात येणार आहे. या मोहिमेत प्रत्येक वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र, पासिंग, ब्रेक यंत्रणा, स्टिअरिंग रॉड, टायरची स्थिती, विमा तसेच इतर आवश्यक कागदपत्रांची सखोल तपासणी केली जाणार आहे.

याशिवाय वाहन चालकांचीही स्वतंत्र पडताळणी करण्यात येणार असून त्यांच्याकडे वैध वाहन परवाना आहे का, व्यावसायिक पात्रता, निष्कलंक सेवा अनुभव, चारित्र्य पडताळणी, अपघात अथवा इतर गंभीर गुन्ह्यांची नोंद, तसेच मद्य किंवा मादक पदार्थांच्या सेवनासंदर्भातील माहितीची तपासणी केली जाणार आहे. चालकांची दृष्टी, शारीरिक क्षमता, सार्वजनिक आरोग्य आणि व्यसनमुक्ती यासंदर्भातील वैद्यकीय तपासणीही केली जाणार असल्याचे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

तपासणी दरम्यान तांत्रिक दृष्ट्या अयोग्य अथवा सुरक्षा निकष पूर्ण न करणारी वाहने आढळल्यास त्यांना तात्काळ विद्यार्थी वाहतुकीसाठी बंदी घालण्यात येणार आहे. तसेच संबंधित शाळा प्रशासन आणि वाहन चालकां विरुद्ध नियमानुसार कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

सर्व शाळांना तातडीने सूचना देऊन वाहन व वाहन चालक तपासणीची मोहीम पूर्ण करावी आणि वाहनांची संख्या, तपासणी झालेली वाहने, सुस्थितीत व दोषयुक्त वाहने, त्यांच्यावर करण्यात आलेली कारवाई तसेच चालकांची पात्रता तपासणी व अपात्र चालकांवरील कारवाई यांचा सविस्तर अहवाल विहित नमुन्यात पुढील सात दिवसांत तहसीलदार कार्यालयाकडे सादर करावा, असे आदेशात नमूद करण्यात आले आहे. दरम्यान या आदेशाची प्रत पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी प्रादेशिक परिवहन अधिकारी, श्रीरामपूर, गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती राहुरी, पोलीस निरीक्षक राहुरी यांना पाठविण्यात आली असून माहितीस्तव जिल्हाधिकारी अहिल्यानगर तसेच उप विभागीय अधिकारी, राहुरी यांनाही सादर करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाला सर्वोच्च प्राधान्य देत राहुरी तालुक्यात शालेय वाहनांच्या सुरक्षितते बाबत व्यापक तपासणी मोहीम राबविण्याचा प्रशासनाचा हा निर्णय महत्त्वपूर्ण मानला जात आहे.

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

मंगळवार दि .०७ जुलैं २०२६

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १७९<br>२७८<br>८७७ | ७-१ | १९०<br>१८०<br>२४४ | जोड<br>७०-४१-३९-५८-१२ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १९०<br>२८०<br>२४४ | ०-२ | १५६<br>२४६<br>४०० | जोड<br>०६-४२-१९-८३-२५ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२९<br>४८०<br>६६० | २-७ | १२४<br>४६७<br>७०० | जोड<br>२१-०७-४५-९८-७६ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 06/10/2025 to 10/10/2025 | 890 71 678 | 160 71 470 | 457 61 236 | 569 09 270 | 690 58 459 |
| 13/10/2025 to 17/10/2025 | 157 38 468 | 688 20 136 | 358 64 248 | 500 54 266 | 125 85 168 |
| 20/10/2025 to 24/10/2025 | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** | *** ** *** |
| 27/10/2025 to 31/10/2025 | 190 06 150 | 457 64 167 | 247 36 330 | 490 32 156 | 130 48 170 |
| 03/11/2025 to 07/11/2025 | 127 04 266 | 259 63 256 | 799 52 679 | 244 00 389 | 490 32 138 |
| 10/11/2025 to 14/11/2025 | 356 40 479 | 900 92 237 | 279 89 667 | 350 81 137 | 579 10 280 |
| 17/11/2025 to 21/11/2025 | 156 29 135 | 190 05 799 | 460 03 490 | 233 87 269 | 149 43 256 |
| 24/11/2025 to 28/11/2025 | 335 19 900 | 689 35 690 | 247 38 800 | 120 36 150 | 116 81 678 |
| 01/12/2025 to 05/12/2025 | 688 20 488 | 460 00 145 | 128 17 223 | 168 57 377 | 239 45 177 |
| 08/12/2025 to 12/12/2025 | 239 42 147 | 469 92 138 | 130 43 300 | 889 57 179 | 110 22 480 |
| 15/12/2025 to 19/12/2025 | 120 37 359 | 233 86 169 | 237 27 557 | 378 80 578 | 134 85 500 |
| 22/12/2025 to 26/12/2025 | 220 41 470 | 160 76 466 | 600 67 449 | 680 47 340 | 336 27 368 |
| 29/12/2025 to 02/01/2026 | 259 63 599 | 340 75 348 | 250 71 344 | 136 05 140 | 123 64 699 |
| 05/01/2026 to 09/01/2026 | 477 86 178 | 458 73 580 | 355 34 338 | 239 46 259 | 123 67 188 |
| 12/01/2026 to 16/01/2026 | 490 33 148 | 190 09 126 | 479 08 468 | 116 84 770 | 358 62 147 |
| 19/01/2026 to 23/01/2026 | 148 35 258 | 125 86 169 | 336 20 136 | 199 96 330 | 258 59 559 |

## द • ख • ल

### संध्याताई सोनवणे यांची जिल्हा नियोजन समितीवर निवड



**अहिल्यानगर:** महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभागाने जिल्हा नियोजन समितीवरील नामनिर्देशित सदस्य तसेच विशेष निमंत्रित सदस्यांची घोषणा केली असून, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) युवती प्रदेशाध्यक्ष संध्याताई उद्धव सोनवणे यांची जिल्हा नियोजन समितीच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे.महाराष्ट्र शासनाच्या ६ जुलै २०२६ रोजी जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, जिल्हा नियोजनाच्या विविध विषयांतील अनुभव व सामाजिक कार्याची दखल घेत त्यांना ही महत्त्वाची जबाबदारी देण्यात आली आहे.संध्याताई सोनवणे या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (अजित पवार गट) युवती प्रदेशाध्यक्ष म्हणून राज्यभर कार्यरत असून, महिला सक्षमीकरण, सामाजिक प्रश्न, ग्रामीण विकास आणि विविध लोकहिताच्या विषयांवर त्यांनी सातत्याने सक्रिय भूमिका बजावली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्याच्या विकास नियोजनात महिला प्रतिनिधित्व अधिक सक्षम होईल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.त्यांच्या निवडीचे पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध सामाजिक संघटनांच्या प्रतिनिधींनी स्वागत केले असून, त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांना न्याय मिळवून देण्यासाठी त्या प्रभावीपणे काम करतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

### सीना नदीवरील पूल पावसाळ्यात बंद; पर्यायी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करा : ॲड. शिंदे

**अहिल्यानगर:** कल्याण महामार्गावरील सीना नदीवरील पुलाचे काम गेल्या तीन वर्षांपासून सुरू असून अद्याप पूर्ण झालेले नाही. पावसाळ्यात सीना नदीला पूर आल्यानंतर हा पूल दोन-दोन दिवस वाहतुकीसाठी बंद राहतो.



त्यामुळे कल्याण रोड परिसरातील नागरिकांची दळणवळणाच्या दृष्टीने मोठी गैरसोय होत असल्याची बाब सामाजिक कार्यकर्ते ड. युवराज शिंदे यांनी महापालिका आयुक्त यशवंत डांगे यांच्या निदर्शनास आणून दिली. याबाबत आयुक्तांना दिलेल्या निवेदनात, कल्याण महामार्ग ते वारुळाचा मारुती रस्त्याला जोडणाऱ्या पर्यायी रस्त्याची तातडीने दुरुस्ती करून त्यावर मुरूम टाकण्याची मागणी करण्यात आली आहे. सध्या हा रस्ता मातीचा असून पावसामुळे चिखल व पाणी साचत असल्याने वाहनचालक आणि नागरिकांना मोठी कसरत करावी लागत आहे. अनेकदा वाहने घसरून अपघात होण्याच्या घटनाही घडत आहेत. मागील वर्षी पुराच्या पाण्यात एक व्यक्ती वाहून गेल्याची दुर्दैवी घटना घडली होती. अशा घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी पर्यायी रस्ता तातडीने वाहतुकीयोग्य करणे आवश्यक असल्याचे ॲड. शिंदे यांनी निवेदनात नमूद केले आहे.

### संततधार पावसाने जनजीवन विस्कळीत; विद्यार्थ्यांची तारांबळ



**अहिल्यानगर:** शहरात आज पहाटेपासून सुरू झालेल्या संततधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले. सकाळच्या वेळेत पावसाचा जोर कायम राहिल्याने शहरातील प्रमुख रस्त्यांवर वाहतुकीचा वेग मंदावला, तर अनेक ठिकाणी पावसाचे पाणी साचल्याने वाहनचालक आणि पादचाऱ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागला. शाळा सुरू होण्याच्या वेळेतच पाऊस सुरू असल्याने विद्यार्थ्यांची मोठी तारांबळ उडाली. अनेक विद्यार्थी रेनकोट व छत्रीच्या साहाय्याने शाळेत पोहोचले, तर लहान मुलांना पालकांनी स्वतः शाळेत सोडण्यासाठी धावपळ केली. काही ठिकाणी शाळेबाहेर पाणी साचल्यामुळे विद्यार्थ्यांना पाण्यातून वाट काढत शाळेत जावे लागले. शहरातील सखल भाग, चौक आणि अंतर्गत रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीवर परिणाम झाला. कार्यालयीन वेळ असल्याने कामावर जाणाऱ्या नागरिकांनाही पावसाचा सामना करत प्रवास करावा लागला.

### अवतार मेहेरबाबा नगर सेंटरला ६७ वर्ष पूर्ण

**अहिल्यानगर:** येथील सरोष पेट्रोल पंपाशेजारील अवतार मेहेरबाबा नगर केंद्राला ६७ वर्षे पूर्ण झाली असून त्यानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न झाले अशी माहिती सेंटरचे अध्यक्ष डॉ मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली मेहेर बाबाचे जगात सेंटर होते पण नगरमध्ये नव्हते तेव्हा मेहेरबाबानी सेंटर स्थापन करण्याची सूचना केली मग मेहेरप्रेमींच्या घरी दर शनिवारी सेंटर सुरु करावयाचे ठरले पहिला प्रोग्राम माणिक हाथीदारू यांच्या येथे झाला मग शास्त्री मॅडम,भगीरथ तिवारी आदी मेहेरप्रेमींच्या घरी सेंटर झाले असे २० जून पर्यत प्रोग्राम झाले पण त्याकाळी वाहनांची व संवादाची सुविधा जास्त नवहती त्यामुळे प्रत्येक ठिकाणी जाणे शक्य नव्हते मग आदी इराणी याना जागा मागण्यात आली त्यांनी सरोष पेट्रोल पंपाशेजारील या जागेतील एक खोली दिली २९ जूनला सेंटर भरून पहिला प्रोग्राम झाला व सेंटर सुरु झाले या सेंटरचे उदघाटन अवतार मेहेरबाबानी केले होते यानिमित्ताने ६७ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे यामध्ये भजन,आरती,प्रार्थना,सुगम संगीत गायन,शास्त्रीय व भक्तीगीत गायन,वादन,कव्वाली गायन,भजने व अभंग वाणी तसेच नृत्य कार्यक्रम सादर केले अशी माहिती सेंटरचे अध्यक्ष मेहेरनाथ कलचुरी यांनी दिली

# आनंदनगरातील चिमुरडीचा विजेच्या धक्क्याने मृत्यू

## महावितरणविरोधात राष्ट्रवादी काँग्रेसचे ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** शहरातील स्टेशन रोडवरील आनंदनगर परिसरात राहणाऱ्या अवघ्या साडेतीन वर्षांच्या प्रीती गांगर्डे या निष्पाप चिमुरडीचा विजेच्या खांबाला शॉक लागून जागीच मृत्यू झाल्याच्या हृदयद्रावक घटनेनंतर महावितरणच्या कथित निष्काळजीपणाविरोधात संतापाची लाट उसळली आहे. या घटनेच्या निषेधार्थ राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने महावितरण कार्यालयाचे अधीक्षक अभियंता यांच्या दालनात ठिय्या आंदोलन करण्यात आले. संबंधित अधिकारी व ठेकेदारांवर तातडीने गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.



यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, नगरसेवक महेश तवले, बाळासाहेब पवार, तसेच प्रकाश भागानगरे, मयूर बांगरे, दत्ता गाडळकर, अजिंक्य बोरकर, संभाजी पवार, सागर गुंजाळ, अभिजीत काळे, जॉय लोखंडे, रवी दंडी, दीपक खेडकर, ऋषिकेश ताठे, सुमित लोंढे, सुरज कोतकर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी महावितरणचे जॉईंट एमडी दिलीप जगदाळे, महावितरणच्या नाशिक झोनचे मुख्य अभियंता सुंदर लटपटे तसेच अहिल्यानगर महावितरण कार्यालयाचे अधीक्षक अभियंता विजयकुमार पवार उपस्थित होते. आंदोलनादरम्यान शिष्टमंडळाने संबंधित अधिकाऱ्यांसमोर तीव्र संताप व्यक्त करत या प्रकरणातील दोषींवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसेच शहरातील धोकादायक अवस्थेतील वीज खांब, लोंबकळणाऱ्या विद्युत तारा आणि प्रलंबित तक्रारींची तातडीने दखल घेऊन सर्वत्र सुरक्षा उपाययोजना राबविण्याची मागणीही करण्यात आली.यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर म्हणाले की, या निष्पाप चिमुरडीचा मृत्यू हा महावितरणच्या कथित हलगर्जीपणाचा परिणाम आहे. संबंधित कुटुंबीयांनी वारंवार महावितरण कार्यालयाकडे तक्रारी करूनही कोणतीही प्रभावी उपाययोजना करण्यात आली नाही. वेळेत दखल घेतली असती, तर आज ही दुर्दैवी घटना घडली नसती. भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते म्हणाले की, महावितरण कार्यालयाचे कामकाज आता ठेकेदारांच्या भरोशावर चालत असल्याचे चित्र आहे. संबंधित कुटुंबीयांनी वेळोवेळी तक्रारी करूनही प्रशासनाने त्याची दखल घेतली नाही. त्याच निष्काळजीपणामुळे एका निष्पाप बालिकेचा जीव गेला.

**घटनेपूर्वीच दिली होती धोक्याची लेखी सूचना- आनंदनगर परिसरातील नागरिकांनी दि. २१ ऑगस्ट २०२५ रोजी महावितरण कार्यालयाकडे संबंधित विजेच्या खांबाबाबत लेखी तक्रार केली होती. या निवेदनामध्ये संबंधित इलेक्ट्रिक पोल अत्यंत धोकादायक अवस्थेत असून तातडीने नवीन पोल बसविण्यात यावा, अन्यथा कधीही दुर्दैवी घटना घडू शकते, अशी स्पष्ट पूर्वसूचना देण्यात आली होती. मात्र, या निवेदनाची दखल न घेतल्यामुळेच एका निष्पाप बालिकेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याचा आरोप आंदोलनकर्त्यांनी केला. या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी करून जबाबदार अधिकारी व संबंधित ठेकेदारांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करावी, तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी शहरातील धोकादायक विद्युत यंत्रणेची तातडीने तपासणी करून आवश्यक दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी शिष्टमंडळाने यावेळी केली.**

# पाथर्डीच्या पाच गावांत गुन्हेगारी टोळीचा धुमाकूळ

## महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांवर जीवघेणे हल्ले : ग्रामस्थांची एसपींकडे धाव

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** पाथर्डी तालुक्यातील सोमठाणे, नलवडे बुद्रुक, वरूर, सुसरे, आखेगाव व कोरडगाव या गावांमध्ये काही व्यक्तींनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी कथितपणे संघटित गुन्हेगारीचे जाळे उभे करून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण केल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या पार्श्वभूमीवर सुमारे ५०० ग्रामस्थांनी जिल्हा पोलीस अधीक्षक सुदर्शन मुम्मका यांची भेट घेत निवेदन सादर करून संबंधितांवर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोका) अंतर्गत कारवाई करण्याची मागणी केली. तसेच तातडीने कारवाई न झाल्यास पोलीस अधीक्षक कार्यालयासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशाराही देण्यात आला.



ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनानुसार संतोष खवले, राहुल खवले, माणिक खवले, अमोल खवले, चिमाजी धनवडे व त्यांच्यासोबतच्या सुमारे वीस ते पंचवीस जणांनी परिसरात कथितपणे संघटित गुन्हेगारी सुरू केली आहे. जुगार, मटका, वाळू तस्करी, अवैध सावकारी, बेकायदेशीर ताबे घेणे आदी आर्थिक फायद्याच्या कथित बेकायदेशीर व्यवसायातून या टोळीने गावागावांत दहशत निर्माण केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, संबंधितांकडून महिला, युवक व ज्येष्ठ नागरिकांना लोखंडी रॉड, लाकडी दांडे आणि तलवारीच्या धाकाने बेदम मारहाण करण्यात आली असून अनेकांवर जीवघेणे हल्ले झाले आहेत. काही प्रकरणांमध्ये कलम ३०७ सारखे गंभीर गुन्हे दाखल असूनही संबंधित आरोपी अद्याप मोकाट फिरत असल्याचा आरोप करण्यात आला.

तसेच, काही आरोपींचे पोलिसांशी आर्थिक संबंध व नातेवाईक असल्यामुळे त्यांना संरक्षण मिळत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी निवेदनात केला. आरोपी पोलिसांसमोरूनही फरार झाल्याचा दावा करत, त्यांच्या दहशतीमुळे अनेक नागरिक तक्रार करण्यास धजावत नसल्याचे सांगितले.

# दलित महासंघाच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त वृक्षारोपण



प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** फुले-शाहू-आंबेडकर-अण्णाभाऊ साठे यांच्या समतावादी विचारांचा वारसा जपत गेली ३५ वर्षे सामाजिक, न्याय, शिक्षण, स्वाभिमान आणि संविधानिक मूल्यांसाठी कार्यरत असलेल्या दलित महासंघाच्या ३५ व्या वर्धापन दिनानिमित्त अहिल्यानगर जिल्हा शाखेच्या वतीने १३५ वृक्षारोपणाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला.

संघर्ष- संघटन- सामाजिक परिवर्तन या ब्रीदवाक्याला अनुसरून आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमात पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी सामाजिक परिवर्तनासोबत पर्यावरण संरक्षणाची जबाबदारीही प्रत्येक नागरिकाने स्वीकारावी, असे आवाहन केले.

यावेळी दलित महासंघाचे प्रदेशाध्यक्ष मा. डॉ. काशिनाथ सुलाखे पाटील, जिल्हाध्यक्ष संजय चांदणे, जिल्हा कार्याध्यक्ष कडूबाबा लोंढे, ज्येष्ठ नेते नामदेवराव चांदणे, माजी गटविकास अधिकारी राजेंद्र गर्जे, ज्येष्ठ नेते दिलीप सोळसे, आशपाक पठाण, प्रा. सुनील पाखरे, कैलास वाघमारे, बबनराव शेळके, बबन चव्हाण, सेवानिवृत्त आर्मी जवान दिलावर पठाण, रियाज पठाण, भाऊराव गर्जे, बडेसाहेब पठाण, विलास वाघमारे, सादिक पठाण, पप्पू पठाण, तानाजी भवर, चव्हाण सरपंच, प्रतीक गायकवाड, हरिभाऊ गर्जे, अविनाश लोंढे यांच्यासह अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते व समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना मान्यवरांनी दलित महासंघाची स्थापना ५ जुलै १९९२ रोजी प्रा. डॉ. मच्छिंद्र सकटे सर यांनी कोल्हापूरच्या बिंदू चौकातून केली असून, गेल्या ३५ वर्षांत संघटनेने सामाजिक न्याय, हक्क, शिक्षण, समता आणि संविधान रक्षणासाठी सातत्याने संघर्ष केला असल्याचे सांगितले. आगामी काळातही समाजातील वंचित, शोषित आणि गरजू घटकांच्या न्याय्य हक्कांसाठी दलित महासंघ अधिक ताकदीने कार्यरत राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

## वैष्णव सेवा भक्तमंडळ दिंडीचे १३ जुलैला प्रस्थान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर-येथील वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने सालाबादप्रमाणे मंगळवार दिनांक १३ जुलै रोजी वैष्णव सेवा भक्त मंडळ पायी दिंडी सोहळा पंढरपूर आषाडी दिंडी साठी प्रस्थान करणार असून दिंडीचे हे १५ वे वर्ष आहे . ब्रम्हलीन समर्थ सद्गुरु हरिहर महाराज व ब्रम्हलीन शंकर महाराज जोशी, ब्रम्हत्तीन गोपाल चैतन्य महाराज यांच्या कृपा आशीर्वादाने वैष्णव सेवा भक्त मंडळाच्या वतीने काढण्यात येते.कपिलेश्वर महादेव मंदिर,माळीवाडा,अहिल्यानगर येथून दि. १३ जुलै रोजी दुपारी २ वा.वाजता निघणार आहे,यावेळी अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत.



दिंडीला विशेष अनमोल सहकार्य परशुराम आसाराम मचे, संतोष मोहनराव मेहेत्रे व परिवार,भाऊसाहेब उनवणे(मा. नगरसेवक, अहिल्यानगर), राजुशेठ गंधाडे,विजयप्रकाश चंद्रभूषण त्रिपाठी यांनी तर दिंडीची वाहन व्यवस्था(ट्रक)मोहनराव मेहेत्रे, जलव्यवस्था राजेंद्र फुलारी,डिझेल सेवा अहिल्या वीर,जगन औशीकर,कै शांताबाई कुलकर्णी स्मरणार्थ संजय कुलकर्णी यांजकडून ट्रॅक्टर सेवा अंकुश तरटे ,कैजयेश पाटील स्मरणार्थ वर्षांताई वासू(द्रविड)यांजकडून,वाहन सेवा अर्जुन चांदगुडे,मच्छिंद्र जगताप,रथसेवा बबन महाराज गुंजाळ तर पंढरपूर निवास व्यवस्था रावसाहेब भगत,किर्तन सेवा बाळकृष्ण महाराज खेसे यांची आहे. या दिंडीला आशिर्वाद स्व.सरस्वती चंद्रभूषण त्रिपाठी,यादव बाबुराव खेडकर,स्व.सौ.भागुबाई यादवराव खेडकर,कै.ठकुबाई हरिभाऊ विधाटे,गं.भा.ताराबाई मोकाटे,मच्छिंद्र महाराज राऊत यांची आहे.दिंडी २६ जुलैला पंढरपूरला पोहचणार आहे तर सांगता गुरुपौर्णिमेला २९ जुलै ला सुनिल प्रकाश चंद्रभूषण त्रिपाठी यांचे निवासस्थान, भवानी नगर येथे आयोजित केला आहे.

## पिंपळगाव रोठा जिल्हा परिषद शाळेची गुणवत्तापूर्ण वाटचाल! पटसंख्या वाढली






प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** नगर-जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव रोठा या शाळेने यशाचा आणखी एक टप्पा पार केला आहे शाळेचा विद्यार्थी श्रीराज अरुण कंदलकर यांनी २३० गुण मिळवत इयत्ता पाचवी जिल्हा परिषद शासकीय शिष्यवृत्ती योजनेत गुणवत्ता यादीत आपला नंबर निश्चित केला आहे ,यापूर्वी या शाळेचे दोन विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र ठरले आहेत मल्हार सुरेश मुंढे सिद्धी,अशोक सुपेकरआणि अपर्णा किरण शिकारे आता जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील चार विद्यार्थी शिष्यवृत्ती पात्र आणि त्याचबरोबर मल्हार सुरेश मुंढे या विद्यार्थ्यांची टाकळी ढोकेश्वर या केंद्रीय नवोदय विद्यालयात निवड झाली आहे या सर्व यशामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव रोठा या शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती नेवसे मॅडम, संभाजी नरवडे सर आणि सचिन शिंदे सर त्याचबरोबर कै. कुलट मॅडम यांनी सर्व विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पिंपळगाव रोठा सारख्या ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना वरील सर्व शिक्षकांनी अतिशय मेहनतीने आणि अचूक मार्गदर्शनाने त्यांना यश संपादन करून दिले याबद्दल मुख्याध्यापक शिक्षक यांचे ग्रामस्थ मुंबईकर मंडळी यांच्या वतीने अभिनंदन करण्यात आले ग्रामीण भागातील जिल्हा परिषद शाळेची पट संख्या कमी होत असताना देखील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पिंपळगाव रोठा या शाळेत शैक्षणिक गुणवत्ता आणि दर्जा कायम ठेवल्यामुळे शाळेची पटसंख्या वेगाने वाढत आहे याचे सर्व श्रेय होतकरू मेहनती शिक्षकांना जाते. परिसरातील पालक, ग्रामस्थ यांनी ही शालेय साहित्य वाटप करून सहकार्य केले आहे. पालक विद्यार्थी पुन्हा जि.प. प्रा.शाळेकडे आकर्षित होत असल्याचे दिसून येत आहे.


**जाहीर प्रकटन**

**(फक्त सभासदांसाठी सुचना)**

कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित कारेगाव, ता. श्रीरामपुर, जि अहिल्यानगर या संस्थेच्या संचालक मंडळाच्या सन २०२६-२७ ते २०३१-३२ या कालावधीच्या पंचवार्षिक निवडणुकीसाठी १२/०७/२०२६ रोजी सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० पर्यंत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, कारेगाव, तालुका श्रीरामपुर, जिल्हा अहिल्यानगर या ठिकाणी मतदान होणार असुन त्यानंतर लगेच त्याच ठिकाणी मतमोजणी होणार आहे. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी. दिनांक

दिनांक- ०४/०७/२०२६

(आर. एल. गडेकर)

**कारेगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित कारेगाव, ता. श्रीरामपुर जि. अहिल्यानगर**


# अकोळनेर जिल्हा परिषद शाळेतील वाद चिघळला

## शिक्षिकेची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे धाव, प्रभारी मुख्याध्यापिकांवर आरोप

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर तालुक्यातील अकोळनेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील अंतर्गत वाद आता जिल्हा परिषद प्रशासनापर्यंत पोहोचला असून, शिक्षिका सीमा हरिभाऊ गावडे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सविस्तर निवेदन देत प्रभारी मुख्याध्यापिका यांच्यावर मानसिक छळ, बदनामी, बदलीसाठी कटकारस्थान रचणे तसेच पूरक पोषण आहाराच्या वितरणात अनियमितता केल्याचे गंभीर आरोप केले आहेत. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून संबंधितांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली आहे.निवेदनात सीमा गावडे यांनी म्हटले आहे की, त्या गेल्या दहा महिन्यांपासून अकोळनेर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत कार्यरत आहेत. अविवाहित, अनाथ व निराधार असल्याचा गैरफायदा घेत प्रभारी मुख्याध्यापिका त्यांना सातत्याने मानसिक त्रास देत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे.



त्यांच्या म्हणण्यानुसार, दर बुधवारी विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या पूरक पोषण आहाराचे १७ जून व २४ जून २०२६ रोजी वितरण झाले नसल्याबाबत त्यांनी मुख्याध्यापिकांना विचारणा केली. त्यानंतर मुख्याध्यापिकांनी सरपंचांच्या माध्यमातून आपल्याविरोधात वातावरण निर्माण करून बदलीसाठी कट रचल्याचा आरोप त्यांनी केला आहे.यावर्षी चौथीतील सुमारे ४० विद्यार्थी पाचवीत गेल्याने शाळेतील विद्यार्थीसंख्या कमी झाली असून, अतिरिक्त शिक्षक ठरण्याची शक्यता टाळण्यासाठी आपल्याला बदलीने हटविण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचा दावा ही त्यांनी निवेदनात केला आहे.सीमा गावडे यांनी पुढे म्हटले आहे की, मुख्याध्यापिका वारंवार वर्गात येऊन विद्यार्थ्यांसमोर मोठ्या आवाजात वाद घालत होत्या. त्यामुळे आपला अपमान होत असून मानसिक छळ वाढला. यापूर्वी केंद्रप्रमुखांकडे तक्रार केल्यानंतर मुख्याध्यापिकांना तोंडी समज देण्यात आली होती, मात्र त्यानंतरही त्रास सुरूच राहिला असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.ग्रामपंचायतीच्या सरपंचांवरही त्यांनी गंभीर आरोप करत, सरपंच हे मुख्याध्यापिकांचे नातेवाईक असून त्यांच्या माध्यमातून पालकांना भडकविण्यात आले. २५ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालयात पालकांची बैठक घेऊन आपल्याविरोधात तक्रार अर्ज तयार करण्यात आला. त्यानंतर सोशल मीडियावर खोटे आरोप व दिशाभूल करणारी माहिती प्रसारित करून आपली प्रतिमा मलीन करण्याचा प्रयत्न झाल्याचा आरोपही त्यांनी केला आहे.आपण विद्यार्थ्यांना कधीही मारहाण केलेली नाही, अपशब्द वापरले नाहीत किंवा विद्यार्थ्यांचा डबा खाल्लेला नाही. शाळेतील सीसीटीव्ही फुटेजमध्ये आपली उपस्थिती व कामकाज स्पष्ट दिसून येईल, असा दावा त्यांनी केला आहे.


प्रोसेस की जमा रुपये
प्रोसेस पान ता.
नेमलेली तारीख - १०/०७/२०२६

ॲड. वाय. के. शेख
श्रीरामपूर
नि.क्र. ३०

**जाहीर नोटीस**

**श्रीरामपूर येथील मे. मोटार अपघात न्यायाधिकरण साहेब यांचे कोर्टात**
एम.ए.सी.पी. क्र. १६३/२०२०

**चि. निखिल संदीप खर्डे -अर्जदार**
**विरुद्ध**
**श्री. शंकर भास्कर धाडे- सामनेवाले**

प्रति,
**१) शंकर भास्कर धाडे**
**रा. गावठाण, तीसगाव, ता. राहाता जि. अहिल्यानगर ४१३७१२**

ज्याअर्थी अर्जदार यांनी श्रीरामपूर येथील मे. मोटार अपघात न्यायालयामध्ये तुमचे विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेसाठी अपघात क्लेम दाखल केलेला आहे. सदर क्लेम अर्जामध्ये आपण सामनेवाला क्र. १ असून आपणास मे. कोर्टामार्फत व रजि. ए. डी. ने सदर क्लेमच्या नोटीसा पाठविण्यात आलेल्या होत्या परंतु आपणास सदर नोटीसा / समन्स बजावणी झालेली नसल्याने अर्जदाराने तुम्हांस जाहीर नोटीससाठी अर्ज केला होता. सदरचे अर्जावर मे. कोटनि हुकूम केल्याप्रमाणे तुम्हांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सदर वृत्तपत्रात जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसाचे आत किंवा सदर क्लेम अर्जाची नेमलेली तारीख १०/७/२०२६ या तारखेस आपण सकाळी ठिक १०.३० वाजता या न्यायालयात स्वतः अथवा निर्दोष्ट केलेल्या वकिलामार्फत हजर व्हावे. आपण मुदतीत हजर राहिला नाही तर आपले काही म्हणणे नाही असे ग्राह्य धरण्यात येवून तुमचे विरुद्ध मे. न्यायालय एकतर्फी हुकूम करतील याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १६/०६/२०२६ रोजी माझ्या सही निशी व न्यायालयाचे शिक्यानिशी दिली असे.

**हुकुमावरुन**
**कामगिरी क्लार्क १६१६/२०**
**जिल्हा न्यायालय श्रीरामपुर**
**श्रीरामपुर**

(शिक्का)

**अधीक्षक**
**जिल्हा न्यायालय श्रीरामपुर**



**जाहीर नोटीस**

**तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविणेत येते की,**

खालील परिशिष्टात वर्णन केलेली शेतजमीन मिळकत मौजे उक्कलगांव (पटेलवाडी), ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर येथील शेतजमीन मिळकतीचे विद्यमान मालक कै. तुकाराम चिमा धनवटे यांचे कायदेशीर वारस मुलगा अनिल पांडुरंग धनवटे व मुलगी सुरेखा पांडुरंग धनवटे असे असून बाळा उर्फ बाबुराव चिमा धनवटे बाबासाहेब यांचे कायदेशीर वारस पत्नी किसनबाई बाबुराव धनवटे असे आहेत. संतोष विष्णु धनवटे, कै. राजश्री विष्णु धनवटे, विष्णु राजाराम कुसळकरे, सर्व रा. तांदुळनेर, पो. तांभेरे, ता. राहुरी, जि. अहमदनगर यांचे वारसा हक्काने शेती महामंडळाकडून महाराष्ट्र सरकारचे नियमानुसार मालकीची व वारसहक्क वहिवाटीची असून त्यांनी सदर मिळकत निर्वेध, निष्कर्जीत, निरजोखमी, बोजारहीत असल्याची खात्रीशीर निर्वाळा व भरवसा आमचे अशिलांस देवुन सदर मिळकत आमचे अशिलांस विक्रीचा सौदा केलेला असून त्यापोटी करारनामा अन्वये विसाराची रक्कमही स्विकारलेली आहे. सदर व्यवहारामध्ये कोणाचीही तक्रार वा हरकत राहू नये याकरीता या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीचे विद्यमान मालक यांनी व त्यांचे कायदेशीर वारसांनी खालील नमुद केलेल्या परिशिष्टातील सर्व्हे नं. २५७/४ मधील संपुर्ण क्षेत्र विक्रीस काढलेले आहे असे आमचे अशिलास नुकतेच समजलेले आहे. तरी वरील शेतजमीन मिळकत सर्व्हे नं. २५७/४ बाबत कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार करू नये, कारण सदर क्षेत्रामध्ये आमचे अशिलांचा वारसा हक्काने कायदेशीर हिस्सा आहे. सदर मिळकतीबाबत वरील इसमांबरोबर कोणीही खरेदी विक्रीचा व्यवहार केल्यास तो बेकायदेशीर होईल व सदरचा व्यवहार आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. खरेदी घेणारास नाहक लिटीगेशनचा त्रास होईल म्हणून सदरची नोटीस दिली असे.

**परिशिष्ट**

जिल्हा परिषद व तुकडी अहमदनगर पोट तुकडी व तालुका श्रीरामपूर पैकी मौजे उक्कलगांव (पटेलवाडी) येथील सामाईक वारसा हक्काने शेती महामंडळाकडून मिळालेली शेतजमीन मिळकत सर्व्हे नं. २५७/४ एकूण क्षेत्र ०२हे. ५३ आर पैकी ००हे. ८८ आर, आकार रूपये हिश्याप्रमाणे. यांसी चतुः सिमा : पूर्वेस : थोरात यांची मिळकत, दक्षिणेसः सर्व्हे नं. २५७ पैकी, पश्चिमेसः अंतर्गत रस्ता व पुढे बाळासाहेब जगधने यांची मिळकत, उत्तरेस : स.नं. २५७ पैकी मच्छिंद्र बाळा धनवटे वगैरे यांची मिळकत

येणेप्रमाणे चतुः सिमांकित शेतजमीन मिळकत तसेच जाणे येणेचे वाग वहिवाटीच्या इजमेंटरचे हक्कासहीत काहीएक राखुन न ठेवता.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस दिली असे.

**श्रीरामपूर**
**ता.०६/०७/२०२६**

**ॲड. एम. डि. झोडगे**
नविन कोर्टाजवळ, न्यायमंदिर
वॉर्ड नं. १, श्रीरामपूर, ता. श्रीरामपूर, जि.नगर.
मो.नं. ९५२७५११२५०

द•ख•ल

## पूर्व आंबेगावात पर्जन्यमान मापक बसविण्याची नागरिकांची मागणी

**लोणी धामणी :** आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असून अनेक गावांमध्ये मोठ्या प्रमाणात पर्जन्यवृष्टी होत आहे. मात्र या भागात अधिकृत पर्जन्यमान मापक (रेनगेज) नसल्याने नेमका किती मिलिमीटर पाऊस झाला, याची माहिती नागरिक व शेतकऱ्यांना उपलब्ध होत नाही. त्यामुळे प्रशासनाने या परिसरातील मध्यवर्ती ठिकाणी पर्जन्यमान मापक बसवावे, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. मेंगडेवाडी, जारकरवाडी, निरगुडसर, लाखणगाव, पोंदेवाडी, पारगाव, शिंगवे, लोणी, धामणी आदी गावांमध्ये सध्या जोरदार पाऊस होत आहे. मात्र या भागातील पावसाची अधिकृत नोंद उपलब्ध नसल्याने शेतकरी, नागरिक तसेच स्थानिक प्रशासनाला अचूक माहिती मिळत नाही. तसेच हवामान विभागाकडून मिळणारा पावसाचा अंदाज, वाऱ्याचा वेग, संभाव्य पर्जन्यमान याबाबतची स्थानिक पातळीवरील माहितीही नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचत नाही. शेती नियोजन, पीक व्यवस्थापन, नैसर्गिक आपत्तींचा अंदाज तसेच आपत्कालीन परिस्थितीत योग्य निर्णय घेण्यासाठी पर्जन्यमानाची अचूक माहिती अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील मध्यवर्ती ठिकाणी आधुनिक पर्जन्यमान मापक व हवामान निरीक्षण केंद्र उभारण्यात यावे, अशी मागणी शेतकरी व नागरिकांकडून जोर धरत आहे. स्थानिकांच्या या मागणीची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर पर्जन्यमान मापक बसविण्याबाबत कार्यवाही करावी, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

## अपघातात तरुणाचा मृत्यू; नायगाववर शोककळा



**माळशिरस :** पुरंदर तालुक्याच्या पूर्व भागातील नायगाव येथील ऋतुराज सुदर्शन चौडकर (वय १९) याचा सासवड–सुपा मार्गावरील नायगाव येथील म्हसोबा मंदिराशेजारी झालेल्या भीषण अपघातात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे नायगावसह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून गावावर शोककळा पसरली आहे.ऋतुराजने नुकतेच बारावीचे शिक्षण पूर्ण केले होते. शांत, मनमिळाऊ, नम्र व कष्टाळू स्वभावामुळे तो परिसरातील सर्वांचा लाडका होता. प्रत्येकाशी आपुलकीने व प्रेमाने वागणारा ऋतुराज सामाजिक उपक्रमांमध्येही उत्साहाने सहभागी होत असे. त्याच्या अकाली निधनाने कुटुंबीय, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांना मोठा धक्का बसला आहे. त्याच्या पश्चात आजी, आजोबा, आई, वडील, भाऊ असा परिवार आहे. नायगाव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेचे माजी अध्यक्ष गिरीधर चौडकर यांचा तो नातू, तर सामाजिक कार्यकर्ते सुदर्शन चौडकर यांचा मुलगा होता. ऋतुराजच्या निधनाबद्दल परिसरातील सामाजिक, शैक्षणिक व राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी शोक व्यक्त केला असून चौडकर परिवाराप्रती संवेदना व्यक्त करण्यात येत आहेत.

## वरंधा घाट रस्ता बंद करण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश जारी

**पुणे :** राष्ट्रीय महामार्ग ९६५ डीडी राजेवाडी ते वरंधा, भोर–महाड या मार्गावरील वरंधा घाट परिसरातील रस्त्यावर पावसाळयात अतिवृष्टीमुळे संभाव्य दरडी कोसळून होणा–या दूर्घटना टाळण्याकरिता खबरदारीचा उपाय म्हणून ३१ ऑगस्ट पर्यंत घाटरस्ता बंद करण्याबाबतचे आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी जितेंद्र डूडी यांनी निर्गमित केले आहे. पुण्याकडे जाण्यासाठी माणगाव–निजामपुर–ताम्हिणी घाट–मुळशी–पिरंगुट–पुणे तसेच कोल्हापूरकडे जाण्यासाठी राजेवाडी फाटा–पोलादपूर–महाबळेश्वर–वाई–सुरुर–सातारा–कराड–कोल्हापूर किंवा राजेवाडी पाटा–पोलादपुर–खेड–चिपळून पाटण–कराड–कोल्हापूर या पर्यायी मार्गाने वाहतूक वळविण्याबाबतचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

## सणसवाडी येथे युवतीचा विनयभंग केल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**तळेगाव ढमढेरे :** सणसवाडी (ता. शिरुर) येथे युवतीचा पाठलाग करुन विनयभंग करत युवतीला लग्नासाठी धमकी दिल्याची घटना घडली असल्याने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे धीरज अरुण माळी याचे विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सणसवाडी (ता. शिरुर) येथील युवती कंपनीत कामाला चाललेली असताना धीरज माळी हा वारंवार युवतीचा पाठलाग करत युवतीच्या जवळ आला त्याने युवतीला तु माझ्याशी लग्न कर नाहीतर मी तुला मारुन टाकीन अशी धमकी दिली, दरम्यान धीरज याने युवतीच्या कुटुंबियांना देखील मारुन टाकण्याची धमकी दिल्याने युवती कामाला न जाता घरी गेली असता धीरज याने युवतीच्या घरी जात अनाधिकाराने घरात प्रवेश करुन युवतीला दमदाटी केली, घडलेल्या प्रकाराबाबत पिडीत युवतीने शिक्रापूर पोलीस स्टेशन येथे फिर्याद दिल्याने पोलिसांनी धीरज अरुण माळी (सध्या रा. सणसवाडी ता. शिरुर जि. पुणे मूळ रा. भालगाव ता. केज जि. बीड) याचे विरूद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास पोलीस हवालदार राकेश मळेकर हे करत आहे.

# इंद्रायणीच्या महापुराने आळंदी वेढली

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** मावळ तालुक्यातील मुसळधार पावसामुळे वडीवळे धरणातून मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्यात आल्याने आळंदीतील इंद्रायणी नदीला महापूर आला आहे. पुरामुळे शहरातील जनजीवन विस्कळीत झाले असून विविध धर्मशाळा व दर्शन मंडपात अडकलेल्या सुमारे अडीचशे वारकऱ्यांची आळंदी नगरपरिषदेच्या आपत्कालीन पथकाने सुखरूप सुटका करून सुरक्षितस्थळी हलवले.

सिद्धबेट, गोपाळपुरा आणि इंद्रायणी तीर परिसरातील अनेक धर्मशाळांमध्ये पुराचे पाणी शिरले. ज्ञानेश्वरी मंदिरातील २०, इंद्रायणी नगरमधील १००, ठाकूरबुवा धर्मशाळेतील ६० तसेच गोपाळपुरा परिसरातील इतर धर्मशाळांमधील सुमारे २० वारकरी पुराच्या पाण्यात अडकले होते. याशिवाय वैतागेश्वर मंदिराजवळील दर्शन बारीमध्ये अडकलेल्या १० वारकऱ्यांचीही नगरपरिषदेच्या आपत्कालीन पथकाने सुखरूप सुटका केली. पुराचा धोका लक्षात घेऊन सिद्धबेट परिसरातील सर्व वारकरी धर्मशाळा तसेच साधकाश्रम ते डुडुळगाव मार्गावरील वारकरी विद्यार्थ्यांच्या धर्मशाळांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. प्रशासनाने सर्वांना सुरक्षित ठिकाणी राहण्याच्या आणि आवश्यक ती खबरदारी घेण्याच्या सूचना दिल्या आहेत. महापुराच्या तडाख्यात इंद्रायणी नदीकाठावरील महिलांसाठी उभारण्यात आलेले दोन चेंजिंग रूम वाहून गेले. वैतागेश्वर परिसरातील दर्शन बारीही पुराच्या पाण्यात वाहून गेली. जुन्या व नवीन पुलांवरील संरक्षण कठडे आणि बसविण्यात आलेली जाळी मोठ्या प्रमाणात वाहून गेली आहे. संत ज्ञानेश्वर महाराज मंदिराच्या पश्चिमेकडील शनी मंदिर परिसरातील प्रसाद विक्रेत्यांच्या दुकानांमध्ये पाणी शिरल्याने हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. साधकाश्रम–ज्ञानेश्वरी मंदिर जोडणारा पूल, देहू फाटा–चाकण मार्गावरील गरुडस्तंभाजवळील पूल तसेच आळंदी नगरपरिषद चौक ते देहू फाटा जोडणारे जुने व नवे दोन्ही पूल पाण्याखाली गेले आहेत. आळंदी–चऱ्होली बाह्यवळण मार्गावरील पुलाच्या कठड्यांपर्यंत पाणी पोहोचले असून तेथे अत्यंत सावधगिरीने वाहतूक सुरू आहे. दरम्यान, इंद्रायणीच्या दोन्ही घाटांवर पुराचे पाणी शिरले असून नदीकाठच्या घरांसह काही वारकरी संस्था आणि धर्मशाळांमध्येही पाणी घुसले आहे. परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन आळंदी देवस्थानने सर्व वारकरी, भाविक आणि नागरिकांना पुढील आदेश मिळेपर्यंत आळंदी शहरात प्रवेश करू नये, असे आवाहन केले आहे. शहरात येणारे नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेल्याने आळंदीकडे येणे सध्या धोकादायक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. आळंदीकडे प्रवास सुरू केलेल्या वारकरी व भाविकांनी ज्या ठिकाणी आहेत तेथेच सुरक्षित थांबावे, पोलीस, नगरपरिषद आणि आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या सूचनांचे पालन करावे. अफवांवर विश्वास ठेवू नये तसेच नदीपात्र, घाट परिसर आणि बंद करण्यात आलेल्या पुलांकडे जाणे टाळावे. नागरिकांनी संयम राखून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन आळंदी देवस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

## अडीचशे वारकऱ्यांची सुखरूप सुटका, चारही पूल पाण्याखाली,



## मुसळधार पावसामुळे पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामकाजात तात्पुरते बदल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** दि. ५ जुलै २०२६ पासून सुरू असलेल्या मुसळधार पावसाच्या पार्श्वभूमीवर प्रादेशिक परिवहन कार्यालय, पिंपरी–चिंचवड येथील दैनंदिन कामकाजात तात्पुरते बदल करण्यात आले आहेत.

आज (दि. ६ जुलै) HTR येथील वाहनचालक चाचणी तसेच शिकाऊ अनुज्ञप्ती (लर्निंग लायसन्स) चाचणीसाठी उपस्थित राहू न शकलेल्या अर्जदारांनी आपली अपॉइंटमेंट स्वतः च्या सोयीनुसार पुन्हा निश्चित (रिशेड्यूल) करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

चारचाकी वाहनांच्या नवीन मालिकेतील आकर्षक नोंदणी क्रमांकासाठी डिमांड ड्राफ्ट (dd) जमा करण्याची मुदत दि. ७ जुलै २०२६ रोजी दुपारी २.३० वाजेपर्यंत वाढविण्यात आली असून, एकाच क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास संबंधित क्रमांकाचा लिलाव दि. ८ जुलै २०२६ रोजी दुपारी ३.३० वाजता होणार आहे.

योग्यता प्रमाणपत्र (Fitness Cetificate) नूतनीकरणासाठी दि. ६ जुलै रोजी आलेल्या वाहनांची कामे संबंधित अधिकाऱ्यांच्या दैनंदिन क्षमतेनुसार पुढील सात दिवसांत पूर्ण करण्यात येणार असून, उर्वरित वाहनधारकांनी आपली वाहने दि. ११ जुलै २०२६ रोजी सादर करावीत.तसेच मंचर शिबिरासाठी दि. ६ जुलैची अपॉइंटमेंट कार्यालयामार्फत दि. १० जुलै २०२६ रोजी पुनर्नियोजित करण्यात आली आहे. मुसळधार पावसाची परिस्थिती कायम राहिल्यास पुढील बदलांविषयी स्वतंत्र प्रसिद्धीपत्रकाद्वारे नागरिकांना माहिती देण्यात येईल, असे प्रादेशिक परिवहन

## वारकऱ्यांनी देहू-आळंदी टाळून थेट पुण्यात यावे: मुख्यमंत्री फडणवीस

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे :** राज्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर संत ज्ञानेश्वर महाराज आणि संत तुकाराम महाराज यांच्या पालखी सोहळ्यादरम्यान वारकऱ्यांनी सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे.

मुख्यमंत्री म्हणाले की, सध्या निर्माण झालेली पूर परिस्थिती अत्यंत गंभीर असून प्रशासनाकडून त्यावर सातत्याने लक्ष ठेवले जात आहे. अतिवृष्टीमुळे इंद्रायणी नदीवरील चारही पूल पाण्याखाली गेले असून देहू आणि आळंदी परिसरात वाहतुकीसह हालचालींवर परिणाम झाला आहे. अशा परिस्थितीत कोणतीही दुर्घटना घडू नये, यासाठी वारकऱ्यांनी प्रशासनाला सहकार्य करावे.

वारी १० जुलै रोजी पुण्यात दाखल होणार असून देहू आणि आळंदी येथे मोठ्या प्रमाणात गर्दी करण्याऐवजी वारकऱ्यांनी थेट पुण्यात यावे, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी केले. सध्याच्या परिस्थितीत देहू किंवा आळंदी येथे जाणे धोकादायक ठरू शकते. त्यामुळे स्वतःच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने वारकऱ्यांनी प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असेही त्यांनी स्पष्ट केले.

वारीसाठी राज्य शासनाने आवश्यक त्या सर्व सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. पावसाची परिस्थिती लक्षात घेऊन वारकऱ्यांच्या निवारा, भोजन, वैद्यकीय सेवा आणि इतर आवश्यक सोयींचे नियोजन करण्यात आले असल्याचेही श्री. फडणवीस म्हणाले.

विशेषतः जास्तीत जास्त जर्मन हँगर उभारून वारकऱ्यांच्या सुरक्षित निवाऱ्याची व्यवस्था करण्यात येत असून कोणालाही कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, यासाठी प्रशासन युद्धपातळीवर काम करत आहे. राज्य शासन, जिल्हा प्रशासन, पोलीस, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा आणि संबंधित सर्व विभाग समन्वयाने कार्यरत असून वारकऱ्यांनी अफवांवर विश्वास न ठेवता केवळ प्रशासनाकडून दिल्या जाणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

## पूरपरिस्थितीमुळे अनेक भागांतील वीजपुरवठा बंद

### महावितरणचे वीजग्राहकांना सतर्कतेचे व सहकार्याचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पुणे:** पुणे व परिसरात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे आणि अनेक ठिकाणी निर्माण झालेल्या पूरपरिस्थितीमुळे महावितरणकडून खबरदारीचा उपाय म्हणून आणि नागरिकांच्या सुरक्षेसाठी विविध विभागांतील वीजपुरवठा तात्पुरता बंद ठेवण्यात आला आहे. अनेक ठिकाणी वीज यंत्रणेत पाणी साचल्यामुळे वीजपुरवठा खंडित झाला असून महावितरणचे कर्मचारी युद्धपातळीवर परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत. परिस्थिती पूर्वपदावर येताच वीजपुरवठा सुरु करण्यात येईल असे महावितरणतर्फे कळविण्यात आले आहे.

**विभागनिहाय सद्यस्थिती खालीलप्रमाणे:**

राजगुरुनगर विभाग: राजगुरुनगर विभागात सुरक्षेच्या कारणास्तव एकूण ५६९ रोहित्रांचा (Tansfomes) वीजपुरवठा बंद करावा लागला. *यामध्ये चाकण शहरातील २ फिडर बंद असल्याने ३३९ रोहित्र बंद होते. मात्र सायंकाळी ५.३० वाजेच्या सुमारास या दोन्ही फिडरचा वीजपुरवठा सुरु करण्यात यश आले.* याशिवाय राजगुरुनगर उपविभागात ५, चाकण एमआयडीसीत १०१, वडगाव मावळमध्ये ३९, लोणावळ्यात ६८ आणि तळेगाव येथे १८ रोहित्रे सुरक्षेसाठी बंद ठेवण्यात आली आहेत. दरम्यान, आंबेठाण गावाजवळील इमारतीत अडकलेल्या नागरिकांच्या बचाव कार्यासाठी 'एनडीआरएफ' (N¦RF) पथकाच्या विनंतीवरून सकाळी ११:४० वाजल्यापासून ३३ केव्ही ह्युंडाई, ३३ केव्ही कॉर्निंग आणि २२ केव्ही आंबेठाण फिडर काही काळासाठी बंद ठेवण्यात आला होता. **भोसरी विभाग:** देहूगाव येथील सोसायट्यांमध्ये पाणी साचल्यामुळे मुख्य अधिकाऱ्यांच्या सूचनेनुसार २२ केव्ही देहूगाव फीडर बंद ठेवण्यात आला आहे. तसेच एफए (FA) स्विचिंग स्टेशन, सेक्टर २४ स्विचिंग आणि ईडब्ल्यूएस (EWS) स्विचिंग स्टेशनमध्ये पुराचे पाणी शिरले आहे. पाण्याची पातळी आतील यंत्रणेपर्यंत पोहोचल्यामुळे सुरक्षेसाठी या केंद्रांमधून बाहेर जाणारा वीजपुरवठा बंद करण्यात आला आहे. नगररोड विभाग: विश्रांतवाडी शाखेतील इंदिरानगर भागात पाणी भरल्यामुळे १ रोहित्र बंद करावे लागले आहे.

## नैसर्गिक आपत्तीत नागरिकांना तातडीची मदत द्या : सुनेत्रा पवार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती :** जिल्ह्यात उद्भवलेल्या नैसर्गिक आपत्तीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाने नागरिकांना तातडीने आवश्यक ती सर्व मदत करावी अशा सुचना दिल्या आहेत. अतिवृष्टीच्या काळात प्रशासन सज्ज झाले असून नागरिकांनीही प्रशासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी केले. उपमुख्यमंत्री श्रीमती पवार यांनी आज विभागीय आयुक्त शीतल तेली–उगले, पुणे मनपा आयुक्त नवल किशोर राम, पिंपरी–चिंचवड मनपा आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, पीएमआरडीएचे आयुक्त अभिजित चौधरी, पुणे शहर पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पिंपरी–चिंचवड शहरचे पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीप गिल्ल, यांच्याकडून जिल्ह्यातील परिस्थितीबाबत आढावा घेतला. जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे बाधित भागातील नागरिकांना तात्काळ मदत पोहोचवा. गावातील संपर्क तुटल्यास युद्धपातळीवर उपाययोजना करुन पूर्वरत करावे.मानवी जीविताचे संरक्षण हे सर्वोच्च प्राधान्य मानून प्रत्येक निर्णय घ्यावा.नियंत्रण कक्ष २४७ पूर्ण क्षमतेने कार्यरत ठेवावा व प्रत्येक तासाला परिस्थितीचा आढावा घ्यावा. धोकादायक भागातील नागरिकांचे तातडीने स्थलांतर करून सुरक्षित निवारा, अन्न, पिण्याचे पाणी आणि आरोग्य सुविधा तातडीने उपलब्ध कराव्यात. पूर, भूस्खलन आणि धरण विसर्गाबाबत वेळेवर इशारे एसएमएस, सोशल मीडिया, ग्रामपंचायत व स्थानिक यंत्रणेमार्फत द्यावेत. कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी मुख्यालय सोडणार नाही. सर्व यंत्रणा सतत सज्ज ठेवाव्यात.एनडीआरएफ, एसडीआरएफ, पोलीस, अग्निशमन दल आणि महसूल यांच्यात समन्वय ठेवून तातडीने बचावकार्य करावे. बंद रस्ते, पूल आणि घाटांवर कडक बंदोबस्त ठेवून नागरिकांना धोकादायक ठिकाणी जाण्यापासून रोखावे.अफवांवर नियंत्रण ठेवून अधिकृत माहितीच प्रसारित करावी. मृत्यू, जखमी आणि नुकसानग्रस्त कुटुंबांना शासनाच्या नियमांनुसार तातडीची मदत उपलब्ध करून द्यावी. , पाणी, आरोग्य आणि दळणवळण सेवा शक्य तितक्या लवकर पूर्ववत करण्यासाठी संबंधित विभागांनी युद्धपातळीवर काम करावे. प्रत्येक दोन तासांनी परिस्थितीचा अद्ययावत अहवाल शासनाला सादर करावा. जिल्हाधिकारी स्वतः संवेदनशील भागांवर सतत देखरेख ठेवून आवश्यक ते निर्णय तातडीने घ्यावेत; कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. वारकऱ्यांची विशेष काळजी घ्यावी.

## बारामती येथे 'सीडस् ऑफ इन्सपायरेशन' व्याख्यान संपन्न

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**बारामती:** प्रत्येकाच्या जीवनात विविध अध्याय असतात, परिस्थितीप्रमाणे जीवन बदलत जाते, त्यामुळे जीवनात कुठल्याही परिस्थितीत हार मानू नका; अनुकुल वा प्रतिकुल परिस्थितीला सामोरे जाण्याची क्षमता अंगी विकसित करा, असा सल्ला उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी विद्यार्थ्यांना दिला. यापुढे जनसेवा आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्याचा मानसही त्यांनी यावेळी व्यक्त केला. ग. दि. मा. सभागृह, विद्यानगरी येथे 'सीडस् ऑफ इन्सपायरेशन' विषयावर आयोजित व्याख्यान्यात त्यांनी मार्गदर्शन केले. खासदार तथा ज्येष्ठ समाजसेविका पद्मविभूषण सुधा मूर्ती, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, नगराध्यक्ष सचिन सातव, विद्या प्रतिष्ठानचे विश्वस्त राजीव शहा, ॲड. निलीमा गुजर, विविध क्षेत्रातील मान्यवर, नागरिक, शिक्षक, पालक, विद्यार्थी आदी उपस्थित होते. श्रीमती पवार म्हणाल्या, सुधा मूर्तींनी संपूर्ण जीवन लोककल्याकरिता अर्पण केले



आहे. त्यांचे देशभरात समाजसेवेचे कार्य सुरु आहे. त्यांच्या जीवन कार्यातून प्रेरणा, उर्जा मिळते. आयुष्यात सतत नवनवीन शिकत राहण्यासह त्याचा समाजाकरिता उपयोग केला पाहिजे.

# भीमा नदीला पुर आल्याने इसम गेला वाहून

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**तळेगाव ढमढेरे, :** वढू बुद्रुक (ता. शिरुर) येथील भीमा नदीला पूर आलेला असताना नुकतेच एक इसम पाण्यात वाहून गेल्याची घटना घडली असून महादेव उर्फ बाळू किसन राऊत असे पाण्यात वाहून गेलेल्या इसमाचे नाव आहे.

वढू बुद्रुक (ता. शिरुर) येथील भीमा नदीच्या कडेला असेलल्या सणसवाडी गावाला पाणी पुरवठा करणाऱ्या पाण्याच्या टाकीच्या ओठ्यावर सोमवार ६ जुलै रोजी महादेव उर्फ बाळू किसन राऊत (वय ४५ वर्षे रा. वढू बुद्रुक ता. शिरुर जि. पुणे) हे दुपारच्या सुमारास झोपलेले होते, दोन वाजण्याच्या सुमारास भीमा नदीला अचानक पूर आल्याने सदर टाकीला पाण्याने वेढा घेतला असता महादेव हे पाण्यामध्ये अडकले गेले, घटनेची माहिती मिळताच पोलीस निरीक्षक चंद्रशेखर यादव, सहाय्यक पोलीस निरीक्षक हनुमंतराव गिरी, पोलीस हवालदार हेमंत कुंजीर, संदीप कारंडे, आत्माराम तळोले, मंडलाधिकारी गुलफाम शेख, तलाठी रमेश घोडे, पोलीस पाटील जयसिंग भंडारे, आपदा मित्र गणेश टिळेकर, शेरखान शेख, अमोल कुसाळकर, महेश साबळे, पुणे महानगर विकास महानगर प्राधिकरण दिग्वीजय नलावडे, शुभम चौधरी, ज्ञानेश्वर भोर, प्रनील दराडे, साईनाथ मोरे, अक्षय पठारे यांनी भर पावसामध्ये घटनास्थळी धाव घेत महादेव यांना वाचवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले मात्र पाण्याचा वाढत्या प्रवाहामुळे महादेव हे पाण्यात वाहून गेले तर अग्निशमन दल व आपदा मित्रांना यांचे महादेव यांना वाचण्यात अपयश आले.

वढू बुद्रुक येथे महादेव राऊत हे पाण्यामध्ये वाहून गेल्यानंतर नदीच्या कडेला वाहताना दिसताच पोलीस हवलदार हेमंत कुंजीर, पोलीस पाटील जयसिंग भंडारे, आपदा मित्र शेरखान शेख व अमोल कुसाळकर यांनी क्षणाचा विलंब न लावता जीवनरक्षक जाकीट घेत पाण्याच्या दिशेने धाव घेत इसामाला वाचवण्याचे प्रयत्न केले मात्र त्यांच्या धाडसाला अपयश आले.



वढू बुद्रुक (ता. शिरुर) येथे पाण्यात वाहून गेलेल्या इसमाला वाचवण्यासाठी प्रयत्न करणारे पथक.(छायाचित्र आकाश भोरडे)

## दीपक कदम यांना 'छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव' पुरस्कार प्रदान

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** स्वराज्यातून सुराज्याच्या नवनिर्माणाचा ध्यास घेतलेल्या स्वराज्य प्रतिष्ठान, शिवक्रांती प्रतिष्ठान ट्रस्ट आणि हुतात्मा बाळू गेणू स्मारक समितीच्या वतीने शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये श्रीरामपूर येथील महाराष्ट्र अल्पसंख्याक ख्रिस्ती विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष दीपक कदम यांना त्यांच्या उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल 'छत्रपती शिवाजी महाराज ज्ञानदीप गौरव पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.हा सोहळा स्वराज्य प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रमोद आप्पा पाटील यांच्या अध्यक्षतेखाली आणि माजी पोलीस महासंचालक डॉ. सुधाकर सुराडकर यांच्या उद्घाटनाखाली संपन्न झाला. याप्रसंगी माजी राज्यमंत्री ज्योतीताई ठाकरे, संभाजीराजे जाधवराव, अभिनेत्री पियू चौहाण, सुरज भोईर आणि अनिताताई काळे यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. मैत्री संस्था, सामाजिक कार्यकर्ते समन्वय समिती व मुंबई मित्र संघटनेचे या कार्यक्रमाला विशेष सहकार्य लाभले. पुरस्कार मिळाल्याबद्दल दीपक कदम यांनी सर्व उपस्थितांचे व आयोजकांचे आभार मानले असून त्यांचे सर्वस्तरातून अभिनंदन होत आहे.




## पुरात अडकलेल्या भाविकांची सुटका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**आळंदी :** इंद्रायणी नदीला आलेल्या पुरामुळे आळंदी शहरातील विविध ठिकाणी अडकलेल्या भाविकांची आळंदी नगरपरिषद, आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा, पोलीस प्रशासन, अग्निशमन दल, तसेच (एनडीआरएफ) आणि संबंधित विभागांच्या समन्वयातून सुरक्षित सुटका करण्यात आली. बचाव पथकांनी ज्ञानेश्वरी मंदिर परिसरातून २२०, इंद्रायणी नगरी येथून १००, ठाकूरबुवा मंडप येथून ६० आणि गोपाळपुरा येथून २८ अशा एकूण ४०८ भाविकांची सुरक्षित सुटका केली. तसेच विविध ठिकाणी वैयक्तिकरित्या अडकलेल्या भाविकांनाही सुरक्षित स्थळी हलविण्यात आले आहे. याशिवाय, बचाव पथकांनी पूरग्रस्त भागातील १५० गायींचीही सुरक्षित सुटका करून त्यांना सुरक्षित ठिकाणी हलविले आहे. प्रशासनामार्फत बचाव व मदतकार्य युद्धपातळीवर सातत्याने सुरू असून परिस्थितीवर संबंधित विभागांकडून सतत लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिक व भाविकांनी अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाच्या अधिकृत सूचनांचे पालन करावे, तसेच आवश्यक असल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जा.क्र. बां.वि./ BHOR३७७/२०२६ दि. ०३/०७/२०२६

**भोर नगरपरिषद, भोर**

**जाहीर निविदा सुचना क्र २ (२०२६-२०२७)**

भोर नगरपरिषदेच्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान योजने अंतर्गत शौचालय दुरुस्तीची हाती घेतलेल्या कामांच्या जाहिर निविदा मागविण्यात येत आहे.

या कामां संबंधीचा सविस्तर तपशील नोटीस बोर्ड वर दिनांक ०७/०७/२०२६ पासुन उपलब्ध असेल.

श्री. रामचंद्र आवारे — नगराध्यक्ष
सौ. जयश्री शिंदे — उपनगराध्यक्ष
श्री. गजानन शिंदे — मुख्याधिकारी

द•ख•ल



## वैद्यकीय सेवा व खर्डेकरांचे प्रेम कधीही विसरणार नाही - डॉ.देशमुख

**खर्डा :** मी गेली दोन वर्षे खर्डा प्राथमिक आरोग्य केंद्रात या भागातील नागरिकांना प्रामाणिकपणे वैद्यकीय सेवा दिली.वरिष्ठांच्या आदेशानुसार काम करताना येथील ग्रामस्थ, लोकप्रतिनिधी आणि सामाजिक कार्यकर्त्यांनी मला जी मोलाची साथ दिली ती मी कधीही विसरणार नाही. खर्डेकरांनी दिलेले प्रेम माझ्यासाठी कायम स्मरणात राहील,अशी प्रतिक्रिया वैद्यकीय अधिकारी डॉ.अजित देशमुख यांनी व्यक्त केली.खर्डा प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकीय अधिकारी डॉ.अजित देशमुख यांची बदली झाल्यानिमित्त एका विशेष समारंभाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमात ते बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ.सुनील बोराडे होते.यावेळी नुकत्याच हजर झालेल्या नूतन वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रमिला गुंड यांचाही सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे नेटके आयोजन डॉ.सोपान गोपाळघरे, महालिंग कोरे आणि पत्रकार दत्तराज पवार यांनी केले होते.यावेळभ डॉ.सोपान गोपाळघरे, महालिंग कोरे आणि पत्रकार दत्तराज पवार यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी आरोग्य विभागातील कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी प्रताप पाटील,व्ही.एस.वस्तारे , अरुण घुंगरड, गर्जे व आबासाहेब आमटे, प्रिया क्षेत्रे, रवींद्र गोपाळघरे, सानप यांच्यासह प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व सहकारी कर्मचारी आणि खर्डा परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## 'एक कुटुंब-दहा झाडे' अभियानाला प्रतिसाद



**श्रीगोंदा:** पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे जतन आणि भविष्यातील हरित वारसा निर्माण करण्याच्या उद्देशाने श्रीगोंदा तालुक्यातील उखलगाव येथे राबविण्यात आलेल्या 'एक कुटुंब-दहा झाडे' या अभिनव हरित अभियानाला ग्रामस्थांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. खपवळर निधीतून आणि चिराग फाउंडेशनच्या सहकार्याने गावातील प्रत्येक कुटुंबाला १० आंब्याची रोपे मोफत वाटप करण्यात आली.या अभियानाचे उद्घाटन कंपनीचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी राजू लाकुडझोडे यांच्या हस्ते झाले. यावेळी प्रा. संजय लाकुडझोडे पाटील, सामाजिक कार्यकर्ते बाबा दरवडे, विलास पाटील लाकुडझोडे, माऊली लाकुडझोडे, निलेश धावडे, स्वप्निल चंदन आणि अनिल दरवडे यांची प्रमुख उपस्थिती होती.बाळासाहेब ढवळे (बाळू फिटर) यांच्या निवासस्थानी रोपांचे वितरण करण्यात आले. ग्रामस्थांनी यापूर्वीच लागवडीसाठी खड्डे तयार ठेवल्यामुळे रोपे मिळताच त्यांची तातडीने लागवड करण्यात आली.



## श्रीगोंदा पेडगाव रोडवरील शेतरस्ता खुला

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील अर्जदार सौ. मीराताई शिंदे व सहअर्जदार यांच्या श्रीगोंदा-पेडगाव रोडपासून शेतात जाणाऱ्या जुन्या वहिवाट शेतरस्त्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, मा. तहसीलदार सचिन डोंगरे साहेब यांच्या आदेशानुसार हा रस्ता मंडळ अधिकारी जायभाय साहेब, तलाठी सुदर्शन साळवे, श्रीगोंदा पोलीस स्टेशनच्या कॉन्स्टेबल व्यवहारे यांच्या उपस्थितीत यशस्वीपणे खुला करण्यात आला.यावेळी अर्जदार मीराताई शिंदे व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रशासकीय अधिकारी, वादी-प्रतिवादी आणि ग्रामस्थ यांच्या सकारात्मक सहकार्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला हा प्रश्न शांततापूर्ण व कायदेशीर मार्गाने निकाली निघाला. लोकप्रतिनिधी,महसूल,भूमी अभिलेख चळवळीच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या हक्काचा शेत शिव पानंद वहिवाट रस्ते मिळत असून, हा न्यायाचा आणि शेतकरी एकतेचा महत्त्वाचा विजय आहे. या कामासाठी सहकार्य करणारे सर्व प्रशासकीय अधिकारी, पोलीस प्रशासन, वादी-प्रतिवादी आणि ग्रामस्थ महसूल भूमी अभिलेख यांचे , महाराष्ट्र राज्य चळवळ यांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले.

# कर्जतला संततधार... शाळकरी मुलांची दैना !

## पुण्याच्या धरणक्षेत्रात मुसळधार : पाण्याच्या विसर्गानंतर भीमानदी दुथडी वाहू लागली

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कर्जत :** सोमवारी पहाटेपासून कर्जत शहर आणि परिसरात पावसाची संततधार सुरू असल्याने सर्वसामान्य नागरिकांसह, चाकरमानी आणि मोठ्या प्रमाणात विद्यार्थ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. अनेकांना छत्र्या, रेनकोटचा आधार घेत आपल्या नियोजित ठिकाणी जावे लागले. या संततधार आणि भीज पावसाने शेतकरीवर्गात समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून अनेक सखल भागात पावसाचे चांगले पाणी जमा झाले होते. कर्जतच्या आठवडे बाजारावर या पावसाने चांगलाच परिणाम जाणवला.



सोमवार, दि ६ रोजी पहाटेपासूनच पावसाची संततधार सुरू होती. सकाळी १० पर्यंत पावसाच्या सरीचा वेग चांगला होता. सकाळपासूनच सुरू असलेल्या संततधारेने मात्र सर्वसामान्य दुकानदार, नागरिक, चाकरमानी आणि मोठया प्रमाणात विद्यार्थ्यांची चांगलीच तारांबळ उडाली. बाहेर पडताना छत्र्या तसेच रेनकोटचा वापर करीत त्यांना आपल्या कामासाठी रवाना व्हावे लागले. मान्सूनच्या एका महिन्यात कर्जतला प्रथमताच लागोपाठ संततधार पहावयास मिळाली. या पावसाने कर्जत शहरातील अनेक सखल भागात पावसाचे पाणी जमा झाले होते. सोमवार कर्जतचा आठवडे बाजार असल्याने या संततधार पावसाचा मोठा फटका बसला. अनेक बाजारकरूनी पाठ फिरवल्याने यंदाचा आठवडे बाजार जरा तुरळकच भरला. या पावसाने मात्र सर्वसामान्य शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले. कर्जत तालुक्यातील १० महसुली मंडळ क्षेत्रापैकी अपवाद एक-दोन महसुली मंडळात जून महिन्यात मान्सून पावसाने चांगली हजेरी लावली. त्याच भागात खरीप हंगाम पेरणी दिसली. जून अखेर कर्जत तालुक्यात खरीप पेरणीचे प्रमाण अवघे सरासरी १४ टक्केच होती. परंतु सोमवारी झालेल्या या संततधार आणि भीज पावसाने पेरणीसाठी योग्य ओल मिळेल असा विश्वास जाणकार कृषी तज्ज्ञांनी व्यक्त केला. त्यामुळे रखडलेल्या खरीप पेरणीस या पावसाने पोषक वातावरण निर्माण झाले आहे.

**भीमानदीत पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने नदीकाठच्या गावांनी सतर्कता बाळगावी. यासह जिल्हा प्रशासन आणि तालुका प्रशासनाच्या सुचनेचे पालन करावे असे आवाहन कर्जतचे प्रांताधिकारी नितीन पाटील यांनी केले. पुणे परिसर यासह धरण क्षेत्रात मान्सूनच्या मुसळधार पावसामुळे दौंड येथील भीमानदीत मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग सुरू आहे. त्यामुळे भीमानदी दुथडी भरून वाहत आहे.**

## अभ्यासातून उज्ज्वल भविष्य घडते : नजन



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**शहरटाकळी :** शेवगाव तालुक्यातील दहीगाव ने येथील नवजीवन माध्य व उच्च माध्यमिक विद्यालय दहीगाव ने येथे इ ११वी कला वाणिज्य व विज्ञान या नवीन शैक्षणिक वर्गात प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. या कार्यक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थी विद्यार्थिनी च्या पालक मातां उपस्थित राहून कार्यक्रममोठ्या उत्साहात संपन्न झाला, कार्यक्रमांचे प्रास्ताविक विद्यालयाचे प्राचार्य प्रा डॉ रमेश खैरे यांनी कनिष्ठ महाविद्यालयातील शासकीय ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेतून तीन शाखेत प्रविष्ट झालेल्या विद्यार्थ्यांची संख्या क्षमतेनुसार होत असलेले प्रवेश या बाबत समाधान व्यक्त केले व विद्यार्थ्यांना विद्यालयाच्या नियमा बद्दल मार्गदर्शन केले याप्रसंगी विद्यालयाचे पर्यवेक्षक श्री मच्छिंद्र पानकर यांनी मनोगत व्यक्त केले व कार्यक्रमाचे अध्यक्ष जनता शिक्षण प्रसारक मंडळाचे प्रशासकीय अधिकारी कारभारी नजन यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासाचे महत्त्व व पालकांप्रती असलेले आपले कर्तव्य तसेच इत्यादी शिस्तीचे पालन करण्याचे आवाहन केले याप्रसंगी उपस्थित विद्यालयाचे उप प्राचार्य श्री जयराम नांगरे प्रा. बाळासाहेब मंडलिक व कनिष्ठ विद्यालयीन सर्व प्राध्यापक वृंद व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.श्रीमती सुनीता ढगे यांनी केले व आभार प्रा. मकरंद बारगुजे यांनी मानले.



## जिल्हा मल्लखांब असोसिएशनच्या अध्यक्षपदी शिंदे; कुलकर्णी सचिव

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**नगर तालुका:** अहमदनगर जिल्हा मल्लखांब असोसिएशनची कार्यकारीणीची मुदत जून २०२६ रोजी संपली होती. नवीन कार्यकारीणी निवड दि. ५ जुलै रोजी प्रगत विद्यालय, अहिल्यानगर येथे आयोजित करण्यात आली होती. सदर निवडणूक सलग दुसऱ्यांदा बिनविरोध पार पडली. या निवडणुकीसाठी ड कु. स्नेहा लोखंडे यांनी कामकाज पाहिले. नूतन कार्यकारिणीमधे अध्यक्षपदी नंदेश शिंदे, उपाध्यक्षपदी अनंत रिसे व दिलीप झोळेकर, सचिवपदी निलेश कुलकर्णी, सहसचिवपदी मोहनीराज लहाडे व सुनिल सुसरे, खजिनदारपदी अमित जिनसीवाले यांची बिनविरोध निवड झाली. निवडणूक प्रक्रियेसाठी जिल्ह्यातील अनेक सन्माननीय सदस्य उपस्थित होते. तांत्रिक समिती निमंत्रक पदी गणेश वाळुंजकर तर सदस्यपदी योगेश म्याकल, अमोल निमोणकर, ओंकार केसेकर, कु. प्राजक्ता दळवी ह्यांची नूतन कार्यकारीणीकडून निवड करण्यात आली. माजी अध्यक्ष राजकुमार धोत्रे यांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन केले व पुढिल वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## यश फौंडेशनला १७ हजारांची पुस्तके भेट



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**ढोरजळगांव :** जोहरापूर येथील यश फाउंडेशनचे कार्य प्रथम क्रमांकाचे असून वाचन, संस्कृती, शिक्षण व सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचे योगदान प्रेरणादायी आहे. असे गौरवोद्गार या वेळी शब्दगंध परिषदेचे अध्यक्ष राजेंद्र उदागे यांनी बोलताना व्यक्त केले. शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्य आयोजित १७ व्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचा सभेत शेवगाव तालुक्यातील जोहरापूर येथील 'यश' फाउंडेशनचा उलखनीय शैक्षणिक व सामाजिक कार्याची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून,परिषदेच्यावतीने १७ हजार रुपये किमतीची पुस्तके व कादंबऱ्यांचा संच यावेळी भेट देण्यात आला.यावेळी सुनील गोसावी, राजेंद्र उदागे अध्यक्ष, मेजर संजय डोंगरे, प्रा लक्ष्मण देवढे, प्रा विधाते सर, प्रा डॉ परमेश्वर ढगे आणि यश फाउंडेशन चे संचालक अशोकराव देवडे उपस्थित होते.

**यश फाउंडेशन ला मिळालेला हा राज्यस्तरीय गौरव, वाचन संस्कृती, शिक्षण आणि सामाजिक बांधिलकीच्या कार्याला नवीन ऊर्जा देणारा ठरेल,असा विश्वास प्रा डॉ परमेश्वर ढगे यांनी व्यक्त केला.**

## जिजाऊंचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी



**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**जामखेड :** राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या ३५३ व्या पुण्यतिथीनिमित्त सिंदखेडराजा ते पाचाड या ऐतिहासिक स्मृतीज्योत रथयात्रेचे जामखेड शहरात सोमवारी शिवभक्तांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात आणि जय जिजाऊ, जय शिवारायच्या घोषणांनी जल्लोषात स्वागत करण्यात आले. संपूर्ण जामखेड शहर जिजाऊ-शिवरायांच्या जयघोषाने दुमदुमून गेले होते. या ऐतिहासिक क्षणाचे साक्षीदार होण्यासाठी नागरिक, युवक, महिला व शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित होते रथयात्रेचे जामखेड शहरात आगमन होताच विविध सामाजिक संस्था, शिवप्रेमी संघटना व नागरिकांच्या वतीने फुलांची उधळण करून तसेच पुष्पहार अर्पण करून भव्य स्वागत करण्यात आले. स्वागत समारंभात बोलताना जिजाऊंचे वंशज भागवत राजे जाधव म्हणाले, राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांनी सर्व जाती-धर्मांना सोबत घेऊन हिंदवी स्वराज्याचा संकल्प प्रत्यक्षात साकार केला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वामागे जिजाऊंचे संस्कार, दूरदृष्टी, राष्ट्रप्रेम आणि न्यायनिष्ठा होती. त्यांनी बालशिवबांना केवळ युद्धकला नव्हे, तर प्रजेप्रती असलेली जबाबदारी, धर्मनिरपेक्षता, स्त्रीसन्मान आणि स्वाभिमानाचे धडे दिले. त्यांच्या संस्कारातूनच हिंदवी स्वराज्याची निर्मिती झाली.प्रा. मधुकर राळेभात यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, राष्ट्रमाता जिजाऊ यांनी या देशाला दोन छत्रपती दिले. नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी म्हणाल्या, गुलामगिरी, अन्याय आणि अत्याचाराविरोधात लढण्याची प्रेरणा राष्ट्रमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या जीवनातून मिळते. स्त्रीशक्ती, राष्ट्रनिष्ठा, सामाजिक समता या स्वागत सोहळ्यास प्रा. मधुकर राळेभात, माजी जिल्हा परिषद सदस्य शहाजी राळेभात, नगराध्यक्षा प्रांजल चिंतामणी, मराठा सेवक अवधूत पवार, नगरसेविका नंदा होळकर, सिमा कुलकर्णी, सुमन शेळके, नगरसेवक मोहन पवार, पवन राळेभात, मनोज कुलकर्णी, राजेंद्र गोरे, वसीम सय्यद, प्रशांत राळेभात, कॅप्टन लक्ष्मण भोरे, तात्यासाहेब बांदल, गुलाब जांभळे, विनायक राऊत, हरिभाऊ आजबे, अमित जाधव, कुंडल राळेभात, संभाजी मुळे, संभाजी ढोले, डॉ. भरत देवकर, सागर अंदुरे, प्रविण उगले, अनिल अडाले, सचिन शिंदे, बजरंग सरडे, गणेश हागवणे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे पदाधिकारी, महिला, युवक आणि मोठ्या संख्येने शिवभक्त उपस्थित होते.

## दीड वर्ष खोदलेले पूल पावसात नागरिकांचा जीव धोक्यात!

**सर्जेराव साळवे । राष्ट्र सह्याद्री**

**बेलवंडी :** शिरूर ते श्रीगोंदा या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्याच्या रुंदीकरण आणि सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम सुरू होऊन जवळपास दिड वर्षांचा कालावधी होत आला आहे. मात्र, या मार्गावरील पुलांची कामे आजही अपूर्ण अवस्थेत असल्याने ऐन पावसाळ्यात नागरिकांचे प्रचंड हाल होत आहेत. कंत्राटदाराच्या दिरंगाईकडे आणि संबंधित प्रशासनाच्या निष्क्रियतेकडे बोट दाखवत प्रवासी व स्थानिक नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे.

पुलाच्या कामाचा वेग अत्यंत संथ असून नियोजनाचा पूर्ण अभाव दिसून येत आहे. अनेक ठिकाणी पुलांचे काम अर्धवट सोडण्यात आल्याने पर्यायी रस्त्यांवरून वाहतूक सुरू आहे. पावसामुळे या ठिकाणी चिखलाचे साम्राज्य निर्माण झाले असून नागरिकांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा मार्ग धोकादायक बनला आहे. चिखलात वाहने घसरून लहान-मोठे अपघात होत असून महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि शेतकरी यांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. अपघातानंतरच प्रशासन जागे होणार का, असा संतप्त सवाल नागरिकांकडून



उपस्थित केला जात आहे.

बेलवंडी फाट्यानजीकचा पूल, देवदैठण, ढवळगाव, पिंपरी कोलंदर, उक्कडगाव व बेलवंडी हद्दीतील पुलांची कामे अजूनही अपूर्ण आहेत. ऐन पावसाळ्यात पुलाची कामे अपूर्ण असून जास्त पाऊस झाल्यास वाहतुकीला अडथळा निर्माण झाल्यास जबाबदारी कोणाची असा देखील प्रश्न उपस्थित होत आहे. रस्त्याचे सिमेंट काँक्रिटीकरणाचे काम जवळपास दिड वर्षांपासून चालू आहे.असे असले तरी पुलांची कामे पूर्ण का झाली नाहीत? कामात होत असलेल्या विलंबासाठी जबाबदार कोण? संबंधित यंत्रणा याबाबत मौन का बाळगून आहेत? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे नागरिक मागत आहेत.

# वन विभागाच्या पर्यटन संकल्पनेलाच तडा!

## स्वच्छतागृहाची दुरावस्था: सोयीसुविधांचा बोजवारा, याला जबाबदार कोण?

**प्रवीण खोमणे । राष्ट्र सह्याद्री**

**एरंडगांव :** शेवगाव शहरातील पाथर्डी रोडवरील वन विभागाच्या पर्यटन केंद्राचे तीन वर्षांनंतर पुन्हा उद्घाटन झाल्यानंतर येथील विविध त्रुटी आणि दुरावस्था एकामागोमाग समोर येत आहेत. वन विभागाने पर्यावरण संवर्धन, जैवविविधतेचे संरक्षण, वन्यजीव व पक्ष्यांविषयी जनजागृती आणि निसर्ग पर्यटनाला चालना देण्याच्या उद्देशाने हे पर्यटन केंद्र उभारले होते. मात्र संबंधित अधिकाऱ्यांच्या दुर्लक्षामुळे आणि कथित हलगर्जी कारभारामुळे या उद्दिष्टांनाच हरताळ फासला गेल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.या पर्यटन केंद्रात विविध प्रकारचे वृक्ष, पक्षी आणि वन्यजीवांचे नैसर्गिक अधिवास जपण्याबरोबरच पर्यटकांना निसर्गाचा जवळून अनुभव मिळावा, विद्यार्थ्यांमध्ये पर्यावरणाविषयी जागृती निर्माण व्हावी तसेच स्थानिक पर्यटनाला चालना मिळावी, असा शासनाचा हेतू होता. मात्र प्रत्यक्षात केंद्रातील सुविधांची झालेली दुरवस्था पाहता हे सर्व उद्दिष्टच अपूर्ण राहिल्याचे चित्र दिसत आहे.यापूर्वी पर्यटन केंद्रातील जळालेली झाडे, चोरीस गेलेले दिवे, सौर ऊर्जा यंत्रणेची



झालेली नासधूस आणि इतर अनेक त्रुटी समोर आल्या होत्या. आता आणखी एक धक्कादायक बाब समोर आली असून पर्यटकांसाठी उभारण्यात आलेल्या स्वच्छतागृहांवर पाण्याच्या टाक्याच बसविण्यात आलेल्या नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे लाखो रुपयांचा खर्च करून उभारण्यात आलेल्या या सुविधांचा उपयोगच होत नसल्याचा आरोप होत आहे.याबाबत संबंधित ठेकेदार पंकज हाके यांच्याशी संपर्क साधला असता, याबाबत मला काही आठवत नाही, असे उत्तर त्यांनी दिल्याचे सांगण्यात आले. त्यामुळे कामाच्या गुणवत्तेबाबत तसेच संबंधित अधिकारी आणि ठेकेदार यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.वन पर्यटन केंद्र हे पर्यावरण संरक्षण, जैवविविधतेचे संवर्धन आणि नागरिकांना स्वच्छ, सुरक्षित व दर्जेदार पर्यटन सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी उभारण्यात आले होते. मात्र मूलभूत सुविधांचाच अभाव असल्याने शासनाच्या उद्दिष्टांनाच धक्का बसल्याची प्रतिक्रिया पर्यटक आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

**शेवगाव वन पर्यटन केंद्र भाग ३**

**यासंदर्भात वन विभागाचे वनसंरक्षक गजेंद्र हिरे प्रादेशिक नाशिक यांना या संदर्भात विचारले असता त्यांनी या संदर्भात आपल्याला अद्याप पर्यंत काहीही माहिती आलेली नाही... माहिती घेऊन काय ते बोलतो असे ते म्हणाले.**

**भ्रष्टाचाराची चौकशी करा, अन्यथा आंदोलन**

**वन पर्यटन केंद्रातील कथित अनियमितता व दुरवस्थेची शासनस्तरावर तातडीने चौकशी करण्यात यावी. अन्यथा स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक भूमिका घेत रास्ता रोको आंदोलन करून संबंधित अधिकाऱ्यांना जाब विचारेल, असा इशारा संघटनेचे जिल्हा सरचिटणीस बाळासाहेब फटांगडे यांनी दिला आहे.**

## कोरडगाव ग्रामपंचायतीचा भोंगळ कारभार

### चिखल, घाण, गटारगंगेत नागरीकांचे हाल

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**कोरडगाव :** पाथर्डी तालुक्यातील कोरडगाव ग्रामपंचायतीच्या निष्क्रिय आणि भोंगळ कारभारामुळे वार्ड क्रमांक २ मधील राममंदिरापासून बोंद्रे गल्लीपर्यंतचा रस्ता अक्षरशः चिखल, घाण आणि गटाराच्या पाण्याने व्यापला असून नागरिकांना रोज जीव मुठीत धरून ये-जा करावी लागत आहे. सलग तीन दिवस झालेल्या पावसाने ग्रामपंचायतीच्या नियोजनशून्य कारभाराचा बुरखा फाडला आहे.गावात ठिकठिकाणी सुरू असलेल्या बांधकामांमधील माती, विटा, वाळू आणि इतर साहित्य सर्रास रस्त्यावर टाकण्यात आले आहे. त्यावर पावसाचे पाणी पडल्याने संपूर्ण रस्ता दलदलीत बदलला असून पायी चालणेही धोकादायक बनले आहे. शालेय विद्यार्थी, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि दुचाकीस्वारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.बंदीस्त गटारीसाठी बसविण्यात आलेले पाईप अपुऱ्या क्षमतेचे असल्याने पावसाचे पाणी रस्त्यावरच साचत आहे. दुसऱ्या बाजूला साईड गटार नसल्याने तेथील पाणीही थेट रस्त्यावर येत असून संपूर्ण परिसराला अक्षरशः गटारगंगेचे स्वरूप आले आहे. दुर्गंधी, डास आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचाही प्रश्न गंभीर बनला आहे.यातच गावातून ट्रॅक्टरद्वारे सुरू असलेल्या कथित अवैध वाळू वाहतुकीमुळे रस्त्यांची आणखी दुर्दशा होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी



केला आहे. जड वाहनांच्या सततच्या वर्दळीमुळे रस्त्यांचे मोठे नुकसान होत असतानाही संबंधित यंत्रणा आणि ग्रामपंचायत याकडे डोळेझाक करत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली आहे.सर्वात संतापजनक बाब म्हणजे एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही ग्रामपंचायतीच्या कारभाऱ्यांनी या भागाची साधी पाहणीदेखील केलेली नाही. निवडणुकीच्या वेळी घराघरांत मतांसाठी फिरणारे कारभारी आता जनतेच्या हालअपेष्टांकडे का फिरकत नाहीत? जनतेने फक्त मतदान करायचे आणि नंतर चिखल-गटारात जगायचे का? असा संतप्त सवाल विशेषतः महिला वर्गातून उपस्थित केला जात आहे.

दैनिक
# राष्ट्र सह्याद्री



## माहेरहून पाच लाख आणण्यासाठी विवाहितेचा छळ; पतीसह तिघांविरुद्ध गुन्हा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : माहेरहून जागा घेण्यासाठी पाच लाख रुपये आणावेत, या मागणीसाठी विवाहितेचा मानसिक व शारीरिक छळ केल्याप्रकरणी पती, सासू आणि दिराविरुद्ध सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत कमल अरुण शिंदे (वय २४, रा. घोडेश्वरी मंदिराजवळ, घोडेगाव, ता. नेवासा) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, सासरी नांदत असताना माहेरहून पाच लाख रुपये आणण्यासाठी तिच्यावर सातत्याने दबाव टाकण्यात आला. तसेच शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहाण, मानसिक छळ करून उपाशी ठेवल्याचा आरोप फिर्यादीने केला आहे. या प्रकरणी पती अरुण बाबाजी शिंदे, सासू कमल बाबाजी शिंदे आणि दिर ज्ञानदेव बाबाजी शिंदे उर्फ भैया (सर्व रा. घोडेगाव, ता. नेवासा, जि. अहिल्यानगर) यांच्याविरुद्ध सोनई पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ३०९/२०२६ नोंदविण्यात आला आहे. त्यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम ८५, ११५(२), ३५२ व ३५१(२)(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास सहाय्यक पोलिस निरीक्षक अनिल मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हेड कॉन्स्टेबल गावडे करीत आहेत.

## अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर अकरावी प्रवेश प्रक्रियेला ८ जुलैपर्यंत मुदतवाढ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई** : राज्यातील काही भागांमध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना सुटी जाहीर करण्यात आल्याने इयत्ता अकरावीच्या केंद्रीय ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील विशेष फेरी-१ चे सुधारित वेळापत्रक जाहीर करण्यात आले आहे. यानुसार विद्यार्थ्यांना प्रवेश निश्चित करण्यासाठी ८ जुलै २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. शिक्षण संचालनालयाने दिलेल्या माहितीनुसार, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी राज्यातील ९ हजार ६८८ कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये अकरावी प्रवेश प्रक्रिया सुरू आहे. आतापर्यंत १४ लाख ७३ हजार ४२० विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून त्यापैकी १० लाख ८ हजार ९४ विद्यार्थ्यांनी प्रवेश निश्चित केला आहे. विशेष फेरी-१ अंतर्गत ज्या विद्यार्थ्यांना कनिष्ठ महाविद्यालयाचे वाटप झाले आहे, त्यांना संबंधित महाविद्यालयात आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करून प्रवेश निश्चित करण्यासाठी ८ जुलैपर्यंतची मुदत देण्यात आली आहे. सुधारित वेळापत्रकानुसार ८ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता पुढील प्रवेश फेरीचे वेळापत्रक जाहीर करण्यात येणार आहे. त्यानंतर १० जुलै रोजी रिक्त जागांची माहिती प्रसिद्ध केली जाईल. विद्यार्थी, पालक तसेच कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी सुधारित वेळापत्रकाची नोंद घेऊन प्रवेश प्रक्रियेतील सर्व कार्यवाही निर्धारित मुदतीत पूर्ण करावी, असे आवाहन शिक्षण संचालनालयाने केले आहे. प्रवेश प्रक्रियेविषयी अधिक माहितीसाठी https://mahafyjcadmissions.in या अधिकृत संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करून देण्यात आली असल्याची माहिती शालेय शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) डॉ. महेश पालकर यांनी दिली आहे.

## श्रीराम जन्मभूमी न्यासाच्या आर्थिक व्यवहाराचे नियमित लेखापरीक्षण

### हिशोब सुरक्षित असून पडताळणीस खुला :गोविंददेवगीरिजी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**पुणे** :आयोध्येतील श्रीराम मंदिरातील दानपेटीतील दानचोरीचा प्रकार खेडजनक व धक्कादायक आहे. भक्तांद्वारे जे दान दिले जाते व मोजले जाते त्याच्याशी आपला दुरान्वये संबंध नाही. आपण रमजान्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष म्हणून कार्यरत असून न्यासाचे आजवरचे हिशोब चोख व सुरक्षित आहेत. कोषामधील जमाखर्चाचे नियमित लेखपरीक्षण केलेले आहे. सदर जमाखर्चाची अधिकृत व्यक्तीद्वारे पडताळणी केली जाऊ शकते. त्यामुळे राममंदिर दानचोरी प्रकरणी कसून चौकशी होऊन दोषी कितीही मोठा असला तरी त्यास कठोर शासन व्हावे अशी मागणी श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष श्री.गोविंददेवगिरी यांनी केली आहे. यासंदर्भात प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात गोविंददेवगिरी यांनी म्हटले आहे की, राममंदिरात रामचरणी समर्पित दान आणि श्रीराम जन्मभूमी न्यास देणगीचा संबंध नाही. राम मंदिरातील दान आदीची मोजणी स्वतंत्र यंत्रणेद्वारे होते. तसेच व्यवहार बँकेद्वारा होतात ज्याचाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. आपण श्रीराम जन्मभूमी न्यासाचे कोषाध्यक्ष असून आपण अत्यंत विश्वास व निष्ठेने हि जबाबदारी पार पाडीत आहोत. न्यासाला आजवर ज्या देणगी मिळाल्या व जे खर्च झाले त्याच्या जमाखर्चाचे नियमित लेखापरीक्षण झालेले आहे. आपण मंदिरासाठी चेक व्यतिरिक्त रोख किंवा वस्तू स्वरूपात भेट स्वीकारलेली नाही. त्यामुळे झालेल्या प्रकारांशी आपला काहीही संबंध नाही. झालेल्या घटनेची विशेष चौकशी समिती चौकशी करीत असून चौकशीअंती सत्य समोर येईलच असा निर्वाळा त्यांनी दिला. श्रीराम जन्मभूमी न्यासाचे विश्वस्त वा कोषध्यक्ष पदासाठी आपण कोणतेही प्रयास केले नाहीत. कोषाध्यक्ष म्हणून हिशोब चोख राखणे आपले कर्तव्य आपण प्रामाणिकपणे पार पाडले आहे.आपण विमान प्रवास वा अन्य खर्च स्वतः केलेला आहे.त्यामुळे चोरीच्या घटनेची कसून चौकशी व्हावी आणि दोषी कितीही मोठा असला तरी त्यास शासन व्हावे अशी मागणी गोविंददेवगिरी यांनी केली आहे.

# अन्न औषध प्रशासनाच्या कारवाईत राहुरीच्या तिघांचा समावेश

## २६ जणांवर गुन्हे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : अन्न व औषध प्रशासनाने देशातील सर्वात मोठी कारवाई शनिवारी केली असून पुणे जिल्ह्यातील मंचर येथे केलेल्या कारवाईत सहा जिल्ह्यातील मोठे रॅकेट समोर आले आहे. कृत्रिम दूध निर्मितीच्या संशयातून या प्रकरणात संशयित २६ जणांवर गुन्हे दाखल झाले असून, त्याचे धागेदोरे अहिल्यानगर जिल्ह्यापर्यंत पोहोचले आहेत.



या संदर्भात माध्यमातून समजलेल्या माहितीनुसार यामध्ये राहुरीतील तीन तर वाळकीचा एक अशा चार जणांवर गुन्हे दाखल आहेत. यामध्ये राहुरी तालुक्यातील टाकळीमियामधील मोरवाडी येथील प्रमोद घोरपडे,सोनगाव सात्रळ येथील प्रकाश कडू, राहुरी तालुक्यातील अजित कारंडे, नगर तालुक्यातील वाळकी येथील शुभम गिरवले यांचा समावेश असल्याचे समजते.

शनिवारी दुपारी मंचरच्या नवकार डिस्ट्रीब्यूटर यावर छापा टाकण्यात आला. सुशांत हिंगे यांच्या गोदामामध्ये आणि गाडीमध्ये दूध भेसळीसाठी वापरल्या जाणाऱ्या वेगवेगळ्या पावडर व काही रसायने आढळून आली. हिंगे यांनी आपण वेगवेगळ्या पावडर आणि व्हेजिटेबल ऑइल, डिटर्जंट, रासायनिक द्रव्ये यांचा फार्मूला तयार करून तो दूध संकलन केंद्र व इतर लोकांना पोचवत असतो अशी कबुली दिली.

नंबर एक आरोपी हेमंत टेके, अकलूज हा पावडर पुरवठादार आहे, भिवंडीचा संजोग यादव हा केमिकल पुरवठादार होता. अनेक जिल्ह्यात ही साखळी कार्यरत होती. मंचरच्या आरोपीने आपण विविध जिल्ह्यातील दूध संकलन केंद्राला ही साहित्य पुरवत असल्याची माहिती दिली आहे. त्यानुसार रविवारी अहिल्यानगर जिल्ह्यातही विशेषत राहुरी तालुक्यात विविध ठिकाणी मंचर पोलिसांनी स्थानिक अन्न व औषध प्रशासनाने छापे टाकले. यावेळी वेगवेगळे साहित्य जप्त करणे एवढेच नव्हे तर आर्थिक व्यवहार आणि डिजिटल पुरावे हे देखील तपासले गेल्याची माहिती समजली आहे. यात मोबाईल, सीसीटीव्ही. वाहतूक व्यवस्था यातूनच सह आरोपी निष्पन्न करण्यावर भर असल्याचे सांगितले जाते.

एकूणच वरील सर्व आरोपींनी संगनमताने, आर्थिक लाभाच्या दृष्टीने अखाद्य विषारी रासायनिक पदार्थ वापरून असुरक्षित व आरोग्यास घातक अन्न कृत्रिम बनावट दूध तयार करून साठवणूक वाहतूक विक्री करून व सामान्य जनतेची फसवणूक केली असून त्यांच्या जीविताला व आरोग्यास गंभीर धोका निर्माण केला. स्वाती म्हस्के या पुणे विभागाच्या अन्न व औषध प्रशासन अधिकारी आहेत. त्यांनी फिर्यादी आहे. त्यानुसार संशयित २६ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समजली आहे.

## मुळा धरणात १८७२४ क्युसेसने पाण्याची विक्रमी आवक

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : तालुक्यात व परिसरात काल रात्री पासून पावसाचा हलक्या ते मध्यम स्वरूपाचा पाऊस सुरू असल्यामुळे या संततधार पावसामुळे वातावरणात गारवा मोठ्या प्रमाणात गारवा निर्माण झाला आहे.



संततधार पावसामुळे मुळा धरणात नवीन पाण्याची नव्याने आवक सुरू झाली असून, काल सायंकाळी सहा वाजता कोतुळकडून मुळा धरणात येणाऱ्या पाण्याची आवक सुमारे १८,७२४ क्युसेसने सुरु होती. पावसाचे प्रमाण असेच राहिल्यास आवक अजून वाढण्याची शक्यता आहे. गेल्या दोन दिवसांपासून धरणाच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या दमदार पावसामुळे कोतुळकडुन मुळा नदीतून धरणाकडे नव्याने पाण्याची आवक सुरू झाली आहे.

सध्या मुळा धरणात सुमारे २५ टक्के एकूण पाणीसाठा असून त्यातील उपयुक्त साठा केवळ ९ टक्के आहे. मात्र नव्याने पाण्याची आवक सुरू झाल्याने नगर शहरासह राहुरी, नेवासा, पाथर्डी आणि शेवगाव तालुक्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

मुळा धरणात नव्याने पाण्याची आवक सुरू झाल्यामुळे धरणाच्या लाभक्षेत्रासह अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या काही दिवसांत मुळा धरणाची पातळी अतिशय खालावली होती. धरणाने तळगाठल्यामुळे पिण्याच्या पाण्याची सुद्धा चिंता निर्माण झाली होती. परंतु निसर्गाने साथ दिल्यामुळे काही प्रमाणात पिण्याच्या पाण्याची चिंता कमी झाली आहे.

## श्रीरामपूरमध्ये बाल तस्करी की भीक मागणारी टोळी?

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : शहरातील अत्यंत गजबजलेल्या शिवाजी चौक परिसरात काल घडलेल्या एका संशयास्पद घटनेने श्रीरामपूरकरांना विचार करण्यास भाग पाडले आहे. खांद्यावर निपचित पडलेल्या एका लहान बालकाला घेऊन भीक मागणाऱ्या महिला आणि त्यांचा संशयास्पद वावर यामुळे शहरात बालकांचा गैरवापर करणारी एखादी संघटित टोळी किंवा रॅकेट तर सक्रिय नाही ना? असा गंभीर प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. काल एका सुजाण नागरिकाला शिवाजी चौक परिसरात दोन महिला भीक मागताना दिसल्या. त्यातील एका महिलेच्या खांद्यावर एक लहान बाळ अत्यंत शांत, निपचित अवस्थेत पडलेले होते. ऐन गर्दीच्या आणि आवाजाच्या ठिकाणीही ते बाळ हालचाल करत नसल्याने त्या नागरिकाला संशय आला. त्यांनी सत्य परिस्थिती जाणून घेण्यासाठी मोबाईलद्वारे फोटो काढण्याचा प्रयत्न केला असता, त्या दोन्ही महिलांनी तातडीने आपले चेहरे लपवले आणि तेथून पळ काढला. महिलांच्या या पळपुटेपणामुळे संशयाची सुई अधिकच बळावली आहे. ते लहान मूल नैसर्गिकरित्या झोपले होते की भीक मागण्यासाठी त्याला कोणतेही अंमली किंवा गुंगीचे औषध देण्यात आले होते? त्याची प्रकृती ठीक आहे का? या महिला खरोखरच हलाखीच्या परिस्थितीत आहेत, की त्यांच्या पाठीमागे लहान मुलांचा वापर करून भीक मागायला लावणारी एखादी मोठी आंतरजिल्हा टोळी कार्यरत आहे? श्रीरामपूरसारख्या मुख्य शहरात दिवसाढवळ्या असे प्रकार घडत असताना पोलीस, स्थानिक प्रशासन आणि बालकल्याण यंत्रणा याकडे डोळेझाक का करत आहेत.

# जिल्ह्यास दोन दिवस अतिवृष्टीचा इशारा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर** : भारतीय हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यास ६ व ७ जुलै २०२६ रोजी काही ठिकाणी जोरदार वाऱ्यासह मुसळधार पावसाची शक्यता वर्तविण्यात आली असून या कालावधीत अतिवृष्टीची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर जिल्ह्यास 'यलो अलर्ट' देण्यात आला असून संभाव्य जीवितहानी व वित्तीय हानी टाळण्यासाठी सर्व नागरिकांनी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी गिते यांनी केले आहे. अहिल्यानगर, पुणे व नाशिक जिल्ह्यांत मध्यम ते मुसळधार पर्जन्य झाल्यास जिल्ह्यातून वाहणाऱ्या भीमा व गोदावरी नद्यांवरील धरणांतून होणाऱ्या विसर्गामुळे नदीपात्रातील पाण्याच्या पातळीत वाढ होण्याची शक्यता आहे.

सध्या भीमा नदीवरील दौंड पुलाजवळून २७ हजार ८४७ क्युसेक, तर गोदावरी नदीवरील नांदूर मध्यमेश्वर धरणातून ३०० क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरू आहे. पुढील पर्जन्यमानानुसार या विसर्गात वाढ होण्याची शक्यता असल्याने नदीकाठील गावांतील नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला असून विशेष दक्षता घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. मेघगर्जना, विजांचा कडकडाट अथवा वादळी वारे सुरू असताना नागरिकांनी झाडाखाली किंवा मोकळ्या मैदानात थांबू नये व सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा. टॉवर, ध्वजस्तंभ, विजेचे खांब, विद्युत रोहित्र (ट्रान्सफॉर्मर), धातूचे कुंपण तसेच लोंबकळणाऱ्या वीजवाहिन्यांपासून सुरक्षित अंतर राखावे. विद्युत प्रवाह असण्याची शक्यता असलेल्या कोणत्याही वस्तूस स्पर्श करणे टाळावे.

मेघगर्जना सुरू असताना विद्युत उपकरणांचा वापर शक्यतो टाळावा. घराबाहेर मोकळ्या जागेत असताना वीज चमकल्यास उकिडवे बसून दोन्ही हातांनी कान झाकावेत व डोके दोन्ही गुडघ्यांच्या मध्ये ठेवून जमिनीशी कमीत कमी संपर्क राहील याची काळजी घ्यावी. वादळी वाऱ्यामुळे झाडे अथवा जाहिरात फलक कोसळण्याची शक्यता असल्याने अशा धोकादायक ठिकाणांपासून दूर राहावे. तसेच ट्रॅक्टर उलटणे किंवा शेतीची अवजारे हाताळताना अपघात होणार नाहीत, यासाठी विशेष सतर्कता बाळगावी, वादळी वारे, पाऊस अथवा गारपीट यांमुळे शेतीमालाचे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी योग्य नियोजन करून शेतीमाल सुरक्षित ठिकाणी साठवून ठेवावा. बाजार समितीत विक्रीसाठी आणलेल्या अथवा आणण्याचे नियोजन असलेल्या शेतीमालाचे नुकसान होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

जनावरेही सुरक्षित ठिकाणी हलवावीत. धरण, नदी अथवा कालव्यांच्या परिसरात पर्यटनासाठी जाणाऱ्या नागरिकांनी विशेष खबरदारी घ्यावी. धरण, नदी अथवा कालव्याच्या पाण्यात उतरू नये. तसेच धोकादायक ठिकाणी सेल्फी अथवा छायाचित्रे काढणे टाळावे. कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीत नागरिकांनी स्थानिक प्रशासनाकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मदतीसाठी जवळच्या पोलीस ठाणे, तहसील कार्यालय अथवा स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा.

तसेच जिल्हा नियंत्रण कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथील दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२३८४४ व ०२४१-२३५६९४० तसेच ११२ व १०७७ या विनामूल्य दूरध्वनी क्रमांकांवर संपर्क साधावा, असेही प्रशासनाने कळविले आहे.

## गृहमंत्रालयाचा आदेश अन् राहुरीतील ३० आरोपींची नाशिक कारागृहात रवानगी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : गृह मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या आदेशावरून राहुरी सह अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वच पोलिस ठाण्यातील न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपींची नाशिक येथील कारागृहात रवानगी करण्यात आली. काही दिवसांपूर्वी गृह मंत्रालय महाराष्ट्र शासन यांच्या आदेशानुसार प्रत्येक पोलीस ठाण्यातील उप कारागृहात असलेले न्यायालयीन कोठडीतील आरोपी मोठ्या कारागृहात ठेवण्याच्या प्रक्रियेला सुरूवात करण्यात आली.



त्यानुसार राहुरी सह अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्वच पोलिस ठाण्यातील न्यायालयीन कोठडीत असलेल्या आरोपींची नाशिक येथील नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात येत आहे. दि. ६ जुलै २०२६ रोजी राहुरी येथील उप कारागृहात न्यायालयीन कोठडीत असलेले २६ पुरुष व ४ महिला असे एकूण ३० आरोपींची नाशिक रोड मध्यवर्ती कारागृहात रवानगी करण्यात आली. यावेळी पोलिस निरीक्षक रवींद्र देशमुख यांच्या नेतृत्वाखाली चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. आरोपींना भेटण्यासाठी नातेवाईकांनी पोलीस ठाण्याच्या आवारात मोठी गर्दी केली होती.

तर आरोपी नेत असलेल्या वाहनांमध्ये बंदुकधारी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला. राहुरी येथील उप कारागृहात सध्या पोलिस कोठडीतील एकच आरोपी राहिला आहे. काही वर्षापूर्वी राहुरी येथील उप कारागृहातून पाच आरोपी जेलच्या खिडकीचे गज कापून पसार झाले होते. त्यावेळी काही अधिकारी व कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली होती. अशा घटना आता होणार नाही. तसेच पोलिस प्रशासनावर असलेला कामाचा ताण कमी होण्यास मदत होणार आहे.

## श्रीरामपूर - नेवासा रोड हद्दीची मोजणी

### दोन दिवसात अतिक्रमण काढण्याचा इशारा, अन्यथा पोलीस संरक्षणात काढणार

शासनाच्या नियमाप्रमाणे शासनाने जे अतिक्रमण मध्ये असतील त्या सर्वांना अतिक्रमण काढण्यास बजावावे कोणावरही अन्याय न होता,छोटा मोठा, राजकीय पाठबळ असलेले असा भेदभाव न करता शासनाने कोणाचीही गय न करता अतिक्रमण केलेल्या सर्वांचे समान नियमाप्रमाणे अतिक्रमण काढावे अशी सर्वसामान्य नागरिकांची अपेक्षा आहे.



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**टाकळीभान** : श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान मधून जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग क्रमांक ५० श्रीरामपूर नेवासा रोडच्या दुतर्फा केलेले व्यावसायिक व तात्पुरते रहिवासी यांनी केलेले अतिक्रमण शासनाच्या नियमाप्रमाणे दोन दिवसांमध्ये बुधवारपर्यंत न काढल्यास सार्वजनिक बांधकाम खाते पोलीस संरक्षणामध्ये अतिक्रमण काढणार असा इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांनी दिला आहे.

सोमवार दि.६ जुलै रोजी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य मार्ग क्रमांक ५० टाकळीभान येथील श्रीरामपूर नेवासा रोड वरील रस्त्याच्या दुतर्फ मोजणी करून आपल्या हद्दीची आखणी केली. अतिक्रमणधारकांनी बऱ्याच अंशी अतिक्रमण काढले असून अजूनही काही व्यावसायिक व रहिवासी याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दी मध्ये मध्ये अतिक्रमण असून ते त्वरित दोन दिवसात काढावे अन्यथा पोलीस संरक्षणात काढण्यात येईल असा गर्भित इशारा सार्वजनिक बांधकाम विभागाने दिला आहे.

बऱ्यच अंशी अतिक्रमण काढण्यात आले असून उर्वरित अतिक्रमण असणाऱ्या व्यवसायिक व रहिवाशांना आपले अतिक्रमण न काढल्यास शासनाच्या कारवाईस सामोरे जावे लागणार आहे.